साप्ताहिक
# माणूस
११ सप्टेंबर ८२, दोन रुपये



थोडा सूर बिघडला तर **मॅकेन्रो** पराभवाच्या छायेत का जातो?



दोघेही अतिशय महत्वाकांक्षी असतो तर संघर्ष आला असता.....
कमलाकर सारंग



धिरेंद्र ब्रह्मचारी विरुध्द संतप्त साठ हजार

# माणूस

□

**वर्ष : बाविसावे**

**अंक : चौदावा** ७५

**११ सप्टेंबर १९८२**

**किंमत : दोन रुपये**

□

संपादक

**श्री. ग. माजगावकर**

□

सहाय्यक

**दिलीप माजगावकर**

**सौ. निर्मला पुरंदरे**

□

वार्षिक वर्गणी

**पन्नास रुपये**

□



प्रकाशित लेख, चित्रे इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी चालक सहमत असतीलच असे नाही.



□

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक **श्री. ग. माजगावकर** यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.

□

: पत्ता :

साप्ताहिक माणूस

१०२५ सदाशिव, पुणे ३०

दूरध्वनी : ४४३४५९

□

मुखपृष्ठ

अनंत सालकर

□


## सप्रेम नमस्कार

प्रिय माजगावकर

'दोन कॉम्रेड्स' ह्या जयंत प्रधान यांनी लिहिलेल्या सत्यकथेबद्दल त्यांचे लेखक म्हणून आणि तुमचे संपादक म्हणून मनःपूर्वक अभिनंदन करण्यासाठी हे पत्र लिहित आहे. सत्याला इतर अलंकारांची गरज नसते याचा प्रत्यय ही कथा वाचताना आला. सलामच्या जीवनातले हे अनुभव सुन्न करून टाकणारे आहेतच पण जयंत प्रधानांनी ते इतक्या सरळपणे लिहिले आहेत की, त्यामुळे त्या अनुभवांची परिणामकारकता विलक्षण वाढलेली आहे. तुम्ही त्या लेखांचे छोटेसे पुस्तक तयार करावे असे मला वाटते. पुस्तक लहान होईल. पण गुणवत्ता ही पानांच्या संख्येवर नसते हे मी तुम्हाला सांगायला नको. हयाती बरोबर मौतही घेऊन चालणाऱ्या ह्या सलामची कथा पुस्तक होऊन राहिली पाहिजे. नियतकालिकात आली आणि गेली असे व्हायला नको.

श्री. प्रधान यांचे माझ्यावतीने हार्दिक अभिनंदन करावे. अशी कथा लिहायला फार मोठे धैर्य लागते.

३१ ऑगस्ट — तुमचा

**पु. ल. देशपांडे**

प्रिय श्री. प्रधान

'माणूस'मधली तुमची सत्यकथा 'दोन कॉम्रेड्स' वाचली आणि लगेचच हे पत्र लिहित आहे.

मला तुमचे हे लेखन फार आवडले. कोणी शिफारस केल्यावर आपण काही वाचतो तेव्हा एक प्रकारची तयारी असते. मोठे नाव असले तर मागले संदर्भ असतात. पण सहजी काही चाळू जावे आणि त्याने पकडून धरावे, ते शेवटपर्यंत सोडू नये, इतकेच नव्हे तर शेवट येऊन गेल्यावरही सोडू नये, यातला आनंद वेगळा आणि छान असतो.

तुमचा विषय तर वेगळा आहेच पण ज्या साधेपणाने, त्याचे 'साहित्य' करण्याच्या भानगडीत न पडता तुम्ही तो हाताळला आहे त्या तुमच्या लेखनगुणाला शंभरापैकी पंचाहत्तर टक्के मार्क द्यायला हवेत.

मी चित्रपट दिग्दर्शक असतो तर तुमच्याकडून चित्रपटाचे हक्क लगेच घेऊन टाकले असते.

या कथेचे पुस्तक कोण काढते आहे? निघाले पाहिजे.

पुन्हा एकवार मनःपूर्वक कृतज्ञता. इतके छान वाचायला दिल्याबद्दल.

यात अर्थात माजगावकरांचाही वाटा आहेच.

२१ ऑगस्ट — तुमचा

**विजय तेंडुलकर**

□ ७ ऑगस्टच्या 'माणूस'मधील द्वारकानाथ संझगिरी यांचा कपिलवरचा लेख खूप आवडला. मराठीत असे दर्जेदार क्रीडालेख क्वचितच वाचायला मिळतात. संझगिरी म्हणतात त्याप्रमाणे कपिल व संदीपच्या आक्रमक फलंदाजीने भारतीय क्रिकेट संघात नवा आत्मविश्वास निर्माण होऊन त्याचे नीतिधैर्य नक्कीच उंचावले असेल.

१४ ऑगस्टचा 'माणूस' सर्वांगसुंदर वाटला. सर्व लेख एकाहून एक सरस उतरले आहेत. विशेषतः जयंत प्रधानांनी घडवलेल्या 'सलाम'च्या दर्शनाने तर एक वेगळाच आनंद दिला. सांस्कृतिक हालचालींपासून दूर राहणाऱ्या आमच्यासारख्यांना तुमचा माणूस एखाद्या जिवलग मित्रासारखा वाटतो.

१४ ऑगस्ट — **शि. जि. शिर्के,**

चिपळूण

□ आजचा (१४ ऑगस्ट) अंक सुरेख आहे. सर्वांना तुम्ही न्याय दिला आहे. सावरकर, गांधी, साम्यवादी, समाजवादी सर्वांची आठवण काढून आजचा सर्वांत ज्वलंत प्रश्न 'अणुयुद्धाचा धोका' याकडे वाचकांचे लक्ष वेधल्यामुळे धन्यवाद. सर्वसमन्वयी देशभक्ती व जागरूक मानवता यांचे दर्शन या अंकामध्ये झाले. मनःपूर्वक अभिनंदन.

१४ ऑगस्ट — **ल. के. देशपांडे**

पुणे

□ 'शरद जोशींबरोबर पंजाबात' आणि 'लाल राज्यात सात दिवस' या दोन्ही

लेखमाला उत्कृष्ट होत्या. तसेच 'सूर्य'-संबंधीच्या घडामोडीसंबंधी डॉ. जैन याच्या लेखाच्या अनुवादातून इंदिरा नीतीवर बराच प्रकाश पडला.

१५ ऑगस्ट — शरद हरी भिडे
अकोला

□ 'टिळक आणि आगरकर' हे मलाही उच्च दर्जाचं वाटलेलं नाटक. तरीही या नाटकाच्या संहितेवर आपण लिहिलेल्या संपादकीयाशी मी असहमतच आहे; परंतु हे पत्र लिहिण्याचं कारण आपण शेवटी म्हणता 'छबिलदासी नाटकानी मानवी सौहार्द–चैतन्य रंगभूमीवरून हद्दपारच करून टाकले होते.' छबिलदासी नाटकांशी आपली ओळख फारच जुजबी झालेली दिसते.म्हणूनच हा अतिरेक आपण केलात असं मला वाटतं. छबिलदास रंगमंचावर सादर होणारं 'ताम्रपट' आपण जरूर पहा. तसेच ७५ बालकलाकार सादर करीत असलेलं 'दुर्गा झाली गौरी' हे नृत्यनाटयही जरूर पहा. यापूर्वी छबिलदासी चालकांनी 'अपना हाथ जगन्नाथ' हे बाल नृत्य-नाटय सादर केलं होतं. उदात्ततेचा हव्यास असणाऱ्या माणसांना या नावातच ती आढळावी.

२२ ऑगस्ट — श्रीकान्त मातोंडकर
मुंबई

□ 'माणूस'चे अंक चागले निघतात. श्री. शरद जोशींच्या कार्याचे योग्य विवरण त्यात मिळते. मागच्या अंकामधले 'रावण व सीता' हे संपादकीय त्यातील विचारधारेमुळे फार आवडले.

२५ ऑगस्ट — गीता साने
धनबाद (बिहार)

□ जयंत प्रधान यांचा 'माणूस'मधील दुसरा हप्ता फारच चिंतनीय आहे, वेगळा आहे. त्यांचा पत्ता पाहिजे आहे. कौतुकाचे पत्र त्याना लिहायला पाहिजे.

२६ ऑगस्ट — दादूमिया
बडोदा

□ आपल्या २१ ऑगस्टच्या अंकातील 'सीमेवरून परत' आणि 'नक्षत्राच्या शयंती' या स्वतः आपण आणि श्रीमती मेधा देशपांडे यांनी शब्दबद्ध केलेल्या टिपण्या अतिशय आवडल्या. त्याची दाद देण्यासाठी हे पत्र लिहीत आहे. 'टिळक आणि आगरकर' या नाटकाविषयी केलेल्या या लिखाणात अतिशय ओज आणि सौंदर्य भरलेले आहे. आपल्या लिखाणात नाटकाच्या परीक्षणाच्या संदर्भात छबिलदासी नाटकांमुळे ऐतिहासिक व्यक्तींच्या विषयी उदात्तता स्पष्ट करणारी परंपरा खंडित होऊ नये, आमचा इतिहास केवळ लंपटांचाच नव्हता, तो मान्यवरांचाही आहे हे सर्व भारताला आणि जगाला कळले पाहिजे याबद्दल आपणास वाटणारी सार्थ उत्कटता आपल्या लिखाणात स्पष्ट जाणवते त्याचप्रमाणे मेधा देशपांडेंचे लिखाणही अत्यत नेटके आणि वेधक आहे. नाटकाचे परीक्षण करताना त्याचे मुख्य सूत्र आणि या सूत्राच्या उकलीत गुफण्यात आलेले प्रसग किती अस्सल व कमअस्सल आहेत यावरच नाटकाचे मोठेपण, भव्यपण ठरते, हा त्याचा अभिप्राय अतिशय महत्त्वाचा आहे. नाटकातले द्वंद्व नेमके हेरून त्याची उकल करण्याची त्यांची पद्धती त्यांच्याच शब्दात वाचकाला 'भिडते.' फार दिवसानी असे वाचावयास मिळाले याबद्दल अभिनंदन !

२७ ऑगस्ट — दौलतराव भोसले
मुंबई

## मुंबई वार्ता

# डॉक्युमेंटरी–दुर्लक्षिलेली !

प्रभात चित्रमंडळाच्या पहिल्या चित्रपट-रसिक मेळाव्यात प्रदीप दीक्षित भेटले.

प्रदीप दीक्षित फ्री लान्स डॉक्युमेंटरी फिल्ममेकर आहेत.

उत्साहानं बोलतात. तशाच उत्साहानं डॉक्युमेंटरी फिल्मसही काढतात.

त्यांच्या फिल्मस् चागल्या असतात. त्याबद्दल त्याना खूपसे पुरस्कारही मिळाले आहेत.

तुम्ही चित्रपट पहात असणारच. तेव्हा त्याच्या डॉक्युमेंटरीज तुम्ही नक्कीच पाहिलेल्या असणार. चित्रपट सुरू होण्याआधी, मध्यन्तरानंतर दीक्षितांचं नाव त्यानी तयार केलेल्या डॉक्युमेंटरीज तुम्हाला नक्कीच आठवत असतील. किंवा दुसरी कुठलीही डॉक्युमेंटरी घ्या. सुवक तुम्हाला त्या वेळी आवडलेली. ती फिल्म, तिचा निर्माता हे तरी तुमच्या लक्षात असतील.

नाही ? तुम्ही पाहिलेल्या डॉक्युमेंटरीज, त्याचे विषय आणि त्या विषयांची हाताळणी त्याचे निर्माते तुमच्या लक्षात नाहीत ?

खरं म्हणजे डॉक्युमेंटरीज सुद्धा चित्रपटात मागेच दृक्–श्राव्यमाध्यमातून समोर येणाऱ्या, आणि म्हणून तुमच्यावर कब्जा मागणाऱ्या अगदी चित्रपट जसे तुम्हाला जिव्हाळ्याच्या वगैरे वाटणाऱ्या विषयावर काढले जातात, तशाच जिव्हाळ्याच्या विषयावर डॉक्युमेंटरीजही असतात. चित्रपटाच्या काही दिग्दर्शकांसारखंच काही डॉक्युमेंटरी निर्मात्यांनाही चांगलं कलात्मक भान असतं.

इतकंही करून चित्रपट तुमच्या लक्षात रहातात. अगदी कंटाळवाणा आणि रटाळ चित्रपट असला, तरी त्याचा काही तरी मागमूस तुमच्या मनाच्या कोपऱ्यात कुठे ना कुठे तरी रेगाळतोच.

पण डॉक्युमेंटरी फिल्म मात्र चागली असो की वाईट, तुम्ही ती सरसकट आपली विसरूनच जाता. तिचा आशय किंवा तिची मांडणी याची गंभीर दखल तुम्ही घेत नाही आणि याचंच प्रदीप दीक्षितांना वाईट वाटतं.

सगळ्या डॉक्युमेंटरी फिल्मनिर्मात्याच हे प्रातिनिधिक दु.ख आहे.

डॉक्युमेंटरी फिल्मसची निर्मिती आणि आस्वाद यांच्यामध्ये किती अडथळे असतात?

आस्वाद न घेण्याची प्रेक्षकाची भूमिका हा पहिला अडथळा. डॉक्युमेंटरी फिल्मसही बघण्यासारख्या असतात, त्याही बघाव्यात असं प्रेक्षकांना मुळातच वाटत नाही. थोडं लांबवलेलं 'भारतीय समाचार' म्हणजे डॉक्युमेंटरी फिल्म. केवळ माहितीपट. त्यामध्ये वेधक असं काहीच नसणार. डॉक्युमेंटरी म्हणजे माहितीची जंत्री नसावी, नसते हे भान निर्मात्यांमध्ये कमी असलं, तर प्रेक्षकांमध्ये त्याहूनही कमीच असतं. म्हणूनच तर प्रेक्षक डॉक्युमेंरीला स्वत:ला सिद्ध करण्याची संधी देत नाही. म्हणजे डॉक्युमेंटरी सुरू झाली की पब्लिक शिट्ट्या मारून बाहेर बायकोला पॉपकॉर्न, नाही तर रडणाऱ्या

मुलाला घेऊन. बाहेर अगदीच काही नाही, तर 'तिकडे' तरी, मध्यन्तरातली गर्दी, टाळायला आणि आता बसणारे असतील, तर तिकिटाच्या पैशांच्या देवाण-घेवाणीचा हिशेब नक्कीच करत असणार! दीक्षितानी नेमकं बोट ठेवलं.

सर्वसामान्य प्रेक्षकाचं तर सोडाच, पण अधिक विचारपूर्वक चित्रपट पहाणाऱ्यांची चोखंदळ अभिरुची असणारांची पण हीच स्थिती आहे म्हणजे केवळ मनोरंजनाच्या हेतूनं व्यापारी चित्रपट बघायला जातो त्या प्रेक्षकाकडून खास अपेक्षा नाहीत परंतु चाकोरीबाहेरचा कलात्मक भान असणारा चित्रपटप्रेक्षकदेखिल डॉक्युमेंटरीची उपेक्षा करतो—मी.

याचं उत्तर बहुधा असं असावं की, चित्रपट पहायला जाणाऱ्या प्रेक्षकाची चित्रपट सोडून दुसरं काही पाहाण्याची मानसिक तयारी त्या वेळी नसते. त्याची अपेक्षा आणि मूडही चित्रपटाचा असतो, डॉक्युमेंटरीचा नसतो. दीक्षितानी दिलेले उदाहरण द्यायचं तर असं म्हणता येईल— संजय गाधीवर लिहिलेली सनसनाटी कादंबरी ऐकवण्यासाठी म्हणून एखाद्या कादंबरीकारानं बोलावले आणि मग म्हटलं, कादंबरीआधी माझ्या बालपणीच्या एवढ्या चार-सहा कविता ऐका नं! तर कसं फसवलं गेल्यासारखं वाटेल! तसं बहुधा प्रेक्षकांना डॉक्युमेंटरीबद्दल वाटत असावं.

डॉक्युमेंटरी फिल्मचा आपण कधी गंभीरपणे विचार करत नाही, त्यामुळं त्याचं महत्त्व, प्रभावीपणही आपल्याला जाणवत नाही. डॉक्युमेंटरी हे काही केवळ माहितीचं साधन नाही, तो एक कलाप्रकार आहे, आणि चांगल्या निर्मात्याच्या हातात पडला, तर त्याचं चीजही होतं. डॉक्युमेंटरी चित्रपटातून जळजळीत सत्य, साक्षात वास्तव प्रेक्षकापुढे आणता येतं. शुद्ध स्वरुपातलं, आणि कलात्मक भान राखून सादर केलेले सत्य ही डॉक्युमेंटरी फिल्मची एकटीची मिरासदारी म्हणायला हवी, आणि तसा विशेष परिणाम केवळ डॉक्युमेंटरीच घडवून आणू शकते. उदाहरणार्थ प्रदीप दीक्षितानी वेठबिगारीच्या प्रश्नावर बनवलेली दलदल' नावाची डॉक्युमेंटरी फिल्म घ्या. फिल्ममध्ये दूरदर्शनवर हिंदी बातम्या देणारा हरीश भीमानी एका शेतात उभा असलेला आपल्याला भेटतो. याच शेतात वेठबिगार मजूर काम करत असतात. पॅंट-झब्बा, झोळी, या वेषातला हरीश भीमानी म्हणजे प्रातिनिधिक शहरी तरुण. ज्या प्रेक्षकांसाठी डॉक्युमेंटरी प्रामुख्यानं बनवली गेली आहे, त्या शहरी प्रेक्षकाचा तो प्रतिनिधी. डॉक्युमेंटरीच्या विषयाबद्दल प्रेक्षकांना आस्था निर्माण करेल, परकेपणा काढून टाकेल अशी या तरुणाची निवड. हा शहरी तरुण मग या वेठबिगारी करणाऱ्या मजुरांतून फिरतो, त्यांच्याशी बोलतो तेव्हा प्रेक्षकही त्याच्या बरोबरच असतो. प्रेक्षकांचं लक्ष वेधून घेण्यासाठी दिग्दर्शकाची ही पहिली कल्पना झाली.

फिल्म मग हळूहळू पुढे सरकते. वेठबिगारीचं जोखड मानेवर अडकवून घ्यावं लागतं. तेही पिढ्यान् पिढ्याना आणि अतिशय क्षुल्लक कारणासाठी. पण पुढच्याला ठेच लागूनही मागचा शहाणा होत नाही. त्या ऐवजी इतिहासाचीच भीषण पुनरावृत्ती होत रहाते. अगदी थोड्या टीका–टिप्पणीच्या सहाय्यानं फिल्म पुढे सरकत रहाते. चित्रपटातला चंदू मजूर आपल्या भ्रष्टतेबद्दल सावकाराकडून चाबकाचे फटके खातो, तो कळ साला पोचणारा प्रसंग. अस्सल ग्रामीण दिसणारा, असणारा चंदू इथे दिग्दर्शकानं वापरला आहे. एखादा मोहक मुखड्याचा चित्रपटतारा त्याऐवजी वापरला असता तर? पण डॉक्युमेंटरी चित्रपटनिर्मात्याला हे स्वातंत्र्य नाही आणि ही मर्यादा हेच त्याचं खरं वैशिष्ट्य आहे. गोंडस चित्रपटताऱ्याला असे फटके खाताना पाहून प्रेक्षकांना हळहळ वाटली असती; पण ती तद्दन फिल्मी, खरोखरच्या चंदूबद्दल त्याना त्यामुळे काही वाटेलच अशी खात्री नाही; परतु याच भीषण वास्तवाला डॉक्युमेंटरीमधून प्रेक्षक सामोरा जातो आणि त्याचा स्वीकार करतो ते वास्तव म्हणून. चार घटका पाहून जाण्याची फिल्मी करमणूक म्हणून नव्हे. डॉक्युमेंटरी फिल्मच्या निर्मात्यापुढचं आव्हान हे काही प्रमाणात चित्रपटनिर्मात्यापेक्षाही अधिक आव्हानात्मक असतं वास्तवाला आपल्या मर्जीप्रमाणे माडण्याचा अधिकार त्याला असतो; पण आपल्या कलात्मक भानानुसार ते बदलण्याचा अधिक मोहक किंवा चित्तवेधक स्वरूप देण्याचा अधिकार मात्र त्याला नसतो. वेठबिगारीवरची फिल्म किंवा मोलकरणीवरची फिल्म करायची म्हटली, तर टाका त्याला चार गाण्यांचा मालमसाला आणि करा जरा खमंग त्याला, हे स्वातंत्र्य त्याला घेता येत नाही. तरीही किंवा म्हणूनच त्याच्या फिल्ममधले प्रश्न, त्यांची माडणी अधिक सच्ची वाटते. सईद मिर्झा, मणी कौल, हे आजचे चोखंदळ दिग्दर्शक डॉक्युमेंटरी फिल्मनिर्मितीचा अनुभव गाठीला घेऊन दिग्दर्शनातले नवनवे प्रयोग करताहेत, ही वस्तुस्थिती डॉक्युमेंटरीच्या कलात्मक आव्हानाबद्दल पुरेसं भाष्य करते.

भारतासारख्या नानाविध सामाजिक प्रश्नांनी बुजबुजलेल्या देशात डॉक्युमेंटरी फिल्मचं महत्त्व तर विशेषच म्हणायला हवं. पण दुर्दैवानं सरकारी पातळीवरून याबाबत होणाऱ्या हालचाली फारशा समाधानकारक नाहीत. डॉक्युमेंटरी फिल्मनिर्मिती आणि आस्वाद यामधल्या अडचणी याविषयी यापूर्वी म्हटलं; लाल फितीच्या आणि खाकी धोरणाच्या अडचणी या दोहोंमध्येही आडव्या येतात. फिल्मसडिविजनकडे डॉक्युमेंटरी फिल्मसच्या वितरणाचे सर्वाधिकार असतात. एखाद्या विषयावर जेव्हा डॉक्युमेंटरी काढण्याचा निर्णय घेतला जातो, तेव्हा फिल्मस् डिविजन चित्रपटनिर्मात्याकडून त्यासाठी निविदा मागवते. शेवटी चित्रपट निर्माण करण्याचं कंत्राट दिलं जातं, ते ज्यानं सर्वांत कमी निर्मितिमूल्य दिलं असेल त्याला. एवढा महत्त्वाचा निर्णय घेताना केवळ एवढा एकच निकष वापरला जावा आणि सरकारी पातळीवर डॉक्युमेंटरी फिल्मस्च्या कलात्मकतेची एवढीही बूज राखली जाऊ नये, ही खरोखरच खेदाची बाब आहे.-

दुसरा प्रश्न आहे चित्रपटगृहाच्या मालकांचा. या डॉक्युमेंटरी फिल्मस् त्यांना सरकारी दडपणामुळे दाखवाव्या लागतात. त्यामध्ये त्याना आर्थिक फायदा तर नाहीच उलट भुर्दंडच सोसावा लागतो. दहा मिनिटांची डॉक्युमेंटरी दाखवण्याऐवजी दहा मिनिटांच्या जाहिराती दाखवल्या, तर त्याला त्यापासून केवढं तरी उत्पन्न मिळतं. डॉक्युमेंटरीज दाखवाव्यात, प्रेक्षकापर्यंत त्या पोचवाव्या, यात त्याला आस्था नसते आणि सर्वच चित्रपटगृहात, सर्वच खेळाना, सर्वच डॉक्युमेंटरीज नेहमी पूर्ण दाखवल्या जातात

असं नाही. हा बाहेरगावचा तर सोडाच, पण मुंबईतलाही अनुभव आहे. निर्मिती आणि आस्वाद यांच्यामधले असले–नसले कच्चे दुवेही असे तुटले, तर डॉक्युमेन्टरी फिल्म निर्मात्याला प्रोत्साहन मिळणार कसं?

डॉक्युमेन्टरी फिल्मची कहाणी ही अशी आहे. प्रेक्षक नाही ही त्यांची व्यथा आहे. जोपर्यंत त्यांची अभिरुची प्रेक्षकांत निर्माण होत नाही, तोपर्यंत त्यांचा हेतू साध्य होणार नाही आणि जोपर्यंत अधिकाधिक प्रेक्षकांपर्यंत त्या पोचत नाहीत, तोपर्यंत अशी अभिरुची निर्माण होणार नाही.

डॉक्युमेन्टरी फिल्म हे लोकशिक्षणाचं, ज्ञानप्रसाराचं अतिशय प्रभावी माध्यम आहे. 'भारत माझा देश आहे, सारे भारतीय माझे बांधव आहेत' ही झाली छापील वाक्यं; पण साऱ्या भारतीयांना समान असलेली सुख–दुःख, समस्या, कौटुंबिक, सामाजिक, आर्थिक प्रश्न, सण आणि उत्सव, या खंडप्राय देशात होणारं परिवर्तन आणि त्यातून येणारी बंधुत्वाची भावना, दिसणारे प्रकाशकिरण या साऱ्यानं त्या विधानाला अर्थ येतो. सार्वत्रिक पातळीवरून केली जाणारी आणि तरीही वैयक्तिक पातळीवर प्रेक्षकाला भिडणारी कलात्मक डॉक्युमेन्टरी फिल्म हा त्याचा मार्ग आहे.

चित्रपटांचे खेळ होतात, तसे दोन–तीन चांगल्या डॉक्युमेंटरीजचे एकत्र खेळ आयोजित केले गेले, तर प्रेक्षकांना त्यातून किती तरी शिकता येईल.

या दिशेनं प्रेक्षकांची चळवळ हा याचा मार्ग आहे.

—ललिता बर्वे

विचारस्वातंत्र्य, व्यक्तिस्वातंत्र्य,
लेखनस्वातंत्र्य या मूलभूत
मानवी हक्कांवर श्रद्धा असणाऱ्यांना
विचार करायला लावणारी
प्रभावी जीवनकथा

**मॅक्झिम गॉर्की**

**सुमती देवस्थळे**

**मूल्य दहा रुपये**

**राजहंस प्रकाशन, पुणे ३०**

# कामगार वृत्त

## नॅशनल रेयॉनमधला सामंत–करार

खूप परिश्रमांअंती डॉ. सामंतांच्या हातून झालेले करार कामगारांना अनेक फायदे मिळवून देणारे असतात; परंतु हे फायदे पदरात पाडून घेण्यासाठी कामगाराला खूप मोठी किंमत मोजावी लागते, खूप संयम पाळावा लागतो; जीवघेणा संघर्ष करावा लागतो; प्रसंगी वर्षभर घरीही बसावे लागते!

कल्याणजवळील मोहने येथे असणाऱ्या नॅशनल रेयॉन कॉर्पोरेशनमधील ६४०० कामगारांना हेच करावे लागले आहे. या कारखान्यात कृत्रिम रेशमाचे उत्पादन होते. या कारखान्यातील कामगार आणि व्यवस्थापकांमध्ये गेल्या दोन-अडीच वर्षांपासून जोराचा संघर्ष सुरू होता.

येथे पूर्वी कृष्णराव धुळप यांची युनियन कार्य पाहात होती. धुळपांच्या युनियनचे व्यवस्थापकांशी लागेबांधे असल्याची शंका कामगार वारंवार व्यक्त करत होते. कामगारांच्या मतानुसार युनियन कामही करीत नव्हती. या सर्वांतूनच दीड वर्षापूर्वी येथील कामगारांनी डॉ. दत्ता सामंतांच्या महाराष्ट्र जनरल कामगार युनियनचे नेतृत्व स्वीकारले.

डॉ. सामंतांचे आगमन व्यवस्थापक आणि प्रतिस्पर्धी युनियन या दोहोंना न सहन होणारे असते. यातूनच ते डॉ. सामंतांची संघटना तोडण्यासाठी कामगारांना अडचणीत आणणारे अनेक प्रयत्न करतात. नॅशनल रेयॉनमध्येही तेच झाले. सामंतांची संघटना तोडण्यासाठी येथील व्यवस्थापकांनी छोटे छोटे मुद्दे उपस्थित करून कामगारांचा छळवाद सुरू केला. कृष्णराव धुळप यांच्या युनियनला डॉ. सामंतांचे आगमन न पेलणारे होते म्हणून आपल्या शक्तीनुसार जे जे करता येईल ते ते त्यांनी डॉ. सामंतांची युनियन तोडण्यासाठी केले. या दोहोंच्या संघर्षात अनेक कामगारांना गुंडांच्या हातचा जबर मार सहन करावा लागला. येथील पोलिसांकडूनही त्यांना जवळजवळ अशीच वागणूक मिळाली. या सर्वांतून संतापलेल्या कामगारांनी गेल्या वर्षी येथील मॅनेजरलाच घेराव घालून त्याच्यावर जीवघेणा हल्ला केला; पण सुदैवाने मॅनेजर बचावले; पण त्यासाठी त्यांना कित्येक दिवस हॉस्पिटलमध्ये विश्रांती घ्यावी लागली.

गेल्या वर्षी हा प्रकार घडला तेव्हा 'ही कंपनी आता बंद होणार' अशीच भीती सर्वांनी व्यक्त केली. सामान्य कामगाराला चिंता लागून राहिली की, आता किती दिवस घरी बसावे लागणार? पण सुदैवाने तसे काही झाले नाही.

या सर्वांचा डॉ. सामंतांना फायदाच झाला. व्यवस्थापकांनी, अंतर्गत युनियननी, पोलीसांनी गुंडांनी जे जे केले ते ते सर्व डॉ. सामंतांच्या पथ्यावर पडले आणि त्यांची संघटना अधिक मजबूत झाली. हा जोराचा संघर्ष चालू असतानाही कामगारांनी आपली जिद्द आणि संयम कायम राखला आणि त्यातूनच त्यांना आजचा हा लाभ झाला.

नॅशनल रेयॉनमध्ये पूर्वीचा करार अद्याप अस्तित्वात आहे. तो संपायला अद्याप पाच महिन्यांचा अवधी आहे. असे असताना डॉ. सामंतांच्या महाराष्ट्र जनरल कामगार युनियनला ठाणे औद्योगिक कोर्टाकडून मान्यता मिळाल्याने व्यवस्थापकांशी वाटाघाटी करून डॉ. सामंतांनी पाच महिने आधी हा करार घडवून आणला.

नॅशनल रेयॉन कार्पोरेशनचे व्यवस्थापक आणि महाराष्ट्र जनरल कामगार युनियनचे अध्यक्ष डॉ. दत्ता सामंत यांच्यामध्ये गेल्या दीड महिन्यापासून समक्ष वाटाघाटी सुरू होत्या. या वाटाघाटीला अंतिम रूप येऊन २६ ऑगस्ट रोजी सदरचा वैशिष्ट्यपूर्ण करार झाला.

या करारानुसार १ जानेवारी १९८३ पासून कामगारांच्या मासिक पगारात ४२० ते ५०० रुपयांपर्यंतची वाढ होणार आहे. १ जानेवारी ८३ पासून पगाराच्या चालू असलेल्या वार्षिक श्रेणी बदलल्या जाणार आहेत. या बदललेल्या श्रेणीनुसार कामगा-

राच्या मूळ पगारात २० रुपयांपासून ८० रुपयांपर्यंतची वाढ होणार आहे.

सर्व ६४०० कामगारांना सदरची वाढ १ जानेवारी १९८३ पासून मिळणार असली तरी त्यापैकी ११६३ कामगारांना नवीन वेतनश्रेणीचा लाभ १ ऑगस्ट १९८२ पासूनच मिळणार आहे. तसेच १ ऑगस्ट ८२ पासून सर्व कायम कामगारांना मुंबई महागाई निर्देशांक ४८५ निर्देशांकावर प्रत्येक पाईंटला १-५० पैसेप्रमाणे महागाई भत्ता देण्यात येणार आहे. पूर्वी हा भत्ता १.३५ पैसे एवढा होता. बदली कामगाराना ७०० निर्देशांकावर प्रत्येक पाईंटला १.५ पैसे प्रमाणे महागाईभत्ता मिळणार आहे.

येथील कामगारांना या करारानुसार १ ऑगस्टपासून दरमहा ६० रुपये घरभाडेभत्ता मिळणार आहे. प्रवासभत्ता म्हणून या कामगारांना दरवर्षी ४०० ते ७०० रुपयांपर्यंत रोख रक्कम मिळणार आहे.

कामगारांच्या वार्षिक हक्काच्या रजेत ४।५ दिवसांची वाढ झाली आहे. ७ दिवस त्यांना आजारीपणाचीही रजा मिळणार आहे. येथील कामगारांना पूर्वी दूध देण्यात येत असे. परंतु नवीन करारानुसार दूध रद्द करण्यात आले असून त्याऐवजी रोज ९० पैसे दूधभत्ता देण्यात येणार आहे.

दूधभत्त्याप्रमाणे दरमहा ४० रुपये शिक्षण भत्ताही कामगारांना मिळणार आहे. याशिवाय येथील कामगारांना प्रथमच दरवर्षी ३६० रुपये मेडिकल भत्ता देण्यात येणार आहे. येथील सर्वच कामगारांचा पगार आता १००० रुपयाच्या वर झाल्याने कामगार विमा योजनेचा त्यांना लाभ होणार नसल्याने हा भत्ता करारात नमूद करण्यात आला.

गावी जाण्यासाठी मिळणाऱ्या वार्षिक प्रवासभत्त्याबरोबरच कामगारांना मासिक ४० ते ६० रुपयांपर्यंत मासिक प्रवासभत्ताही मिळणार आहे. १९८१ सालाकरिता २०% बोनस आणि उत्पादन चांगले दिल्यामुळे १४ टक्के सानुग्रह अनुदानही कामगारांना मिळणार आहे. गेल्या वर्षीप्रमाणे याही वर्षी कामगारांनी उत्पादनवाढीस हातभार लावल्याने सर्व कामगारांना १००० रुपये बक्षीसी देण्यात येणार आहे.

सदरच्या करारामुळे कामगारांचे मासिक वेतन आता ४२० ते ५०० रुपयांपर्यंत वाढणार असल्याने डॉ. सामंतांचा कामगार जयजयकार करीत आहेत. याच जयजयकारात या कामगारांनी डॉ. सामंतांची एक भव्य मिरवणूक काढली. मिरवणुकीत सरचिटणीस टी. एस. बोराडे, उपाध्यक्ष रतन म्हात्रे हेही अग्रस्थानी होते.

नॅशनल रेयॉनमध्ये डॉ. सामंतांनी केलेल्या या करारामुळे विविध ठिकाणी बंद असलेल्या कारखान्यातील कामगारांच्या आशांना पुन्हा एकदा पालवी फुटली आहे. या परिसरातील अनेक कंपन्या गेल्या कित्येक महिन्यापासून संप टाळेबंदीमुळे बंद आहेत. कंटाळलेले डॉ. सामंतांचे कामगार अन्य युनियनकडे जाऊन नवीन नेतृत्वाच्या शोधात आहेत.

अशा वेळी डॉ. सामंतांनी केलेल्या या वैशिष्ट्यपूर्ण करारामुळे हे कामगार एका आशेने डॉ. सामंतांच्या पाठीशी राहतील. त्यांच्या आशा डॉ. सामंत पुऱ्या करू शकले तर त्यापेक्षा मोठं ते काय आहे ?

—मोहन शंकर कुलकर्णी

---


# नाझी भस्मासुराचा उदयास्त

वि. ग. कानिटकर

प्रसिद्धी ?

किंमत ?

चौथी डिलक्स आवृत्ती प्रकाशनाच्या वाटेवर

राजहंस प्रकाशन

१०२५ सदाशिव पेठ, पुणे ३०

मुक्काम संगमनेर

# दंगल टळली

दि. २९।८।८२ ला संध्याकाळी सात-साडे-सात वाजण्याच्या सुमारास बाजार-पेठेत, भर रहदारीच्या रस्त्यावर सोमनाथ गोपाळ पराओ या तरुणाला दहा-बारा मुलांनी अडवून मारलं.

मारणारी मुलं मुस्लिम समाजातली होती.

बातमी वाऱ्यासारखी पसरली. दोन-पाचशे तरुणांचा जमाव न सागता पाच-दहा मिनिटात पोलीसस्टेशनला हजर झाला. सगळीच पेटलेली, एक्साईट झालेली.

' रहदारीच्या रस्त्यावर एकटया पराओला गाठून दहा-बारा जणं मारतात म्हणजे काय? — सजाब विचारायला आगळी भाले.

या घडलेल्या माराच्या घटनेमागे संदर्भ आहे, पार्श्वभूमी आहे.

संगमनेर कॉलेजमधली अकरावी कॉमर्सच्या एका वर्गातली घटना — या वर्गात पाच-सात मुस्लिम मुलं आहेत. मूळच्याच आक्रमक प्रवृत्तीमुळं आणि असलेल्या ग्रुपमुळं यांचं कॉलेजमधलं वावरणं बिनधास्त असायच. वर्गात कोणाला कोडून ठेव, कोणाला दम-बाजी कर असली दादागिरी ओघानं आलीच.

यांच्या या चेष्टा त्रासदायक ठरायला लागल्या — मुलींची छेडछाड सुरू झाली. मुलींच्या बाकावर बैस, त्याचे बाक उलटे करून ठेवायचे, त्यांच्या शेजारच्या बाकावर बसून अचकट-विचकट कॉमेन्टस् करायच्या, अश्लील हावभाव करून त्याना हैराण कर-ण्याचे प्रकार सुरू झाले.

या संघटित गुंडगिरीच्या भीतीनं त्यांच्या-कडं दुर्लक्ष केलं गेलं.

पण त्यामुळं चाळधाचे प्रकार वाढले. अश्लील हावभावाच्या पुढं मजल गेली.

अखेर मुलींनी सर्वांच्या सह्यानिशी अर्ज केला. वर्ग-प्रतिनिधीनं तो प्राचार्यांना पोह-चवला. कॉलेजमधल्या प्रत्येक गोष्टीवर करडी नजर असलेल्या शिस्तप्रिय (?) प्राचार्यांना तोपर्यंत घडणाऱ्या घटनाची काहीच माहिती नव्हती !

प्रकरणाचं गांभीर्य लक्षात घेऊन तातडीनं हालचाल, कारवाई अपेक्षित होती.

प्राचार्यांकडे अर्ज दिला म्हणून त्या वर्ग-प्रतिनिधीला धमकावण्यात आलं. दरम्यान प्राचार्यांनी मुलांच्या पालकांच्या, मुस्लिम समाजातील प्रतिष्ठितांच्या कानी घातलं. मुलाना ताकीद मिळाली. प्रकरण संपलं असं वाटलं —

तोच सोमनाथ पराओला एकटयाला गाठून मारण्यात आलं. मुलींनी, त्रास देतात म्हणून ज्या मुलांची नावं सांगितली तीच पराओला मारणारी मुलं आहेत

याचा अर्थ प्रकरण संपलं नव्हतं घटनांची योग्य त्या गांभीर्यानं दखल घेतली गेली नव्हती पराओ वर्ग-प्रतिनिधी असलेल्या निम्हाळीचा मित्र आहे. निम्हाळीला दमबाजी केली म्हणून हा त्याच्याबरोबर या प्रकरणात होता, एवढाच त्याचा आणि या प्रकरणाचा संबध.

दहशत बसविण्याचा हा एक प्रकार असावा.

प्रकरण धुमसतय हे चार दिवसांपासून जाणवलेलं. असल्या घटना निमित्त ठरतात — तणाव वाढतो — ' रंग ' चढतो — हे लक्षात घेऊन युवक नेते राधावल्लभ कासट यांनी वातावरण शांत राखण्याच्या दृष्टीनं शास-कीय अधिकाऱ्यांपासून सर्वांना या धुमसत्या वातावरणाची कल्पना दिलेली. कदाचित त्याना गणेशोत्सवाच्या ' जादा कामामुळे ' या प्रकरणाकडे लक्ष पुरवायला वेळ मिळाला नसावा.

विभागीय अधिकारी, पोलीसअधिकारी यांनी दोन्ही समाजातल्या धुरिण्यांना तातडीनं एकत्र केलं शांतता राखण्याचे आवाहन कर-ण्यात आले. दोन्ही बाजूंच्या पुढाऱ्यांनी छाती-वर हात ठेवून ' असली गुंडगिरी आम्ही खपवून घेणार नाही, गुन्हेगार मग ते कोण-त्याही जाती-धर्माचे असू देत त्यांची जात एकच फक्त गुन्हेगाराची. कायद्यानं त्याना कोणतंही शासन करावं कोणी हस्तक्षेप कर-णार नाही. — आम्ही हिंदु-मुस्लिम भाई आहोत. '

अशी ' जाहीर सभेतली ' भाषणं ठोकून सगळे पांगले —

समाजाच्या नेत्यांनी छातीठोक आश्वासन दिल्याने समाधान पावलेले ' साहेब ' निश्चित झाले.

गुन्हेगारांना अटक केल्याशिवाय हलणार नाही म्हणून आग्रह धरून बसलेल्या तरुणांची समजूत काढून त्यांना परत पाठविण्यात आलं.

शातता आणि सुव्यवस्थेसाठी यंत्रणा सज्ज झाली —

एस. आर. पीं.ची पथकं हिंडू लागली — पेट्रोलिंगला गाडया फिरू लागल्या. गणपती-उत्सवाच्या निमित्तानं यंत्रणा सज्ज होतीच. त्यामुळं परिस्थिती काबूत राखता आली. घटनेचं गांभीर्य लक्षात घेऊन पी. एस आय. साहेबराव पवार यांनी रात्रीतून गुन्हेगारांना अटक केली.

तूर्त तरी शहरात अस्वस्थ शातता आहे.

एक अस्वस्थ आणि अशांत शहर असा संगमनेरचा पूर्वीपासून लौकिक हिंदु-मुस्लि-मांचा कोणताही सार्वजनिक सण-उत्सव असो शहराला लष्करी छावणीचं स्वरूप येतं.

अवकाश फक्त निमित्ताचा असतो तणाव वाढायला वेळ लागत नाही. आजपर्यंत झालेल्या दंगली, निर्माण झालेले तणाव, घडलेल्या घटना याला साक्ष आहेत. घडल्या-वर सर्व जागे होतात शांतताकमिटीच्या मीटिंगमध्ये छातीठोक भाषणं करून आपापले मतलब साधायला मोकळे होतात. यांच्या-इतकीच शासकीय यंत्रणाही याला कारण आहे.

सार्वजनिक ठिकाणी राजरोस गुंडगिरी चालते. पण कोणाची ' स्पेसिफिक ' तक्रार नाही म्हणून त्याकडं दुर्लक्ष केलं जातं.

त्रास भोगलेलाही 'कशाला नसती कटकट' म्हणून टाळतो तक्रार करणाऱ्यालाच हैराण केलं जातं, म्हणून तोही विश्वासानं सांगायला पुढं येत नाही.

पण दिसणाऱ्या गुंडगिरीकडं कोणाची तक्रार नाही म्हणून दुर्लक्ष कशासाठी ?

अशा गुंडगिरीचा बंदोबस्त हे तर यांचं काम. ते तर न सागता व्हायला हवं.

घटनांचं गांभीर्य लक्षात घ्यायचं नाही, ' स्पेसिफिक ' तक्रार नाही म्हणून हात झट-कून मोकळं व्हायचं, उदाहरण दाखवा म्हणून बोलणाऱ्याला पुढं करायचं — आणि असा पेटलेला दोन-चारशेचा जमाव आल्यावर शाततेची आवाहनं करून तात्पुरती मलम-पट्टी करायची. कायदा हातात घेऊ नका म्हणून इशारा द्यायचा.

घडलेल्या घटना लवकर विसरल्या जातात.

मग पुन्हा गुंडांचे व्यवहार निर्वेध सुरू होतात.

तक्रार नाही म्हणून यंत्रणा शांत राहते.

आणि असं काही घडल्यावर ' दंगल टळू शकली असती ' असं म्हणण्याशिवाय आपण काहीच करू शकत नाही.

— विनय गुणे

## परराष्ट्र

# गॅस-पाइपलाइन प्रश्न
# अमेरिका विरुध्द युरोप

**वा. दा. रानडे**

सैबेरियातून पश्चिम युरोपला जोडणारी गॅस-पाइपलाइन उभारण्यासाठी रशियाला मदत करण्याच्या प्रश्नावर अमेरिका आणि पश्चिम युरोप यांच्यात मतभेद निर्माण झाले असून रशियाची नाकेबंदी करण्याचे अमेरिकेचे अध्यक्ष रेगन यांचे धोरण पश्चिम युरोपच्या विरोधामुळे सिद्धीस जाण्याची शक्यता दिसत नाही. रेगन यांनी नाकेबंदी पश्चिम युरोपातील जोडकंपन्यांनाही लागू केली होती; पण ती न मानता पाइपलाइनसाठी रशियाला लागणारे भाग पुरविण्याचे पश्चिम युरोपच्या देशांनी ठरविले आहे आणि जोडकंपन्या त्याबाबतीत या देशांशी सहकार्य करीत आहेत. रशियाला हे आवश्यक भाग पुरविण्यास सुरुवातही झाली आहे.

ड्रेसर इंडस्ट्रीज या अमेरिकन कंपनीच्या फ्रेंच जोडकंपनीची लेहावरे ही फॅक्टरी रशियाच्या नियोजित पाइपलाइनसाठी एकवीस कॉम्प्रेसर पुरविणार आहे. अमेरिकेच्या नाकेबंदीविरुद्ध या फॅक्टरीतील फ्रेंच कामगारांनी निदर्शने केली. 'आम्ही पाइपलाइनसाठी कॉम्प्रेसर बनविणारच' असे घोषणाफलक त्यांच्या हातात होते. इंग्लंडची जॉन ब्राउन इंजिनिअरिंग कंपनी सहा टरबाइन्स पुरवीत आहे. अमेरिकेच्या जनरल इलेक्ट्रिक कंपनीने तयार केलेल्या डिझाइनप्रमाणे ही टरबाइन्स बनविण्यात येत आहेत. पश्चिम जर्मनीतल्या एईजी–कानिस कंपनी सहा टरबाइन्स पुरविणार आहे. इटलीतील नोव्ही पिग्नॉन कंपनी चार कॉम्प्रेसर स्टेशन्स व सात टरबाइन्स बनवीत आहे.

नाकेबंदीची सक्ती अमेरिका परदेशांतल्या जोडकंपन्यांवर किंवा उपकंपन्यांवर करू शकते का? या कंपन्या ही नाकेबंदी मानणार नाहीत हे स्पष्ट झालेच आहे. याचे काय परिणाम होतील? रेगन सरकारने दिलेले नाकेबंदीचे आदेश पाळा अशा सूचना ड्रेसर इंडस्ट्रीज या मूळ अमेरिकन कंपनीने ड्रेसर-फ्रान्स या जोडकंपनीस दिल्या होत्या; पण तिकडे दुर्लक्ष करण्याच्या सूचना फ्रान्सच्या उद्योगमंत्र्यांनी ड्रेसर फ्रान्सला दिल्या आणि त्यासाठी फ्रान्सचे माजी अध्यक्ष द गोल यांनी १९५९ मध्ये काढलेल्या हुकमाचा आधार घेऊन तसा हुकूम काढला. ड्रेसर फ्रान्स कंपनीने करारानुसार उत्पादन करण्याचे नाकारले तर तिच्या सर्व सवलती काढून घेण्यात येतील अशी धमकी फ्रेंच उद्योगमंत्र्यांनी दिली. पाइपलाइनच्या उभारणीचे काम क्रूसॉट क्रॉपर ही फ्रेंच कंपनी करीत आहे. तिने १८ कॉम्प्रेसर स्टेशनांच्या उत्पादनास सुरुवात करावी अशाही सूचना फ्रेंच सरकारने त्या कंपनीस केल्या आहेत. अध्यक्ष रेगन यांनी नाकेबंदी जाहीर केल्यानंतर १८ जुलैस या कंपनीने उत्पादन थांबविले होते. कॉम्प्रेस्टर स्टेशनांसाठी व्हॉल्व्ह व गॉज रॉकवेल व्हॉल्व्हज् ही कंपनी पुरविते. रॉकवेल इंटरनॅशनल या अमेरिकन कंपनीची ही जोडकंपनी. तिनेही उत्पादन चालू ठेवावे अशा सूचना फ्रेंच सरकारने केल्या आहेत. कॉम्प्रेसर स्टेशनांना लागणारे सुटे भाग क्रूसॉट–लॉएर ही अमेरिकेच्या कूपर इंडस्ट्रीज कंपनीची जोडकंपनी पुरविते. तिने आपल्या लायसेन्सचा त्यासाठी उपयोग करू नये हा अमेरिकेच्या कूपर इंडस्ट्रीज कंपनीने दिलेला आदेश मानू नका असे फ्रेंच सरकारने जोडकंपनीस कळविले आहे.

आपण पुकारलेली नाकेबंदी अशी अवमानली जावी याचा रेगन सरकारला राग येणे स्वाभाविक आहे; पण कराराप्रमाणे रशियन पाइपलाइनसाठी लागणारी सर्व १२५ टरबाइन्स या जोडकंपन्या पुरवू शकतील का याबद्दल शंका व्यक्त केली जाते. कारण टरबाइन्स चालवू शकणारे रोटर्स युरोपला निर्यात करण्यास अमेरिकेने बंदी केली आहे. या कंपन्या रशियाला कराराप्रमाणे टरबाइन्स पुरवू शकल्या नाहीत तर त्याबद्दल रशिया त्यांना दंड करील.तसेच अमेरिकन कंपन्यांशी त्यांचे संबंध तुटतील.

रेगन यांनी नाकेबंदी जाहीर करण्यापूर्वी पाठविण्यात आलेल्या जनरल इलेक्ट्रिक कंपनीच्या रोटर्सचा उपयोग करून या कंपन्यांनी काही टरबाइन्स तयार केली आहेत. फ्रान्सने नव्यानेच राष्ट्रीयीकरण केलेल्या अल्सथॉम अटलांटिक या कंपनीस रोटर्स तयार करण्याचा परवाना आहे; पण पश्चिम युरोपची गरज भागविण्याइतकी तिची उत्पादनक्षमता सध्या नाही. ती वाढविण्याचा निर्णय फ्रेंच सरकारने वरिष्ठ पातळीवर यापूर्वीच घेतला आहे; पण तो अजून जाहीर केलेला नाही.

पाइपलाइनची कंत्राटे पुरी करण्यापासून अमेरिका पश्चिम युरोपला आता रोखू शकत नाही आणि करार मोडणाऱ्या कंपन्यांना धमक्या देणे तिने चालू ठेवले तर अमेरिका व पश्चिम युरोप यांचे संबंध त्यामुळे ताणले जातील असा इशारा फ्रान्सने अमेरिकेस दिलेला आहे. अल्सथॉम–अटलांटिक कंपनीच्या कारखान्याच्या विस्तारासाठी पश्चिम जर्मनी, इटली आणि इंग्लंड हे तीन देश भांडवल पुरविण्यास तयार आहेत, याची कल्पना फ्रान्सने अमेरिकेस दिलेली आहे.

नाकेबंदीचा आदेश मोडणाऱ्या कंपन्यांविरुद्ध कायदेशीर कारवाईचा मार्ग अध्यक्ष रेगन अवलंबू पहात आहेत. नाकेबंदी न पाळल्याबद्दल आपल्याविरुद्ध आणि आपल्या जोडकंपनीविरुद्ध कारवाई करण्यास अमेरिकन सरकारला मनाई करावी असा अर्ज ड्रेसर इंडस्ट्रीज कंपनीने वॉशिंग्टनमधील फेडरल कोर्टात केला होता; पण कोर्टाने नकार दिला. या प्रकरणी परराष्ट्रधोरणाचे काही गंभीर प्रश्न निगडित झालेले आहेत. तसेच वीस लाख डॉलर किंमतीच्या कॉम्प्रेसर्सची विक्री रोखली गेल्याने कंपनीची भरून न येणारी हानी होईल हे कंपनी सिद्ध करू शकलेली नाही. हा सरकारचा युक्तिवाद न्या. थॉमस फ्लॅनरी यांनी मान्य केला. मनाई-अर्ज फेटाळला असला तरी डिस्ट्रिक्ट कोर्टाच्या निर्णयात वर केलेल्या अपिलाचा निकाल अजून लागावयाचा आहे; पण हा प्रश्न न्यायालयात न नेता शासकीय पातळीपुरतीच कारवाई मर्यादित ठेवावी असा सल्ला परराष्ट्रमंत्री शुल्ट्झ यांनी अध्यक्ष रेगन यांना दिला असल्याची बातमी आहे. संरक्षण, व्यापार व शेतीखात्याचे मंत्र्यांचा सल्लाही शुल्ट्झ यांचासारखाच आहे. अमे-

रिकेच्या नॅशनल सिक्युरिटी कौन्सिलचे काही सभासद कडक कारवाईचा आग्रह धरत आहेत. नाकेबंदीचा हुकूम अध्यक्ष रेगन यांनी १९७९ च्या निर्यात प्रशासन कायद्यानुसार गेल्या जूनमध्ये काढला. त्यातील तरतुदीनुसार काहीच कारवाई न करण्यापासून ते नाकेबंदी मोडणाऱ्या कंपन्यांचे अधिकाऱ्यांना अटक करण्यापर्यंत अधिकार सरकारला आहेत; पण पश्चिम युरोपशी संबंध ज्यामुळे अधिक बिघडतील असे कोणतेही अतिरेकी उपाय सरकारने योजू नयेत अशी विनंती रेगन यांना करण्यात येत आहे.

नाकेबंदी तर यशस्वी होत नाही आणि त्याबद्दलच्या आग्रहामुळे अमेरिका व पश्चिम युरोप यांचे संबंध मात्र दुरावत आहेत. 'अमेरिका आणि पश्चिम युरोपची राष्ट्रे एकमेकांपासून दुरावत चालली आहेत.आपण आता एक भाषा बोलत नाही' अशा शब्दात फ्रेंच परराष्ट्रमंत्री क्लॉड शेसाँ यांनी या मतभेदांची तीव्रता व्यक्त केली आहे. रेगन यांच्या धोरणास त्यांच्या रिपब्लिकन पक्षातही विरोध होऊ लागला आहे. अमेरिकेचे निवृत्त अध्यक्ष आपले मत सरकारविरुद्ध असले तरी ते सहसा उघडपणे मांडत नाहीत; पण माजी अध्यक्ष निक्सन यांनी लेख लिहून रेगन यांच्या धोरणांना आपला विरोध व्यक्त केला आहे. युरोपातील आपल्या दोस्तांशी संबंध दुरावणे अमेरिकेच्या हिताचे नाही असे वाढते दडपण रेगन यांच्यावर येईल आणि गॅस–पाइपलाइनबाबत स्वीकारलेले नाकेबंदीचे धोरण त्यांना सोडावे लागेल, निदान सौम्य करावे लागेल असा निदर्शकांचा अंदाज आहे.

भांडवलशाहीतील अंतर्विरोधांचा उल्लेख कार्लमार्क्सपासून अनेक कम्युनिस्ट नेत्यांनी केलेला आहे. रशियाच्या गॅस–पाइलाइनचे प्रश्नात या अंतर्विरोधाचे दर्शन घडत आहे. □

---

## अवती भवती

शरद कृष्णन

# □ मुख्यमंत्री भोसले–आणखी किती दिवस ?

लक्ष्मणाची व्यंगचित्रे मोठी लाजवाब असतात. मुख्यमंत्री बाबासाहेब भोसले यांच्या संदर्भात त्याने काढलेले एक व्यंगचित्र काल-परवाच पहाण्यात आले. गणपतिबाप्पांच्या जागी नामदार भोसले विसर्जनासाठी नेले जात आहेत आणि बाईंचा आदेश येतो–आत्ताच नको ! अर्थात आता हे 'अत्ता नको' हेच खरे मानून नामदार भोसले खुशीत असतील तर त्यांना बापडे तसे खुशीत राहू दे; पण एकंदरीतच बाबासाहेबांचे दिवस भरल्याचीं लक्षणे दिसत आहेत. बाबासाहेब भोसले यांच्या ध्यानीमनी नसताना मुख्यमंत्रीपदी त्यांची नेमणूक झाली. इंदिराजींची इच्छा असेल तोपर्यंतच मी सत्तेवर राहीन असे बाबासाहेब म्हणत आले. कारण त्यांनाही हे नक्की माहीत आहे की, आज इंदिरा कांग्रेसचे शासन असलेल्या कोणत्याही राज्याचा मुख्यमंत्री हा इंदिराजींची इच्छा असेपर्यंतच सत्तेवर राहू शकतो. सर्वज्ञात गोष्ट प्रांजलपणे मान्य केली तर बिघडले कोठे ? आता ही मान्य केलेली गोष्टच मार्गी लागली आहे. बाबासाहेबांच्याबाबतीत काही निर्णय निश्चित झालेले दिसतात. एकंदरीतच त्यांची अल्पकालीन कारकीर्द फारशी समाधानकारक ठरलेली नाही. अघळपघळ बोलण्याची त्यांची प्रवृत्तीही कमी झालेली नाही. अनेक महत्त्वाच्या प्रश्नांवर त्यांचे हसे झाले. त्यांच्या स्वतःच्या मताला दिल्लीमध्ये काही किंमत असती तर एव्हाना राज्य मंत्रिमंडळाचा विस्तार झालेला दिसला असता; पण मंत्रिमंडळाच्या विस्तारयोजनांना केराची टोपली दाखवली गेली. गवयींना पाठिंबा देण्याची त्यांची इच्छा होती; परंतु श्रेष्ठींपुढे त्यांची डाळ शिजली नाही, गवयींनी पवारांशी हातमिळवणी करून विधानपरिषद निवडणूक जिंकून दाखवली. सुरेश जैन यांची हकालपट्टी झाली वगैरे ठीक आहे; पण आपल्या पक्षाच्या आमदारांवर मुख्यमंत्र्यांचे नियंत्रण नाही याची नोंद दिल्लीमध्ये घेतली गेलीच. गिरणीकामगारांच्या संपाचे भिजत घोंगडे तसेच रखडत पडले आहे. हा संप असाच रखडत जाऊन एक दिवस आपोआप चिरडला जावा अशीच इंदिराजींची इच्छा दिसते. बाबासाहेबांनाही संपाची फारशी फिकीर दिसत नाही. पोलिसांमधील असंतुष्ट वातावरणाची एवढी प्रचंड वावटळ उठली. मुंबई भाजून निघाली आणि मुख्यमंत्री मंत्रिमंडळ विस्ताराच्या याद्या घेऊन दिल्लीमध्ये फेऱ्या मारत बसले होते! महाराष्ट्र सरकारचे मुख्य सचिव पी. जी. गवयी यांची ज्या पद्धतीने पदावनती करण्यात आली ती पद्धत आणि माजी नामदार अंतुले यांची काम करण्याची पद्धत यात फरक तो काय ? सर्वात ज्येष्ठ सनदी अधिकाऱ्याला अशा प्रकारे अवमानित करून मुख्यमंत्र्यांनी मिळवले काय ? बाबासाहेबांची मेव्हणी–निर्मलाताई ठोकळ यांनी विविध शासकीय समित्यांचे राजिनामे दिले, ते काय अगदी राजीखुषीने ? हां, आता विधानपरिषदेवर त्यांची नेमणूक झाली आहे खरी; परंतु त्यांना अन्य जबाबदाऱ्यांमधून मुक्त करण्यात आले आहे. आज बाबासाहेब दिल्लीत गेले तर त्यांना राजीव गांधी भेटू शकत नाहीत, मग इंदिराजींची तर बातच सोडा. प्रणव मुखर्जी यांच्याबरोबर त्यांची जी बातचीत झाली त्या वेळी त्यांनी राजिनामा देण्याची इच्छा व्यक्त केली होती. आता प्रत्यक्ष राजिनामा द्या असे त्यांना सांगितले गेले नाही म्हणून बाबासाहेब समाधानी असल्याचे भासवत आहेत. आपल्या राजिनाम्याबाबतच्या बातम्यांनी आपली करमणूक झाली असे ते म्हणत असले तरी त्यांच्या पोटात खड्डा पडला आहे.

आता मुख्यमंत्री हलवायचा म्हणजे थोडा अवधी लागणारच. बाबासाहेबांना हलवले तर कोणाला आणावयाचे याचा प्रथम विचार होणे जरूर आहे. या संदर्भात शंकरराव चव्हाण यांचे नाव घेतले जात आहे. तथापि इंदिराजी त्यांना केंद्रीय मंत्रिमंडळातून मुक्त करण्याच्या मनस्थितीमध्ये नाहीत. आता त्यांना मोकळे करायचे ठरले तर मंत्रिमंडळाची पुनर्रचना होईल त्या वेळीच ते शक्य आहे. अन्य काही नावे इंदिराजींच्या समोर आहेत; पण त्या कोणाची निवड

करतील याचा थांगपत्ता नसल्याने उगाच अंदाजाच्या वावड्या उड-वण्यात कोणालाच रस नाही. बाबासाहेबांची अंतुलेजीचे वारसदार म्हणून निवड झाली त्या वेळी त्याचे नाव कोणी तरी घेतले होते का? केवळ इंदिराजीना वाटले म्हणूनच बाबासाहेब मुख्यमंत्रीपदी विराज-मान झाले. आता दिल्लीचा जोरदार पाठिंबा आणि हाती असलेली सत्ता या सामर्थ्यावर स्वत चे बळ वाढवता येते. बाबासाहेब सत्तेवर असल्यामुळे ज्यांना लाभ मिळणार आहे, सत्तेमध्ये सहभाग मिळणार आहे ती मंडळी बाबासाहेबाची भलावण करीत रहाणार; परंतु दिल्लीमधील पाठिंबा डळमळित झाला की, मुंबईमधील पाठपुरावाही सैल पडू लागतो किंवा हे पाठबळाचे सामर्थ्य आपोआप लुळे-पांगळे बनते. जगन्नाथ पहाडिया याना ज्या वेळी राजस्थानच्या मुख्यमंत्री-पदावरून दूर केले त्या वेळी त्यांना कधी नव्हे इतका स्वपक्षीय आमदारांचा पाठिंबा होता; पण राजस्थानच्या नेतृत्वात बदल करण्याचे निश्चित होऊन पहाडिया यांनी राजीनामा देताच हा सारा पाठिंबा कोठच्या कोठे विरून गेला. कारण प्रस्थापित सत्तेचे समर्थन हीच त्यांना मिळालेल्या पाठिंब्यामागची एकमेव भूमिका होती. पहाडिया यांची सत्ता जाताच हा पाठिंबा विरून गेला. बाबासाहेबांच्या बाबतीतही नेमके हेच होईल. ते सत्तेवर आहेत म्हणून त्यांच्यामागे आज सामर्थ्य आहे सत्ता गेली तर हे सामर्थ्य विरून जाईल!

नेतृत्व रुजवण्यास बाबासाहेबांना अवधी मिळाला नाही अथवा केंद्राची साथ मिळाली नाही असे नाही; परंतु आपल्या ताकदीवर उभे राहण्यात बाबासाहेब यशस्वी ठरू शकले नाहीत. खरे सागायचे तर महाराष्ट्रासारख्या प्रगत राज्याचे नेतृत्व करण्यास जी किमान गुणवत्ता आणि स्वतःचे सामर्थ्य लागते तेच मुळी बाबासाहेबांजवळ नव्हते. संधी मिळाली तरी ती राबवता यावी लागते. महाराष्ट्राचे एक माजी मुख्यमंत्री कन्नमवार यांना ते जमले; पण बाबासाहेबाना ते जमू शकले नाही. त्यांनी सत्ताग्रहण केले त्या वेळीही ते दीर्घकाळ सत्तेवर राहतील असे कोणालाच वाटले नव्हते आणि म्हणूनच त्याना जावे लागले तर त्याचेही कोणाला सोयरसुतक वाटणार नाही. किंबहुना ते जर जास्त काळ सत्ता राबवू शकले तरच तो चमत्कार मानावा लागेल. त्याचे अधिक काळ सत्तेवर राहणे पक्षाच्या हिताचे नाही. बाबासाहेबांची हकालपट्टी व्हावी यासाठी पक्षांतर्गत दडपण प्रतिदिनी वाढत आहे आणि म्हणूनच सुयोग्य वारसदार मिळताच बाबासाहेबाची उचलबांगडी होणे ही आता निश्चित झाल्यासारखी बाब आहे. बाबासाहेब चार–सहा महिन्यांच्या आपल्या कारकीर्दीत किती परावलंबी असावेत याचे काही किस्से आता सागितले जातात. अर्थात असे हे किस्से खरे असतातच असे नाही; परंतु ते असत्य असले तरी पुरेसे बोलके जरूर असतात. मंत्रिमंडळामधील सहकारी निवडणे आणि त्यांचे खातेवाटप, या बाबत इंदिरा काँग्रेसच्या एकाही मुख्यमंत्र्याला आज स्वातंत्र्य नाही. नावांच्या याद्या आणि खाती दिल्लीतच निश्चित होतात. बाबासाहेब त्याला अपवाद असणे संभव-नीय नव्हतेच. मंत्रिमंडळाचे वगैरे एक सोडा; पण बाबासाहेबांना म्हणे स्वतःच्या कचेरीत आपल्या टेबलाची जागा बदलण्याची इच्छा होती. त्या दृष्टीने हालचाल सुरू झाली. तेवढ्यात कोणी तरी म्हटले की, इंदिराजीना हे आवडणार नाही. तावडतोब हे हलवाहलवीचे काम थांबवण्यात आले. आता असा हा मुख्यमंत्री जागी असला काय किंवा बदलला गेला काय, काय फरक पडणार?

## □ खासदार शिवाजी गणेशन

नर्गिस दत्त याच्या निधनानंतर रिकामी झालेली जागा कोणाला द्यावी याबाबत सत्ताधारी पक्षामध्ये विचार चालू असताना दोन नावे समोर आली. पैकी एक होते सुनिल दत्त यांचे आणि दुसरे होते अमिताभ बच्चन यांचे. ही दोन्ही नावे बाजूस सारून इंदिराजींनी शिवाजी गणेशन यांचे नाव निश्चित केले आणि दक्षिणेमधील या ज्येष्ठ अभिनेत्याची राज्यसभेचा खासदार म्हणून नियुक्ती करण्यात आली. यापूर्वी जेमिनी स्टुडिओचे संचालक एस. एस. वासन यांना अशी नेमणूक घेण्याचा बहुमान मिळाला होता. शिवाजी गणेशन यांच्या नावावर चांगले २२६ चित्रपट जमा आहेत. त्यांची राजकीय कारकीर्दही तशी प्रदीर्घ आहे. द्रविड मुन्नेत्र कळघम या तामिळनाडूमधील प्रभावी राजकीय पक्षाचे ते एक संस्थापक सदस्य. पुढे कामराज नाडर यांच्याशी त्यांचे विशेष सूत जमल्यावर त्यांनी काँग्रेस पक्षामध्ये समावेश केला. काँग्रेस पक्षामध्ये जेव्हा फाटाफूट झाली तेव्हा त्यांनी सतत इंदिराजीचे समर्थन केले.

विलुपुरम चिनय्या गणेशन हे त्यांचे मूळ नाव. तंजावर जिल्ह्यामध्ये त्याचे वडील थोडीफार शेती करत असत. पुढे त्यांनी रेल्वेमध्ये काही काळ नोकरी केली. शिवाजी गणेशन यांना अभिनयाची प्रथमपासूनच आवड होती. प्रथम त्यांनी अभिनेता म्हणून रंगमंचावर नाव मिळवले. १९५२ साली त्यांचा पराशक्ती हा चित्रपट पडद्यावर आला. त्यानंतर त्यांनी चित्रपटसृष्टीत झपाट्याने यश मिळवले. तामीळ चित्रपटामधील मागच्या पिढीमधील अग्रगण्य अभिनेते म्हणून त्याचे नाव घेतले जाते. आज त्याचे वय ५४ वर्षांचे आहे. दोन मुले, दोन मुली, जावई व सहा नातवंडे अशा कौटुंबिक परिसरामध्ये ते आपले दैनंदिन जीवन मोठ्या मजेत व्यतीत करत असतात. खासदार म्हणून नेमणूक झाल्याबर शिवाजी गणेशन यांनी राज्यसभेच्या अधिवेशनास हजेरी लावली असता पत्रकारानी त्यांची भेट घेऊन त्यांच्याशी बातचीत केली. त्यांना विविध विषयांवर प्रश्न विचारण्यात आले. त्यापैकी काही विशेष महत्त्वाच्या प्रश्नांची नोंद येथे करत आहे.

**प्रश्न:** राज्यसभेवर आपली नेमणूक होईल असे वाटले होते का? राज्यसभेवरील नेमणुकीबाबत आपल्याला काय वाटते?

**उत्तर:** प्रत्यक्ष घोषणा होण्याच्या आधी केवळ एक दिवस मला माझी राज्यसभेवर नेमणूक होत असल्याचे माझ्या पक्षाकडून कळवण्यात आले. मी चित्रपटामधील कामे सांभाळून राजकारण करत असल्याने राज्यसभेसाठी माझी निवड होईल असे मला वाटले नव्हते. तथापि एका मोठ्या व्यवसायाचे प्रतिनिधित्व करण्याच्या दृष्टीने माझ्या नावाचा विचार झाला असावा. ही जबाबदारी पार पाडण्यास मी समर्थ आहे असे माझ्या पक्षाच्या ज्येष्ठ नेत्यांना वाटावे, हा मी माझा मोठा बहुमान समजतो. राज्यसभेचे एक अधिवेशन मी काळजीपूर्वक अभ्यासले आहे. वातावरण नवीन आहे; पण मला असे वाटते की, दिल्लीमध्ये मी बऱ्यापैकी मिसळू शकेन.

**प्रश्न:** राज्यसभेच्या कामकाजाबद्दल आपली प्रतिक्रिया काय आहे?

- उत्तर : मी काही वेळा राजकीय व्यासपीठावरून बोललो आहे, निवडणूक सभांमधून भाषणे केली आहेत; परंतु त्या सभेमधील सहभाग वेगळा आणि संसदीय कामकाजाच्या चौकटीमध्ये नेमक्या वेळात व नेमक्या शब्दात आपले मत व्यक्त करणे वेगळे. त्या दृष्टीने येथे शिकण्यासारखे पुष्कळच आहे. येथे होणाऱ्या वादळी चर्चेलाही एक शिस्त असते. पुरेशी तयारी झाल्यावर राज्यसभेच्या कामकाजात भाग घेणे मला आवडेल. देशाला भेडसावणाऱ्या महत्त्वपूर्ण प्रश्नांवर निर्णय घेणाऱ्या या गृहाच्या कामकाजाबद्दल मला पुष्कळच उत्सुकता होती. लोकशाही यंत्रणेचे हे एक महत्त्वपूर्ण श्रद्धास्थान आहे.

प्रश्न : राज्यसभा-सदस्य या नात्याने आपण कोणती कामगिरी करू इच्छिता ?

उत्तर : एका सदस्याला येथे फारसे काही करता येत नाही. तथापि मी ज्या व्यवसायाशी निगडित आहे त्या चित्रपटव्यवसायासमोर अनेक गंभीर समस्या आहेत. माझ्यापरीने मी या समस्या सोडवण्यासाठी प्रयत्नशील राहीन. मी आता वारंवार दिल्लीमध्ये येणार असल्याने मला माहिती व नभोवाणी खाते तसेच अर्थखात्याशी प्रत्यक्ष संपर्क साधता येईल. एक मात्र नक्की सांगतो की, गृहाच्या कामकाजाची एकदा माहिती करून घेतली की, कामकाजामध्ये प्रत्यक्ष सहभागी होणे मला आवडेल. त्यासाठी जो अभ्यास करावा लागेल, वेळ द्यावा लागेल त्याची तयारी मी ठेवली आहे. केवळ मुका सदस्य बनून सहा वर्षांचे हे सदस्यत्व व्यतीत करणे मला आवडणार नाही.

प्रश्न : चित्रपटकलाकारांनी क्रियाशील राजकारणामध्ये सहभागी होणे आपल्याला कितपत योग्य वाटते ?

उत्तर : हा निर्णय ज्याचा त्यानी घ्यायचा आहे; परतु वकील, डॉक्टर आणि अन्य व्यावसाइक जर राजकारण करू शकतात तर चित्रपटव्यावसाइकांनी त्यापासून दूर रहावे असे म्हणणे योग्य नाही; परंतु ज्या कलाकाराना क्रियाशील राजकारणामध्ये सहभागी व्हायचे आहे त्यानी पुरेसा वेळ राजकारणासाठी द्यावा असे मला वाटते. केवळ स्टंट म्हणून काही करू नये. राजकारणामध्ये यायचे की नाही आणि यायचे ठरवल्यास कोणत्या पक्षाचे काम करायचे हे ज्याचे त्याने ठरवायचे आहे.

प्रश्न : आपण राजकारणामध्ये कसे ओढले गेलात ?

उत्तर : मी कलाकार म्हणून काम करत असताना माझा कै. अण्णा दुराई, श्री. रामस्वामी नायर, एम. करुणानिधी यांच्याशी संबंध आला आणि मी अगदी सहजगत्या द्रविड कळघमच्या राजकारणात ओढला गेलो. द्रविड कळघमने एकातिक भूमिका घेतल्यावर अण्णा दुराई व करुणानिधी यांनी थोडे सौम्य धोरण असलेला द्रविड मुन्नेत्र कळघम हा पक्ष काढला आणि मीही त्याच्याबरोबर या नवीन पक्षाच्या कामामध्ये सहभागी झालो. पुढे कामराजजींचा सहवास मिळाल्यावर प्रादेशिक पक्षापेक्षा राष्ट्रीय पक्षामध्ये सहभागी होणे मला सयुक्तिक वाटले व मी १९५५ मध्ये काँग्रेसप्रवेश केला. आजतागायत मी या पक्षाशी एकनिष्ठ असून पक्षबदलाचा कोणताही विचार माझ्या मनात नाही.

प्रश्न : तामीळनाडू सरकारच्या कामकाजाबद्दल आपण समाधानी आहात का ?

उत्तर : काही खास प्रतिक्रिया नाही; परंतु या सरकारने शाळेमधील मुलाना एक वेळचे जेवण देण्याची जी योजना राबवली आहे ती स्वागतार्ह आहे. तथापी आर्थिकदृष्ट्या ती राबवणे कितपत परवडणारे आहे याबाबत मी साशंक आहे.

प्रश्न : इंदिरा कांग्रेसला तामिळनाडूमध्ये कितपत भवितव्य आहे ?

उत्तर : मला वाटते गेल्या लोकसभा-निवडणुकीच्या वेळी या प्रश्नाचे उत्तर मिळाले आहे. तेथील दोन्ही प्रादेशिक पक्षांना आमच्या पक्षाच्या सहकार्याची गरज भासते. अण्णा टी. एम. के. हा पक्ष आज तेथे सत्तेवर असला तरी आमच्या पक्षाशी त्याचे मैत्रीचे संबंध आहेत. राष्ट्रीय पक्षांपैकी एक काँग्रेस पक्ष सोडला तर अन्य कोणाला तामिळनाडूमध्ये थारा नाही. काही काळ प्रादेशिक पक्षाशी जमवून घ्यावे लागले तरी काँग्रेससारख्या राष्ट्रीय पक्षाला तेथे स्वतःच्या ताकदीवर उभे रहावेच लागेल. प्रादेशिक पक्षाशी कोणतेही संबंध ठेवताना ही गोष्ट ध्यानात घेणे आवश्यक आहे.

प्रश्न : प्रादेशिक पक्षांचा प्रभाव दक्षिणेमधील राज्यातून वाढतो आहे याचे कारण काय ?

उत्तर : केंद्रशासनावर प्रामुख्याने हिंदी भाषिकांचा प्रभाव असतो. आपण राष्ट्रीय पातळीवर सत्तेमधील एक वाटेकरी नसून आपल्यावर कोणी तरी परके राज्य करीत आहेत अशी भावना जनमानसात रुजवण्यात प्रादेशिक पक्ष यशस्वी झालेले आहेत. काही घिसाडघाईने घेतलेले निर्णय हा समज पक्का करतात. अगदी अलीकडचे उदाहरण द्यायचे झाले तर अचानक ऑल इंडिया रेडिओचे आकाशवाणी असे नामकरण लादण्याचा जो प्रयोग झाला त्याचे उदाहरण देता येईल. स्वत: पंतप्रधानांनी वेळीच हस्तक्षेप केल्याने दक्षिणेमध्ये उद्रेक झाला नाही.

प्रश्न : दक्षिणेकडील चार राज्यांपैकी केवळ तामिळनाडूमध्ये हिंदीला विलक्षण विरोध असल्याचे आढळते, असे का ?

उत्तर : असा विरोध असण्याचे कारण नाही असे मला वाटते; पण हिंदी लादले जात असल्याची भावना तेवती ठेवल्याने तामिळनाडूमध्ये हिंदीला तिखट विरोध आहे खरा.

प्रश्न : प्रादेशिक पक्षांच्या भवितव्याबद्दल आपले काय मत आहे?

उत्तर : छान ! त्याच्या सध्या तरी छान चालले आहे ! □


# टॉलस्टॉय — एक माणूस

दुसरी आवृत्ती

लेखिका : सुमती देवस्थळे

किंमत : ५५ रुपये

राजहंस प्रकाशन, १०२५ सदाशिव, पुणे ३०

३१ जुलै अंकात 'सूर्य' मासिकाच्या पुर्नविक्रीच्या वेळी पंतप्रधानांच्या घरी डॉ. जैन आणि धीरेंद्र ब्रह्मचारी यांची झटापट आपण वाचलीत !

डॉ. जैन यांना ब्रह्मचारी म्हणाले होते, 'मी कोणतीही गोष्ट घडवून आणू शकतो. कोणताही मंत्री किंवा सचिव मला 'नाही' म्हणू शकत नाही !'......

# ब्रह्मचारीने आपल्या जन्मगावात घातलेला धुमाकूळ!

उत्तर बिहारमध्ये मधुबनी नावाचा एक सुंदर जिल्हा आहे. या जिल्ह्यातल्या बेनीपत्ती भागातले हजारो लोक चिडलेले आहेत. लोकांच्या धुमसणाऱ्या संतापाचं कारण आहे एक योगी. संतापलेले लोक हा योगी समोरासमोर कधी भेटेल याची वाटच पहात आहेत; पण या भेटीसदेखील एक बारीक अडथळा आहे. कारण हा योगी म्हणजे एक प्रतिष्ठित, प्रसिद्ध नागरिक आहे. तो लांब नव्या दिल्लीत रहातो आणि अतिशय शक्तिशाली अशा मंत्र्यांची आणि राजकारणी लोकांची त्याला खूष ठेवण्यासाठी सतत स्पर्धा चाललेली असते. तुम्ही कोणत्याही वेळेला गेलात तरी त्याच्या ऑफिसच्या बाहेर अनेक महागड्या गाड्यांची रांग लागलेली दिसते. धंद्याचे व्यवहार पक्के करून जिथे कायमचं नशीब घडवता येतं, त्या सत्तेच्या मार्गात या माणसाच्या पुसटशा मंद स्मितानं सुद्धा आश्चर्यकारक बदल घडू शकतात. त्याच्या अतिशय उदार अशा कुळांकडून तो अतिशय किमती वस्तू भेटीदाखल घेतो, ज्याची आपल्याला कल्पनाही करता येणार नाही ! उदाहरणार्थं, मर्सिडीझ किंवा बेंझ गाड्या, वेगवेगळी विमान इत्यादी सत्ता-संपत्तीशी ज्यांचा संबंध आहे अशा अनेक प्रसिद्ध आणि प्रबल व्यक्तींना हा माणूस योग शिकवतो. त्याचे विद्यार्थी, मित्र आणि स्नेह्यांच्या वर्तुळात पंतप्रधान इंदिरा गांधी आणि राजीव गांधी यांचाही समावेश आहे. हा योगी कसा आहे ? तो नेहमी पांढऱ्या मलमलच्या कपड्यात असतो. त्याची दाढी अखंड रुळत असते.

स्वामी धीरेंद्र ब्रह्मचारी ही खरोखरच एक प्रबळ असामी आहे, याची बेनीपत्ती भागातल्या लोकांनी खूणगाठ बांधली आहे. खरं तर ब्रह्मचारी हा त्यांच्यातलाच एक. बेनीपत्ती भागातच त्याचा जन्म आणि बालपण गेलं. बसैथ चनपुरा या गावात सत्तावन्न वर्षांपूर्वी त्याचा जन्म झाला. चनपुऱ्याचं वेगळं वैशिष्ट्य असं काही नाही. ग्रामीण भागातल्या इतर चार खेड्यांसारखंच तेही आहे. चनपुरा, तिथल्या चित्रकलेच्या नाजूक शैलीसाठी आणि गर्विष्ठ आणि अहंमन्य मैथिली ब्राह्मणाच्या जातीसाठी प्रसिद्ध आहे.

भारताच्या उत्तर सीमेवरील हिमालयाच्या रांगातून खाली कोसळणाऱ्या नऊ मुसळधार नद्यांचा अधवारासमूह मात्र चनपुरा आणि त्याच्या आजूबाजूच्या खेड्यांना त्रासदायक ठरत आहे. या नद्यांना दरवर्षी प्रचंड पूर येतो आणि चनपुरा आणि जवळची खेडी पार उध्वस्त होऊन जातात ! शेकडो वर्षांपासून मधुबनी आणि त्याला लागून असलेले उत्तर बिहारचे काही जिल्हे या नद्यांच्या भक्ष्यस्थानी पडत आहेत. दरवर्षी पिकांचं अतोनात नुकसान होतं आणि भारत–नेपाळ सीमेवरच्या दोन्ही बाजूंना वसलेल्या हजारो खेड्यांतील स्थावर मालमत्तेची नासधूस होते. पावसाळ्यात नद्यांना पूर येतो, तेव्हा या खेड्यांचा बाहेरच्या जगाशी संपर्क तर पूर्ण तुटतोच; पण राहती घरंसुद्धा डोळ्यांदेखत पाण्याखाली जातात ! सत्तरच्या सुमाराला सरकारनं यासाठी एक 'अधवारा पूरनियंत्रण योजना' तयार केली होती. पुराने त्रासलेल्या लोकांच्या आशा अर्थातच उंचवल्या; पण नंतर मात्र या उंचावलेल्या आशा पार जमीनदोस्त झाल्या ! खरं तर पुराच्या पाण्यात पार बुडून मेल्या. कारण पुरेशा पैशाच्या अभावी हा 'अधवारा' योजना उभी करायला बिहार सरकार असमर्थ होत. सध्या चनपुरा आणि आसपासच्या खेड्यातली परिस्थिती 'जैसे थे'च आहे. पुराच्या पाण्यापासून रक्षण करू शकेल असा त्राता अजून तरी या असहाय्य खेड्यांना मिळालेला नाही !

चनपुरा हे धीरेंद्र ब्रह्मचारीचं जन्मगाव. जन्मस्थान आणि तिथे घालवलेलं बालपण याशिवाय ब्रह्मचारीला चनपुऱ्याबद्दल विशेष आकर्षण वाटावं असं काहीच नाही आणि आता तो ज्या सत्ताधारी माणसांच्या वर्तुळात प्रभाव टाकून आहे, त्यांच्यात राहून बिहार-मधल्या या छोट्याशा खेड्याचा–चनपुऱ्याचा–त्यानं विचार करावा असं काहीच नाही; पण अचानक या लहरी असामीचं जन्मगावा-बद्दलचं प्रेम उफाळून आलं. आपल्या लहरी राबवायला त्याच्याजवळ माणसांची अगर पैशाची कमी नव्हतीच. तर धीरेंद्र ब्रह्मचारीला एकाच कल्पनेनं पछाडलं की, गांवठळ चनपुऱ्याचं एकदम एखाद्या चकचकीत आदर्श गावात रूपांतर करायचं ! कसं ? तिथे स्वच्छ, गुळगुळीत सिमेंटचे प्रशस्त रस्ते असतील. शाळा, कॉलेजं, एक खास योगविद्यापीठ, आधुनिक शेतं, कारखाने, लायब्ररी आणि एक 'टू स्टार' हॉटेलसुद्धा असेल ! एवढ्यावरच आश्चर्यचकित होऊ नका, स्वामीच्या 'आदर्श गावा'च्या या उधळ्या, बेताल प्रकल्पात एका हेलिपॅड'चीही योजना होती. हे सगळं साध्य करणं स्वामीला अशक्य तर नव्हतंच; पण घाईघाईनं घेतलेल्या निर्णयात स्वामींनी

निसर्गाच्या शक्तीचा मात्र विचार केला नाही. स्वामीची ही चूक महाग पडली आणि कोसळणाऱ्या पावसाच्या माऱ्यापुढे स्वामीचा लाडका प्रकल्प पार वाहून जायला लागला! स्वामीनं बराच विचार केल्यावर लक्षात आलं की, दरवर्षी पुराच्या पाण्याबरोबर वाहून जाणाऱ्या चनपुऱ्याचं रक्षण केल्याशिवाय त्याचं आदर्श गावात रूपांतर करणं केवळ अशक्यच आहे. आपली लहरी योजना राबवण्यासाठी स्वामीवर आता चनपुऱ्याचं रक्षण करण्याची जबाबदारी येऊन पडली.

खुद्द स्वामीनीच या प्रश्नात लक्ष घातल्यावर चनपुऱ्यातल्या लोकांना वाटलं की, सत्तर साली बारगळलेली 'अधवारा पूरनियंत्रण' योजना आता तरी जरा तग धरेल आणि स्वामीला खूष ठेवण्यासाठी तरी बिहार सरकारडून ही योजना व्यवस्थित राबवली जाईल; पण इतकं सरळ होणार नव्हतं. 'अधवारा' सारखी दीर्घकाळ, जबाबदारीची आणि जिकिरीची योजना हातात घेण्याऐवजी ब्रह्मचारीला खूष ठेवण्यासाठी बिहार सरकारनं त्यांच्या 'इरिगेशन' विभागाला फक्त चनपुऱ्याभोवती एक बांध बांधण्याचा आदेश दिला. चनपुरा सोडून इतर सर्व खेडी पुराच्या स्वाधीन करण्यात बिहार सरकारने कोणतीही गय केली नाही. चनपुऱ्याभोवती २२ लाखांचा वर्तुळाकार बांध बांधण्याची योजना ही अशा एका माणसाच्या लहरीतून निर्माण झाली!

## आडमुठेपणा

सुरुवातीला बांधाची योजना जेव्हा पुढे मांडण्यात आली, तेव्हा संपूर्ण चनपुऱ्याच्या पूर्व आणि पश्चिम अशा दोन्ही भागाचा योजनेत विचार केला होता. जेव्हा बांधकामाचे नकाशे (blueprints) राज्याच्या इरिगेशन विभागाच्या अधिकाऱ्यांनी ब्रह्मचारीला दाखवले तेव्हा ब्ल्यू-प्रिंटची पहाणी करता-करता त्याने एक पेन्सिल उचलली आणि चनपुऱ्याच्या पूर्वभागाभोवती एक लाल वर्तुळ आखलं. ही गोष्ट पटण्याच्या राजकीय वर्तुळातले लोक शपथेवर सांगतात. ब्रह्मचारीच्या या लाल वर्तुळामुळं २२ लाखांच्या बांधकामाचं रूप बदलायला सांगितलं गेलं. बांधाचं हे सुधारित रूप आता चनपुऱ्याच्या पूर्व भागातल्या फक्त पाचशे एकर जमिनीला पुराच्या धडकेपासून वाचवू शकेल. बांधाचं काही बांधकाम पूर्ण झाल्यावर स्वामीनी ते लाल वर्तुळ आखलं. स्वामीच्या इच्छेनुसार जेव्हा इंजिनिअर्स बांधकामाची alignment बदलायला लागले तेव्हा चनपुऱ्याच्या पश्चिम भागातल्या चौकस गावकऱ्यांनी कामावर हजर असलेल्या कार्यकारी अभियंत्याकडे हा बदल कोणत्या कारणांसाठी केला जात आहे, याची चौकशी केली. कार्यकारी अभियंत्यानं पहिल्यांदा कारणं सांगायला का कू केलं; पण गावकऱ्यांनी जास्त पिच्छा पुरवला तेव्हा त्यानं गावातल्या काही प्रमुख माणसांना सांगितलं की, या योजनेत प्रत्यक्ष स्वामींनीच ढवळाढवळ केली आहे आणि फक्त पूर्वभागाभोवती बांध घालण्याचा हुकूमही त्यांच्याच आहे. ब्रह्मचारीशिवाय हा आडमुठेपणा कोणी करणार नाही याबद्दल गावातल्या लोकांचं दुमत नव्हतंच. या बांधाचा धसका घेतलेल्या गावातल्या लोकांनी शेवटी कायद्याचा आश्रय घेण्याचं ठरवलं. बांधाचं बांधकाम थांबावं म्हणून पश्चिम भागातल्या लोकांनी पटना हायकोर्टाकडे अगदी शेवटच्या क्षणी लेखी अर्ज दिला.

फिर्यादीतल्या प्रतिवाद्यांच्या नामावलीत ब्रह्मचारीचं नाव अर्थातच मुख्य होतं.

बंड आता सुरू होणार होतं, निशाणी चनपुऱ्यातल्या लोकांनी दाखवली होती.

चनपुऱ्याच्या आजूबाजूच्या खेड्यातल्या लोकांनी पश्चिम भागातल्या रहिवाश्यांना तात्काळ पाठिंबा दिला. लगेचच एक शिष्टमंडळ घेऊन ते पटण्याला गेले आणि इरिगेशन विभागाचे मुख्य अभियंता–सचिव (Chief Engineer-Cum-Secretary) यांची, तसेच मुख्यमंत्री जगन्नाथ मिश्रा यांचीही त्यांनी भेट घेतली. दुखावलेल्या रहिवाश्यांनीकेलेली कायदेशीर लेखी विनंती दोघांनीही वाचली आणि दोघांनीही सांगितलं की, 'आमचे हात बांधलेले आहेत. आम्हाला स्वामींनी दिलेल्या आदेशाप्रमाणेच वागायला हवं. आमची सहानुभूती मात्र तुमच्याच पाठीशी आहे!' या पोकळ सहानुभूतीचा चनपुऱ्यातल्या दुखावलेल्या लोकांना मात्र काही उपयोग होऊ शकला नाही!

पटण्यातल्या काही सहृदय इंजिनिअर लोकांकडून गावातल्या माणसांना अशी माहिती कळली की, या वर्तुळाकार बांधामुळे सुमारे वीस खेडी अंदाजे १२ फूट पाण्याखाली जाणार आहेत. या दुर्दैवी खेड्यांत माधोपूर, घनुखी, तराई, हथिवारा, पिलवारा, राईबाटोला, बेहटा; राजघाट, पोखरभिरा, किशनपूर, तिरमोहन सुजातपूर, बान्ही, प्रारी, फुलवारिआ, बालचा आणि तिखारा या खेड्यांचा समावेश आहे. पूर्व भागाभोवती बांध घालून ब्रह्मचारीनं त्याची जागा अक्षरशः इंचाइंचानं वाचवली. यापुढची गोष्ट बांधासाठी घेतलेली जागा ही इरिगेशन विभागाकडून कायदेशीर मार्गानं मिळवलेली नसून ब्रह्मचारीच्या नेहमीच्या पद्धतीनं जबरदस्तीनं बळकावलेली आहे आणि ज्यांच्या जमिनी हिसकावून घेण्यात आल्या त्यापैकी एकाही माणसाला नुकसानभरपाई म्हणून आजपर्यंत एक पैसाही दिलेला नाही!

एप्रिल १९८२ मध्ये पश्चिम भागातल्या लोकांनी शेवटी कोर्टाकडे धाव घेतली. लेखी अर्जात म्हटलं आहे, 'धीरेंद्र ब्रह्मचारी जो सत्तर साली आकर्षक व्यक्तिमत्त्व घेऊन उदयाला आला आणि राजधानीतल्या प्रतिष्ठित व्यक्तींवर जो प्रभाव टाकून आहे,' अशा एका माणसाच्या लहरीखातर बिहार सरकारनं हजारो लोकांच्या जीवनमरणाचा आणि मालमत्तेचा खेळ मांडला आहे! अर्जात त्यांनी अशीही तक्रार केली आहे की, दुखावलेले नागरिक मधुबनीच्या जिल्हा मॅजिस्ट्रेट आणि इरिगेशन विभागाच्या मुख्य अभियंत्यांना भेटले; पण 'ब्रह्मचारीच्या आकर्षक व्यक्तिमत्त्वाच्या प्रभावापुढं दोघांनी आपण हतबल असल्यचं दाखवून दिलं.'

स्वामीनी केलेल्या ढवळाढवळीचा उल्लेखही या अर्जात आहे. 'धीरेंद्र ब्रह्मचारी हेलिकॉप्टरमधून चनपुऱ्यात उतरले. पाटबंधारे विभागानं तयार केलेल्या नकाशावर त्यांनी एक वर्तुळ आखलं आणि कोणत्याही तांत्रिक अडथळ्याची शक्यता गृहीत न धरता बांधाचं बांधकाम पूर्ण करण्याचा त्यांनी हुकूम दिला.' शेवटी अर्जात एक महत्त्वाचा मुद्दा मांडला आहे, 'जनहिताच्या योजना एखाद्या विशिष्ट व्यक्तीच्या लहरी आदेशानुसार, मग ती छोटी असो अगर मोठी, न राबवता तज्ज्ञांकडून याचा विचार केला जावा!'

बांधामुळे ज्या लोकांना महापुराचा तडाखा बसणार आहे त्या सर्वांनी एकत्र येऊन 'ग्रामसुरक्षा समिती' स्थापन केली. समितीचे

सचीव दुखरान चौधरींनी ' संडे ऑब्झर्व्हर 'च्या बातमीदाराना सांगितलं, ' बाधाचं काम थाबवणं हेच आमचं प्रमुख उद्दिष्ट आहे. लोक संतापलेले आहेत. एक वेळ अशी येईल की, सगळे गावकरी बाधावर चालून जातील आणि सगळी तोडफोड करून टाकतील. आजच्या घडीला मात्र आम्ही आमच्या आशा पटना हायकोर्टाच्या चागुलपणावर आणि सुज्ञ न्यायाधिशांवरच केंद्रीय केल्या आहेत. ब्रह्मचारीनं घेतलेला पवित्रा मोडून काढण्यासाठी आम्ही अगदी वाट्टेल ते करू ! आकाशातून नक्षत्रं खेचून आणू, पण त्याला तस करू देणार नाही! आम्ही आमच्या जीवन–मरणासाठी लढतो आहोत! ...'

३–४ महिन्यांपूर्वी सुरक्षा समितीनं बंधाऱ्याच्या बाधकामाविरुद्ध एक अहिंसक आंदोलन सुरू केलं होतं. शेकडो स्त्री–पुरुष आणि मुलं आपलं दु:ख व्यक्त करण्यासाठी छाती पिटत आणि हातातले फलक उंचावत घराबाहेर पडली आणि बाधकामाच्या ठिकाणावर गेली. बांधकाम त्यामुळं थांबवण्यात आलं. पावसाळा सुरू होण्यापूर्वी बांधकामावर शेवटचा हात फिरवण्याच्या तयारीत असलेला बाधकाम-कॉन्ट्रॅक्टर स्थानिक व्यवस्थापकांकडे मदत मागण्यासाठी गेले. घाईघाईनं पोलीसदल घटनास्थळी बोलावलं गेलं.

बांधकामाच्या निषेधार्थ रस्त्यावरच बसकण मारून बसलेल्या आदोलकांना हाकलण्यासाठी बिहार पोलिसांनी सहा वेळा लाठीमार केला. पश्चिम भागातल्या परिस्थितीची चौकशी करण्यासाठी बातमीदार गेला तेव्हा कित्येक लोकानी पोलीस–मारहाणीच्या जखमा दाखवल्या. सरकारनं १४४ कलम या भागात जारी केलं आणि १०७ कलमाखाली गावातल्या २४ माणसाना अटक केली. पोलिसी कुमक जर काढून घेतली तर बांधकाम थाबवता येईल असं गावातले लोक सांगतात. ' तणावपूर्ण परंतु आटोक्यात आणण्याजोगी ' अशा शब्दात मधुबनी जिल्ह्याचे मॅजिस्ट्रेट अनिलकुमार सिंग आणि पोलीससुपरिटेंडेंट रणजितसिग यांनी सध्याच्या परिस्थितीचं वर्णन केलं आहे.


सामाजिक चळवळीच्या इतिहासाविषयी आस्था असणाऱ्या सर्वांना हे पुस्तक वाचावस वाटल्याशिवाय राहणार नाही.
—डॉ. य. दि. फडके

**महाडचा मुक्तिसंग्राम**

लेखक : प्रा. रा. म. बिवलकर
प्रा. झुंबरलाल कांबळे

मूल्य : वीस रुपे

राजहंस प्रकाशन, पुणे ३०.


### लक्ष्मण–स्वामीचा चेला

सध्या चनपुऱ्यातली धीरेंद्र ब्रह्मचारीची गादी त्याचा पुतण्या लक्ष्मण चौधरी चालवतो आहे. काही वर्षांपूर्वी ब्रह्मचारीनं बाधलेल्या अपर्णा आश्रमाच्या स्थानिक शाखेचा लक्ष्मण मॅनेजिंग डिरेक्टर आहे. योगाचा प्रसाद हे अपर्णा आश्रमाचं काम आहे असं म्हणतात. लक्ष्मणलाही बाधकाम लवकरात लवकर करून घेण्याच्या कल्पनेनं पछाडलं आहे. आंदोलकाना मोडून काढण्यासाठी लक्ष्मणनं मारहाणही केली. बांधकामावर स्थानिक कामगारांनी बहिष्कार टाकला आहे. त्यामुळे लक्ष्मण सध्या कामगार बाहेरून आणतो. या नाखूष कामगारांना कॉन्ट्रॅक्टर पैशाची लालूच दाखवून काम करवून घेतो. पैसा अर्थातच अपर्णाश्रमाकडून पुरवला जात आहे. बांधकाम पूर्ण झाल्यावर पोलिसअधिकारी, कॉंट्रॅक्टर आणि कामगार–अशा बांधकामातील सर्व संबंधित माणसांना अपर्णा आश्रमाकडून मोठी बक्षिसं वाटण्यात येणार आहेत.


आंदोलकांनी निर्वाणीचा उपाय म्हणून पंतप्रधान आणि राष्ट्रपतीना तारा करून या प्रश्नात लक्ष घालण्याबद्दल सुचविलं; पण ब्रह्मचारीनं चनपुऱ्यात घातलेल्या धिंगाण्याबद्दल दिल्ली अजूनही बेफिकीरच आहे. स्थानिक इंदिरा काँग्रेसच्या योगेश्वर झा (MLA) आणि हितनारायण झा (MLC) या दोघांनी हा वाद मिटवून टाकायचा प्रयत्न केला. तर CPM च्या लोकांनी आंदोलकांच्या बाजूला वजन टाकायचं ठरवलं. कोणत्याही परिस्थितीत ब्रह्मचारीची योजना तडीला जाणार नाही अशी घोषणा CPI च्या भोगेंद्र झा यांनी केली. तसं पहाता मधुबनी जिल्ह्यात सध्या CPI चा बराच जोर आहे आणि ब्रह्मचारीला निष्प्रभ करण्यासाठी अतिशय गंभीरपणे तेही राजकीय खेळी खेळत आहेत. CPI बरोबरच BJP सुद्धा आता आंदोलकांच्याच बाजूनं ठामपणे उभा आहे. २४ एप्रिलला अटलबिहारी वाजपेयी यांनी चनपुऱ्यात एक प्रचंड जाहीर सभा घेतली आणि या बांधकामाविरुद्ध चनपुऱ्यात अधिक उग्र आदोलन उभं करून ही योजना मोडून काढा असा आदेश दिला.

लक्ष्मण चौधरी म्हणतो की, अगदी मुख्यमंत्रीसुद्धा या बांधकामाविरुद्ध ब्र काढू शकणार नाहीत. तो म्हणतो, लवकरात लवकर बांधकाम पूर्ण करण्याचा आदेश दिल्लीतून केव्हाच आला आहे. गावातले लोक सागतात की, आंदोलन सुरू झाल्यापासून दोन वेळा ब्रह्मचारी चनपुऱ्याची पहाणी करून गेला. जिल्हा मॅजिस्ट्रेट अनिलकुमार सिंगशी स्वामीचं सधान असल्याचंही कळत. पटण्यातले CPI चे लोक सांगतात की, १ जूनला स्वामी चनपुऱ्यात आला आणि मुख्यमंत्री जगन्नाथ मिश्राशी त्याने बाधकामातल्या अडचणीची चर्चा केली. ' लवकरात लवकर बाधकाम पूर्ण करू ' असं आश्वासन मुख्यमंत्र्यांनी त्याच वेळी दिलं. मिश्रा आश्वासन पूर्ण करू शकले नाहीत; पण दिल्लीहून ब्रह्मचारीच्या ताज्या हुकुमाची ते वाट पहात आहेत !

आणीबाणीच्या काळातल्या धीरेंद्र ब्रह्मचारीच्या हालचालींबद्दल शहा कमिशनने म्हटले आहे, ' सहजतेनं ब्रह्मचारी एकामागून एका मंत्रिमंडळाचा पाडाव करत होता. संपूर्ण व्यवस्थापन एका माणसाच्या तालावर कसं नाचू शकतं याचं हे उत्तम उदाहरण आहे. □

(संडे ऑब्झर्व्हर, दिनांक १८ जुलै अकावरून साभार)

रूपांतर–मेधा देशपांडे



सेक्स आणि हायोलन्सचं
मला आकर्षण नाही.
तसंच ' नॉशिया 'पण नाही.

# गप्पा

## कमलाकर सारंग / सुरेश खरे

१९५९ साल. आज तेवीस वर्षं झाली. त्या वेळी मी कॉलेजात होतो. रविवारी मॉर्निंग शो न चुकता पहायचा हा नियम. एका रविवारी एका थिएटरला एक कॉलेजातला दुसरा मुलगा दिसला. पुढच्या रविवारी मी ज्या थिएटरला त्याच थिएटरला तो. तिसऱ्या रविवारी तसंच. अर्थात मग ओळख होणं अपरिहार्य होतं. त्याची पुढे मैत्री केव्हा झाली ते समजलंच नाही. दोघांनाही एकाच वेडानं झपाटलेलं, ' नाटक '. कमलाकर सारंग नावाचा तो काडकुळा तरुण मराठी घेऊन बी. ए. करीत होता. नाटकांत कामं सुंदर करायचा. प्रेमकाव्यही अतिशय सुंदर करायचा. त्याच्याविषयी मला फार आदर. कारण तो माझ्यापेक्षा जास्त अनुभवी होता. मी आयुष्यात प्रथम तीन अंकी नाटकात काम केलं ते त्याच्या दिग्दर्शनाखाली. माझं पहिलं लेखन जे एकांकिकेच्या स्वरूपात रंगभूमीवर आणलं ते सारंगनीच. तेव्हापासून आमचा प्रवास जवळजवळ बरोबरच चालू आहे. त्यानं दिग्दर्शनावर लक्ष केंद्रित केलं तर मी नाट्यलेखनावर, इतकाच फरक. या प्रतिभाशाली दिग्दर्शकाला ' माणूस 'मध्ये सादर करायचं मी ठरवलं. सारंग गप्पा मारताना आजूबाजूचं खूप बोलतात. या जरी गप्पा असल्या तरी ही मुलाखत आहे हे त्यानं विसरू नये म्हणून माझा पहिलाच प्रश्न मी एखाद्या धंदेवाईक मुलाखतकारासारखा फेकला.........

: सारंग, तुमची खऱ्या अर्थानं नाट्यजीवनाला सुरुवात केव्हा झाली ?


: भारतीय विद्याभवनमध्ये. दामू केंकरे, विजया मेहता, नंदकुमार रावते, आनंद पै वगैरे मंडळी तेव्हा त्या ग्रुपमध्ये होती. तिथे श्रीमंत नाटकांत, तेंडुलकरांच्या, मी डॉक्टरची भूमिका केली होती. त्यानतर पुढे ललित–कलाकेंद्रात तीन अंकी हॅम्लेटमध्ये, साहित्य संघाच्या मेजर चंद्रकांत, पतो गेले ग काठेवाडी अशा बऱ्याच नाटकांत भूमिका केल्या.

: आणि त्यानं तुम्हाला नावही मिळालं; पण तेव्हा तुम्ही दिग्दर्शन करीत नव्हता. तुमचं पहिलं तीन अंकी नाटकाचं दिग्दर्शन कोणतं ?

: आंतरमहाविद्यालयीन स्पर्धेत ' माणूस नावाचं बेट ' मी दिग्दर्शित केलं होतं. त्यात प्रमुख भूमिकाही केली होती. त्याला प्रथम पारितोषिक मिळालं होतं. तुम्हीही त्या नाटकात एक महत्त्वाची भूमिका केली होती.

: माझी ती तीन अंकी नाटकातली पहिलीच भूमिका. म्हणजे तुमचं जे पहिलं दिग्दर्शन त्यातच माझी पहिली भूमिका हा एक योगायोग; पण पुढं वेगवेगळ्या संस्थांत काम करून शेवटी स्वतः स्वतंत्रपणे काही तरी करावं असं का वाटलं ?

: काय होत होतं, मला साधारणपणे दुय्यम भूमिका मिळायच्या. मी जर कुठं चिकटून राहिलो असतो तर आजपर्यंत दुय्यम भूमिकाच करीत राहिलो असतो. अनेक क्रिएटिव्ह माणसं एका संस्थेत फार काळ एकत्र राहू शकत नाहीत. प्रत्येकाला काही तरी स्वतंत्र करा-



'कमला 'मधे कमलाकर आणि लालन सारंग

प .

यची इच्छा असते. एखादा कलावंत वर्षानुवर्षं दुसऱ्या सीनिअर कलावंताच्या शॅडोमध्ये रहातो आणि त्याच्या गुणांना पुरेसा वाव कधी मिळत नाही. 'संस्था फुटणं ' ज्याला म्हणतात ते रंगभूमीला उपकारक असतं असं मला वाटतं. शेवटी असं लक्षात आलं, आपण स्वतंत्रपणे काही केल्याशिवाय लोकांच्या लक्षात येणार नाही.

: व्यावसायिक रंगभूमीवर स्वतंत्र पाऊल कुठच्या नाटकाच्या निमित्तानं टाकलं ?

: सखाराम बाइंडर ! दिग्दर्शक म्हणून.

: सारंग, सखाराम बाइंडर हे तुमचं व्यावसायिक रंगभूमीवर पहिलं दिग्दर्शन. ते नाटक अनेक कारणांनी गाजलं आणि तुम्हीही एका रात्रीत एक प्रतिभाशाली दिग्दर्शक म्हणून प्रकाशात आलात. हे नाटक दिग्दर्शनाला घेताना तुम्हाला या अपेक्षा होत्या ?

: बिलकुल नाही. दिग्दर्शक म्हणून पुढं यायला मी धडपडत होतो. मला व्यावसायिक रंगभूमीवर काही तरी करून दाखवायचं होतं. मला चांगलं नाटक हवं होतं आणि चांगलं मिळालं नाही तर निदान बऱ्यापैकी नाटक हवं होतं. मला सखाराम बाइंडरसारखं चांगलं नाटक मिळालं हे माझं निव्वळ नशीब ! खरं म्हणजे तेंडुलकरांचं 'अशी पाखरे येती ' हे नाटक मला व्यावसायिक रंगभूमीवर आणायचं होतं; पण ते नाटक त्यांनी जब्बार पटेलला राज्य–नाट्यस्पर्धेसाठी दिलं होतं. म्हणून त्यांनी मला नवीन नाटक द्यायचं कबूल केलं तेच हे 'सखाराम बाइंडर !' मला हे नाटक अतिशय आवडलं.

: हे नाटक तुम्हाला का आवडलं ?

: सखाराम, लक्ष्मी, चंपा, दाऊद,फौजदार ही या नाटकातली पाच पात्रं. त्यांचे स्वभाव वेगळे, वासना वेगळ्या. एका दृष्टीनं ही पात्रं विशिष्ट आहेत, युनिक आहेत. ठोकळेबाज नाहीत. ही पात्रं एकत्रित येऊन सामाजिक ढोंग फोडून टाकतात. हे सर्व या नाटकात तेंडुलकरांनी कुठचाही फापटपसारा न मांडता चपखलपणे मांडलं आहे. तेंडुलकरांच्या सर्व नाटकांत हे नाटक उजवं आहे असं माझं मत आहे. या नाटकाचं वाङ्मयीन मूल्य फार मोठं आहे.

: पण हे नाटक सुरुवातीला कलाबाह्य कारणांनी गाजलं.

: मान्य आहे. सुरुवातीला हे नाटक कलाबाह्य कारणांनी गाजलं. सेन्सॉर बोर्डानं गाजवलं. संस्कृतिसंरक्षणाचा ठेका घेतलेल्या लोकांनी बोंबाबोंब करून ते आणखी गाजवलं; पण म्हणून ते गाजण्याच्या योग्यतेचं समर्थ असं नाटक नव्हतं असं नाही; पण नाटक रंगभूमीवर येण्याआधीच एक अश्लील आणि भयंकर नाटक म्हणून याचा गवगवा केला गेला. ते रंगभूमीवर येण्याआधीच व्यावसायिकांच्या तळपायाची आग मस्तकात गेली. नाटक उधळण्याचा संघटित प्रयत्न केला गेला. हे सारं अनपेक्षित होतं.

: हे नाटक यशस्वी होण्याकरता दिग्दर्शनात काही स्टंट करून, प्रयोग भडक करून ते रंगभूमीवर आणायचं अशी काही कल्पना तुमच्या डोक्यात होती का ?

: कधीच नव्हती. मुळात तेंडुलकर हे स्टंटबाज नाटककार नाहीत. या नाटकाला एक निश्चित आणि गंभीर असा आशय आहे आणि तो तितक्याच गंभीरपणानं तेंडुलकरांनी मांडलेला आहे. खरंखुरं जग, त्यातील उघडेवाघडेपणासकट, सच्चेपणानं, अर्थपूर्णपणे व समर्थपणे या नाटकात दाखवलं आहे. तेंडुलकरांनी जितक्या सच्चेपणानं ते लिहिलं तितक्याच सच्चेपणानं मी त्याचा प्रयोग बसवला. मी जिथं पूर्वी रहात होतो त्या भायखळ्याच्या परिसरात मी अशी माणसं पहात होतो. त्यांचं जगणं, वावरणं, बोलणं, मॅनरिझम्स जवळून पहात होतो. नाटकाचा आशय जरी त्रासदायक होता तरी तो अत्यंत वास्तव होता. त्याचं वास्तववादी प्रामाणिक चित्रण करायचं इतकाच माझा हेतू होता. सवंगपणाचा आश्रय घेऊन काही तरी उथळ, भडक करायचा माझा हेतू नव्हता आणि मी तसं काही केलं नाही.

: हे वास्तव दर्शन करताना एक साडी बदलण्याचा सीन या नाटकात रंगभूमीवर दाखवला आहे. त्यावर बऱ्याच उलटसुलट प्रतिक्रिया आल्या. तुमच्या दृष्टीनं वास्तवतेची मर्यादा काय ?

: कलात्मक अपरिहार्यता, हा मी निकष मानतो. नाटकाच्या आशयाला आवश्यक अशी वास्तवता कलात्मकतेनं दाखवायला काही हरकत नाही. ते बीभत्स वाटता कामा नये. सखाराम बाइंडर या नाटकातली दृश्यं अंगावर येत असतील; पण त्यात कुठंही ओंगळपणा किंवा बीभत्सता नव्हती. नाटकातला मूळ आशय ज्यांना गलिच्छ, ओंगळ, घाणेरडा किंवा किळसवाणा वाटत असेल त्यांचा विचार करण्याचं कारण नाही; पण ज्या एका जीवनाचं चित्र दाखवलं जातं ते अस्सल आहे की नाही, वास्तव आहे की नाही हा प्रश्न महत्त्वाचा. नाट्यप्रयोग हा अस्सल होता, वास्तव होता. त्यात कुठंही बीभत्सता किंवा ओंगळपणा नव्हता.

: पण ज्या गांभीर्यानं हे नाटक लिहिलं गेलं, ज्या गांभीर्यानं ते सादर केलं गेलं तितक्या गांभीर्यानं ते प्रेक्षकांनी घेतलं का ? प्रेक्षकांचं मानसिक वय लक्षात घेता ...

: प्रेक्षकांचं मानसिक वय आपणच ठरवतो. माझा अनुभव असा आहे की, प्रेक्षक त्या गांभीर्यानं नाटक स्वीकारीत होते.

: माफ करा. माझा अनुभव वेगळा आहे. मी ज्या प्रयोगाला होतो त्या प्रयोगाला प्रेक्षक नको त्या ठिकाणी पोरकटपणानं हसत होते आणि मी अस्वस्थ होत होतो.

: असाही अनुभव येतो, नाही असं नाही; परंतु समंजस प्रेक्षकांची प्रतिक्रिया कधीही अशी आली नाही. वेगळ्या विषयावरच्या नाटकांचा प्रेक्षकवर्ग एका रात्रीत तयार होत नाही. तो हळूहळू निर्माण होत असतो.

: हे नाटक रंगभूमीवर आल्यावर तुमचे नातेवाईक, मित्रमंडळी आणि व्यवसायातली मंडळी यांच्या काय प्रतिक्रिया झाल्या? त्यांचं वागणं बदललं?

: नाट्यातल्या कुणाच्याही वागण्यात फरक पडला नाही. आम्ही काही तरी भयानक केलंय असं त्यांना वाटलं नाही. त्यांची वागणूक पूर्वीसारखीच राहिली. व्यवसायातली काही मंडळी आमच्याकडे विचित्र नजरेनं पहायला लागली; पण त्यांचंही काही विशेष वाटलं नाही. मित्रमंडळीत काही दुरावले, तर काही अतिशय जवळ आले. या प्रकरणामुळे माझे खरे मित्र कोण ते मला समजलं. कोर्टातली केस हा तर फार मोठा अनुभव होता.

: अनोळखी लोकांकडून तुम्हाला काही त्रास झाला?


: खूपच. वेडेवाकडे फोन येणं, रोज घाणेरडी पत्रं यायची. कुणी लालनला अर्वाच्य बोलायचं. कुणाचं असं पत्र यायचं "मी एक नवीन नाटक लिहिलंय त्यात सहा बलात्कार, चार संभोगदृश्यं आहेत. हे नाटक तुम्ही करावं अशी माझी इच्छा आहे' वगैरे वगैरे. त्या काळात मेंटल टॉर्चर्स आम्ही खूप सहन केल्या आहेत. एक नाट्यनिर्माता एका दारूच्या गुत्त्यात गेला होता. तिथं दुसऱ्या काही मंडळींशी, ते माझे चाहते असावेत, त्याचा सखाराम बाइंडरवर वाद झाला. अगदी मारामारीपर्यंत प्रकरण गेलं. खूप मार खाल्ला त्या निर्मात्यानं आणि दुसऱ्या दिवशी वर्तमानपत्रात पत्र लिहिलं : 'सारंगच्या हस्तकांकरवी मारहाण'. 'कुठं' ते त्यात लिहिलं नव्हतं. वास्तविक माझा त्याच्याशी काही संबंध नव्हता. लालनला खूप मनस्ताप व्हायचा. कधीकधी ती रडायची. दुर्गाबाई भागवतांनी एक फार चांगलं सांगितलं. 'लोक जेव्हा तुमच्याबद्दल वेडंवाकडं बोलतात तेव्हा तुम्ही मोठे होणार असता. तुमच्याविषयी त्यांना असूया, द्वेष वाटतो हेच मोठेपणाचं लक्षण आणि असं वेडंवाकडं बोलणं तुम्हाला सहन करता आलं नाही, तुम्ही धीर सोडलात तर तुम्ही कधीच मोठे होऊ शकणार नाही!'

: सखाराम बाइंडरनं मराठी रंगभूमीला काय दिलं?

: एका वाक्यात सांगायचं तर 'सखाराम बाइंडरनं बेगडी, स्वप्नरंजनात्मक कौटुंबिक जिव्हाळ्याच्या नाटकांना छेद दिला.'

: सखाराम बाइंडरनं तुम्हाला पुढं आर्थिक यश पण दिलं.

: पण, म्हणून मी एकाच प्रकारची नाटकं नाही करत राहिलो. घरटे अमुचे छान, सहज जिंकी मना (हे माझं स्वतःचं नाटक एकदम सोज्वळ) चिं. त्र्यं. चं–देवाचे पाय, जयवंत दळवींचं–सूर्यास्त, तेंडुलकरांचं–कमला. श्री. ना. पेंडसेंचं–रथचक्र, तुमचं–आरोप अशी वेगवेगळ्या प्रकृतीची नाटकं दिग्दर्शित केली. या नाटकांनी मला निर्मितीचा फार मोठा आनंद दिला. दिग्दर्शक म्हणून खूप नाव दिलं. प्रस्थापित केलं. सखाराम बाइंडरचं यश हा योगायोग नव्हता हे दाखवलं. सूर्यास्तचा धीट राजकीय विषय, रथचक्राची वेगळी पार्श्वभूमि, आरोप हे दोन पात्रांचं नाटक तर कमला हे आणखी एका वेगळ्या विषयावरचं नाटक. देवाचे पाय हे खानोलकरांचं नाटक



रंगभूमीवर 'सखाराम'–कौटुंबिक जिव्हाळ्याच्या नाटकांना छेद दिला.

¤

तर जवळजवळ प्रायोगिकच होतं. नाटक हा माझा व्यवसाय असला तरी व्यवसाय करूनसुद्धा नवीन देता येतं. सगळंच प्रेक्षकांना नेहमीच आवडतं असं नाही; पण मला स्वतःला नवीन नवीन विषय हाताळायला आवडतात.

: सारंग, तुमच्याविषयी असा एक आक्षेप आहे की, तुम्ही नाटक दिग्दर्शित करताना लेखकाच्या मूळ संहितेमध्ये बदल करता-कित्येक वेळा लेखकाची अनुमती न घेता ...

: जेव्हा नाटक स्वतंत्र असतं, तेव्हा नाटकाच्या आशयात मी लेखकाच्या संमतीशिवाय कधीही बदल करीत नाही. माझे जर काही आशयासंबंधी मतभेद झाले तर मी लेखकाशी चर्चा करून त्याच्याकडूनच बदल करवून घेतो; पण त्या नाटकाचं मूळ Concept मी कधीही बदलत नाही; परंतु रूपांतरित नाटक हे मूलतः लेखकाचं स्वतःचं नसल्यामुळं कधीकधी बदल अपरिहार्य ठरतात. स्वतंत्र वा रूपांतरित नाटकांत रचनात्मक बदल करताना मला लेखकाच्या अनुमतीची गरज वाटत नाही. जोपर्यंत लेखकाच्या आशयाला मी धक्का लावत नाही तोपर्यंत त्याविषयी तक्रार असू नये. कमीत कमी शब्दांत जास्तीत जास्त आशय व्यक्त करणारं लेखन सर्वांनाच जमत नाही. सर्वांचीच नाटकाच्या फॉर्मवर पकड नसते. सैल आणि पसरट नाट्यरचना असली की, दिग्दर्शक म्हणून मी त्यावर जरूर संस्कार करतो. कारण मला शेवटी लेखकाचा आशय आटोपशीरपणे आणि परिणामकारक पद्धतीनं मांडायचा असतो आणि निदान आजपर्यंत तरी मी घेतलेल्या अशा स्वातंत्र्याबद्दल कुणाही लेखकानं तक्रार केली नाही. उलट प्रसंगी दादच दिली आहे.

: सारंग, तुम्ही स्वतः लेखक असल्यामुळं 'पारितोषिकविजेता

नाटककार' परत ते सरकारी पारितोषिक ...

: हा उपहास समजायचा की कौतुक ?

: उपहास नाही. तुमच्या लेखनाविषयी मला प्रामाणिकपणानं आदर आहे. सरकारी पारितोषिक मिळणं हा काही दोष नाही. माझा प्रश्न अर्धवटच राहिला. तुम्ही स्वतः चांगले लेखक असल्यामुळं तुमच्यातला लेखक दिग्दर्शकाला डॉमिनेट करतो का ?

: कधीच नाही. माझ्यातला दिग्दर्शक हाच डॉमिनन्ट आहे. मी दिग्दर्शनाला घेतलेलं नाटक दिग्दर्शकाच्याच दृष्टीतून पाहू शकतो.

: आणि पहातो. माझ्यातल्या लेखकानं दिग्दर्शकाच्या भूमिकेत ढवळाढवळ केल्याचं आठवत नाही.

: तुम्ही एक चांगले नट पण आहात. उत्तम व्यक्तिमत्त्व, चांगला आवाज, बोलका चेहरा हे गुण असून सुद्धा दिग्दर्शक म्हणून जसा तुम्ही ठसा उमटवू शकलात तसा नट म्हणून तुमचा फार गवगवा झाला नाही किंवा तुम्ही ठसा उमटवू शकला नाहीत त्याचं कारण काय ?

: त्याला बरीच कारणं आहेत. त्यातलं महत्त्वाचं कारण म्हणजे माझ्यातला दिग्दर्शक प्रभावी आहे. नटानं आपला ठसा उमटवण्याकरता किंवा यशस्वी होण्याकरतां नट म्हणून एक्स्ट्रॉ प्रोजेक्शन करावं लागतं. मला तसं करता येत नाही.

: का ? कुवत नाही का वृत्ती नाही ?

: माझी तशी वृत्ती नाही आणि याला कारण माझ्यातला दिग्दर्शक आड येतो. मी फक्त एका भूमिकेचा, तिच्या परिणामकारकतेचा, एक्स्ट्रॉ प्रोजेक्शनचा विचार करू शकत नाही. माझ्या डोळ्यांसमोर संपूर्ण नाटकाचा एकजिनसी परिणाम असतो आणि जर तुम्हाला ठसा उमटवायचा असेल तर एक्स्ट्रॉ प्रोजेक्शन आवश्यक आहे.

: तरीही मला वाटतं की, मराठी रंगभूमीनं तुमच्यातल्या नटाची पुरेशी दखल घेतली नाही; पण तुम्ही स्वतःच्या निर्मितीमध्ये स्वतःला चांगली भूमिका घेऊ शकता असंही आढळत नाही.

: त्याचं कारण मी स्वतःला स्वतःच्या निर्मितीमध्ये नट म्हणून गुंतवू इच्छित नाही. मी कधी नाइलाजानं भूमिका करतो. मी स्वतः प्रॉडक्शनच्या बाहेर राहून त्रयस्थाच्या नजरेनं स्वतःच्या प्रॉडक्शनमधील चुका शोधत असतो आणि त्या बाहेर राहूनच कळू शकतात. कधी काळी एखाद्या नाटकात मी भूमिका करतो गरज म्हणून.

: गरज म्हणजे ? नाइट वगैरे वाचते म्हणून का ?

: नाटक हा माझा व्यवसाय असला तरी तडजोड म्हणून मी असे पैसे वाचवीत नाही. तुम्हीच म्हणलात की मी बऱ्यापैकी नट...

: मी 'चांगला' म्हटलं.

: ठीक आहे. 'चांगला'! तर कित्येक वेळा काय होतं एखाद्या लहानशा पण चांगल्या भूमिकेकरता चांगला नट उपलब्ध होत नाही, अशा परिस्थितीत मी नट म्हणून उभा राहतो. तुमच्या 'आरोप' या नाटकात मला जयराम हर्डीकरसारखा हवा तसा अभिनेता मिळाला. लो बजेट प्रायोगिक नाटक असूनही मी पैसे वाचवण्याकरता स्वतः उभं रहायचा अट्टाहास केला नाही, तर कमला, जोडीदार या नाटकात मी कामं केली आहेत; पण मला शक्य तितकं बाहेर रहाणं आवडतं.

: पण तुम्ही कधीकधी दोन भूमिकांकरता एकच अभिनेता निवडता. उदा. रथचक्र. रोहिणी हट्टंगडीनी दोन भूमिका केल्या. जोडीदारमध्ये सुनील शेंडे दोन भूमिका करतात. याचं कारण ?

: तेच. लहान भूमिका, पण चांगल्या, अशांसाठी चांगले नट मिळत नाहीत आणि ही एक डोकेदुखी असते. सामान्य वकुबाचा कलावंत त्या भूमिकेवर आणि परिणामी नाटकावर अन्याय करतो. तसं होऊ नये म्हणून समर्थ कलावंतांना मी कधी दोन भूमिका देतो. पैसे वाचवण्याकरता नाही.

: लालन सारंग या अभिनेत्री असल्यामुळं, त्यांना वाव मिळेल असं समर्थ नाटक निवडायचा दबाव तुमच्यावर त्यांच्याकडून येतो का ?

: नाही. आणि तिला तशी गरज आहे असं वाटत नाही. ती एक यशस्वी आणि प्रस्थापित अशी कलावंत आहे, हे तुम्हीही मान्य कराल. निदान करावं. चांगल्या भूमिका मिळाव्यात असं कुठच्या कलाकाराला वाटत नाही ? पण असं वाटणं वेगळं आणि त्याकरता अट्टाहासानं प्रयत्न करणं वेगळं. असा दबाव तिच्याकडून या क्षणापर्यंत आलेला नाही.

: मग 'रथचक्र' या नाटकातली प्रमुख भूमिका, त्याकरता लालन सारंग यांची निवड तुम्ही सुरवातीपासून केली होती ?

: हो आणि ती सूचना नाटकाचे लेखक श्री. ना. पेंडसे यांच्याकडूनच आली होती. त्या भूमिकेकरता तिनं हट्टही धरला नव्हता किंवा दबावही आणला नव्हता. नाटकाची निवड मी नाटकाच्या गुणवत्तेवर करतो. लालनला भूमिका आहे की नाही हा दुय्यम भाग झाला. सूर्यास्त हे नाटक मी लालनकरता निवडलं नाही. उलट त्या नाटकात तिची आधीची 'चंपा' ची इमेज उखडून टाकणारी वृद्ध स्त्रीची भूमिका तिला दिली आणि तिनं ती अतिशय समर्थपणानं साकार केली.

: कलावंत हा बऱ्याच वेळा हळवा, अव्यवहारी असा असतो. निर्माता म्हणून व्यावसायिक नाटक चालवताना तुम्हाला काय अनुभव येतो ?

: मी फार व्यवहारी नसलो तरी अव्यवहारीही नाही. हळवा मात्र आहे; पण व्यवसाय करताना अतिशय हळवं राहून परवडणार नाही. अतिशय व्यवहारीपणा किंवा टोकाचं हळवेपण या दोन्ही गोष्टी व्यवसायाला मारक असतात. नाटकाच्या निर्मितीवरचा खर्च आणि प्रयोगाचा खर्च हा जर मर्यादेबाहेर जाऊ दिला तर व्यवसाय करता येणार नाही. सगळा व्यवहार आतबट्ट्याचा होईल.

: नाही; पण निर्मितीच्या खर्चावर नियंत्रण ठेवता येईल; पण प्रयोगाचा खर्च ?

: तोही हाताबाहेर जाऊ देता येत नाही. जर एखाद्या नटाची नाइट परवडण्यासारखी नसली तर दुसरा मार्ग शोधावा लागतो. 'जोडीदार' नाटकात मी भूमिका करणार नव्हतो; पण ज्या कलावंताची मी निवड केली होती त्यानं अवाच्या सवा नाइट सांगितली. ती मला झेपणारी नव्हती. शेवटी मी स्वतः काम केलं.

: 'सेक्स आणि व्हायोलन्स' चं तुम्हाला जबरदस्त आकर्षण आहे...

: हा आक्षेप चुकीचा आहे. मला त्याचं आकर्षण नाही; पण 'नॉशिया' पण नाही. गांभीर्यानं केलेलं समर्थ लेखन मग ते कोण-

त्याही विषयावर असो, मला आवडतं. मला कोणताही विषय वर्ज्य नाही. उलट मी लिहिलेलं एकुलतं एक नाटक अतिशय सोज्ज्वळ आहे. मला स्वतःला व्हायोलन्सचा तिटकारा आहे. तुम्हाला सांगितलं तर खोटं वाटेल! हिचकॉकची पिक्चर्स मला आवडत नाहीत. टॉर्चर्स पडद्यावरसुद्धा पहाणं मला असह्य होतं. हिचकॉक कशाला, माझ्या म्हणजे मी दिग्दर्शित केलेल्या माझ्या काही नाटकातले प्रसंग मला विंगेतून पहाणंसुद्धा असह्य होतं. बेबी या नाटकांतले किंवा सखाराम बाइंडर या नाटकातले काही प्रसंग मी विंगेत उभे राहून पाहू शकत नाही. मला ते असह्य होतात. त्यातली क्रुडिटी मला असह्य होते.

: तरी तुम्ही तो रंगवता ?

: कारण ती क्रुडिटी प्रेक्षकांनाही असह्य होणं हे मला अभिप्रेत असतं. त्या नाटकात कुठे तरी अभिप्रेत असतं. प्रश्न मला काय आवडतं हा नसून नाटकांत अभिप्रेत काय आहे, प्रेक्षकांवर काय परिणाम व्हायला पाहिजे हा असतो.

: सारंग, बरेच निर्माते एक लेखक पकडून बसतात. त्या बाबतीत तुमचा दृष्टिकोन काय आहे ?

: तेंडुलकरांची सखाराम बाइंडर, घरटे अमुचे छान, बेबी, कमला ही नाटकं मी दिग्दर्शित केली; पण मला कुठलाही विषय किंवा लेखक वर्ज्य नाही. मी जयवंत दळवी, तुम्ही, श्री. ना. पेंडसे, चिं. त्र्यं. खानोलकर, वसु भगत, रत्नाकर मतकरी आणि गंगाराम गवाणकरसुद्धा अशा अनेक लेखकांची नाटकं दिग्दर्शित केली आहेत माझी या बाबतीतली भूमिका स्पष्ट आहे. चांगला विषय, ज्याच्यामध्ये काही तरी करून दाखवता येईल असं नाटक मग ते कोणत्याही लेखकाचं असो, स्वतंत्र असो, रूपांतरित असो, त्यात व्यावहारिक यशाची खात्री असो–नसो, मी ते करतो.

: प्रायोगिक रंगभूमीविषयी तुम्हाला काय वाटतं ?

: माझ्या मते प्रायोगिक रंगभूमि या क्षणी तरी संपलेली आहे. कुठं तरी अडकून बसली आहे, जिथून तिला पुढं जाताच येत नाही. प्रायोगिक रंगभूमि सध्या दिशाहीन आहे आपण काय करतोय आणि आपल्याला काय करायचंय ते त्यांना समजत नाहीये आणि म्हणूनच की काय कोण जाणे प्रायोगिक रंगभूमीवरची माणसं आता व्यावसायिक रंगभूमीवर धाव घ्यायला लागली आहेत. आता उलट नवनवीन प्रयोग करायचे, विषय हाताळायचे हे काम व्यावसायिक रंगभूमीच करायला लागली आहे. उदा. बेबी, मित्राची गोष्ट.

; सारंग, लालन आणि तुम्ही दोघंही कलावंत असल्यामुळं व एकाच क्षेत्रात काम करीत असल्यामुळं तुमचे पर्सनॅलिटी क्लॅशेस होत नाहीत का ?

: नाही होत. त्याचं कारण असं असावं आम्ही दोघं बरोबरीनं एकत्र काम करीत आहोत. दोघांनाही यशापयश सारखंच मिळत गेलं. आमच्या चढ–उताराचे ग्राफ्स सारखे आहेत. यशापयशांत आम्ही दोघं कधी वेगळ्या पातळ्यांवर न वावरल्यामुळं असेल; पण कधी संघर्ष झाला नाही. शिवाय दुसरंही एक कारण असू शकेल. मी महत्त्वाकांक्षेनं प्रेरित होऊन कलावंत झालो, तर लालन चुकून कलावंत झाली. दोघंही अतिशय महत्त्वाकांक्षी असतो तर कदाचित संघर्ष आला असता.

: तुम्ही दोघंही नाट्यक्षेत्रात असल्यामुळं त्याचा घरातील वातावरणावर काय परिणाम होतो ?

: काय परिणाम होतो ? आमच्याकडे घरगुती वातावरण, घरगुती विषय नसतातच. एकसारखं नाटक, नाटक आणि नाटक ! दुसरा विषय नाही. मला वाटतं आम्ही सतत आपलं किंवा दुसऱ्याचं पण नाटक या विषयावरच बोलत असतो. कधीकधी त्याचा फार कंटाळा येतो. एकमेकांचाही कंटाळा येतो. माझ्या मनाला निदान कप्पे आहेत. मी दुसऱ्या विषयात रमू शकतो; पण लालन वन ट्रॅक माइन्ड आहे. बरं कुठे बाहेर गेलो तरी तेच विषय. एक काळ तर असा होता की, कुठंही गेलो तरी लोक आमच्याशी एकाच विषयावर बोलायचे. सखाराम बाइंडर ! बस्स दुसरा विषय नाही !

☐

मला एकदम अपराध्यासारखं वाटायला लागलं. मी तरी इतका वेळ काय करीत होतो ? नाटक, नाटक आणि नाटक या एकाच विषयावर गप्पा मारीत होतो. तेवीस वर्षांपूर्वीचे कॉलेजमधले दिवस आठवले. आम्ही तेव्हा एकत्र होतो. इराण्याच्या हॉटेलात तासन् तास, चहाच्या त्या कपावर रंगलेल्या गप्पा आठवल्या. तेव्हा विषयाची बंधनं नव्हती. नाट्यक्षेत्रात धडपड चालली होती. एकमेकांची सुखदुःखं वाटून घेत होतो. अपयश पचवीत होतो यशानं फुलून जात होतो. दिवस मागं जात होते. एक यशस्वी नट व्हायचं स्वप्न मनात बाळगलेला मी कुठं तरी योगायोगानं नाटककार झालो आणि जो मोठा नट होईल असं आम्हाला वाटलं होतं तो सारंग एक कुशल दिग्दर्शक म्हणून नावारूपास आला. आमची क्षेत्रं निश्चित झाली आणि गप्पांचा परीघही ठरून गेला असं तर नाही झालं ? शेवटी, डोळ्यांत रंगीबेरंगी स्वप्नं फुलत असतात तेव्हाच माणूस आणि ती स्वप्नं वास्तवात आकार घेतात. तेव्हाचा माणूस यात फरक असणारच नाही का ? ☐


# तिसरी आवृत्ती

संपत आली




# सांगत्ये ऐका

रसिकांची, समीक्षकांची,
सर्वसामान्य वाचकांची
मान्यता लाभलेले
हंसा वाडकर यांचे
अनोखे आत्मचरित्र

किंमत : बारा रुपये

राजहंस प्रकाशन, पुणे ३०



# महात्मा आणि माणूस

**पूर्वसूत्र**

बऱ्याच ताण-तणावांच्या पार्श्वभूमीवर गांधी-आयर्विन करार झाला होता. करारातल्या व तडजोडीच्या मसुद्याबद्दल गांधींच्या भोवतालचे इतर नेतेही कमालीचे निराश झाले होते. करारानुसार गांधींनी असहकाराची चळवळ मागे घ्यायचं मान्य केलं होतं. ब्रिटिश मालावरचा बहिष्कार ते शिथिल करणार होते आणि पोलिस-अत्याचाराच्या चौकशीची मागणीही त्यांनी सोडून दिली होती. शिरर गांधींना भेटले तेव्हा त्यांच्या चेहऱ्यावर निराशेचा लवलेशही नव्हता. गांधी शिररना आपली खेळी समजावून देत होते; पण शिरर यांच्या आकलनापलीकडची ती गोष्ट होती. आपल्या हयातीत आपण भारतीय स्वातंत्र्य-लढा जिंकणार याबद्दल गांधींना जबरदस्त आत्मविश्वास होता. तसा ते बोलूनही दाखवत. ते म्हणत, ‘ मि. शिरर, माझ्या प्रिय मित्रा, आम्हाला स्वातंत्र्य मिळणारच, आणि मी जिवंत असेपर्यंत. ’ शिरर चक्रावून गेले होते.

‘ गांधी–अ–मेमॉर ’
या विल्यम शिरर लिखित पुस्तकाचा
परिचयात्मक संक्षेप व स्वैर रूपांतर

**भाग : चौथा**

**निखिल वागळे**

हेच ते घर ...
आणि तो खटला ...
मार्च १९२२.
दिवस ऐन उन्हाळ्याचे.

जिल्हा–सत्र न्यायाधीश सी. एन. ब्रूम्सफील्ड यांच्यासमोर मोहनदास करमचंद गांधींवरच्या खटल्याची सुनावणी चालू होती. ॲडव्होकेट जनरल सर जे. टी. स्ट्रँगमन सरकारची बाजू मांडत होते. कायद्याने स्थापन झालेल्या ब्रिटिश सरकारविरुद्ध लोकांना चिथावणी दिल्याचा किंवा तसा प्रयत्न केल्याचा आरोप गांधींवर होता. आपल्या ‘ यंग इंडिया ’ साप्ताहिकात त्यांनी लिहिलेल्या तीन लेखांवरून हा आरोप सिद्ध होतो; पण हे लेख लिहिण्यापूर्वीच गांधींनी असंतोष पसरवण्याचे उद्योग सुरू केलेले आहेत आणि जरूर तर ते सिद्ध करता येतील असं ॲडव्होकेट–जनरलनी सांगितलं.

गांधी तावडतोब म्हणाले, “ मला गुन्हा कबूल आहे ! ”

पण ॲडव्होकेट जनरलचं भाषण संपलं नव्हतं. सरकारला राज्य करणं अशक्य व्हावं आणि ते उलथून पडावं म्हणून गांधींनी पद्धतशीर जाहीर प्रचार केल्याचा आरोप त्यांनी केला. ते म्हणाले, “आरोपी उच्चशिक्षित तर आहेच; पण जनमानसात स्थान असलेला नेताही आहे. सहाजिकच त्याच्या लिखाणाकडे दुर्लक्ष करता येणार नाही. अशा प्रक्षोभक लिखाणाचे अपरिहार्य परिणाम कोर्टाने लक्षात घ्यावेत.

उदाहरणादाखल गेल्या तीन महिन्यांत मुंबई आणि चौरीचौरा इथे घडलेल्या दुर्घटना सांगता येतील. खूनबाजी आणि मालमत्तेचा विध्वंस तिथे झाला. आरोपी आपल्या लिखाणातून अहिंसेचा प्रचार करतो हे खरं; पण एकीकडे सरकारविरुद्ध असतोष पसरवायचा, लोकांना सरकार उलथून पाडायची चिथावणी द्यायची आणि दुसरीकडे अहिंसा सांगायची याला अर्थ काय? न्यायाधीशमहाराज, आपण ही परिस्थिती लक्षात घ्यावी आणि आरोपीला योग्य ती शिक्षा द्यावी. फक्त अशा तऱ्हेच्या गंभीर परिस्थितीत जास्तीत जास्त शिक्षाच होऊ शकते एवढं मी सुचवू इच्छितो."

न्यायाधिशांनी गांधींना विचारलं, "तुम्हाला याबद्दल काही सांगायचं आहे का?"

"मला एक निवेदन करायचं आहे." गांधी म्हणाले,"पण त्यापूर्वी ॲडव्होकेट–जनरलनी माझ्याबद्दल व्यक्त केलेली मतं पूर्णपणे सत्य आहेत हे मी सांगू इच्छितो. सध्याच्या व्यवस्थेबद्दल असंतोष निर्माण करणं हे माझ्या दृष्टीनं एक ध्येयवेडच झालं आहे. शिवाय 'यंग इंडिया'शी माझा संबंध येण्याआधीपासूनच मी हा उद्योग सुरू केल्याचं ॲडव्होकेट–जनरलचं म्हणणंही शंभर टक्के खरं आहे. मात्र त्यांनी आरोपपत्रात नमूद केलेल्या कालखंडाच्या बराच काळ आधीपासून मी हे काम करत होतो.मुंबई–चौरीचौराच्या हिंसक घटनांची जबाबदारीही मी नाकारू इच्छीत नाही. क्लेशकारक असलं तरी माझ्या दृष्टीनं ते कर्तव्य आहे. माझ्यासारख्या उच्चशिक्षित, अनुभवी आणि जबाबदार माणसाला आपल्या कृत्याचे परिणाम कळायला हवे होते, हे ॲडव्होकेट–जनरलचं म्हणणंही मला मान्य आहे. मी धोका पत्करतोय, विस्तवाशी खेळतोय याची निश्चितच मला जाणीव होती. माझी सुटका झाली तर पुन्हाही मी तेच करीन! कोर्टात आपण जर हे सांगितलं नाही तर कर्तव्याला चुकल्यासारखं होईल असं मला आज सकाळी वाटलं, म्हणून हे सांगतोय..."

"मला हिंसा टाळायची होती ... अहिंसा हे माझं ब्रीदवाक्य आहे ... पण काही तरी एक पर्याय निवडणं भाग होतं. देशाची पिळवणूक करणाऱ्या व्यवस्थेला शरण जाणं किंवा माझ्या देशबांधवांच्या संतापाचा स्फोट होण्याचा धोका पत्करणं. संतापलेल्या या लोकांना सत्य मीच सांगितलं होतं. त्यांनी काही वेळा अतिरेक केला हे मला मान्य आहे. त्याबद्दल मी तीव्र दु:ख व्यक्त करतो आणि मला जास्तीत जास्त कडक शिक्षा व्हावी असं इथे सांगतो. मी किंचितही दयेची याचना करत नाही. शिक्षा कमी व्हावी किंवा न्यायाधिशानी सहानुभूतिपूर्वक विचार करावा असं मी अजिबात म्हणणार नाही! अशा तऱ्हेच्या गुन्ह्यासाठी कायद्यानं सांगितलेली शिक्षा आनंदानं स्वीकारणं हे मी कोणत्याही नागरिकाचं परम पवित्र कर्तव्य मानतो!"

"न्यायाधीशमहाराज, सध्याची व्यवस्था आणि कायदा जनतेच्या कल्याणासाठी राबवला जातोय असा तुमचा विश्वास असेल तर तुम्ही मला कडक शिक्षा द्यायला हवी.नाही तर तुमच्या पदाचा राजिनामा देणं तुम्हाला भाग आहे. अर्थात तुमचं अशा तऱ्हेनं हृदयपरिवर्तन होईल अशी माझी अपेक्षा नाही; पण या निवेदनानंतर तरी माझ्या मनात काय धुमसतंय हे तुम्हाला कळेल अशी मला आशा आहे. कोणत्याही सुबुद्ध माणसानं अशा परिस्थितीत माझ्यासारखंच वर्तन केलं असतं!"

गांधी थांबले. आपल्या निवेदनाचा कागद त्यांनी उघडला. चष्मा ठाकठीक केला. एकवार कोर्टभर नजर फिरवली. कोर्टरूम त्यांच्या अनुयायांनी खचाखच भरली होती. सगळे अगदी स्तब्ध बसले होते. हालचालीचा मागमूसही नव्हता.

"सरकारशी अत्यंत निष्ठावान असलेला आणि सर्व तऱ्हेचं सहकार्य देणारा माझ्यासारखा माणूस एवढा प्रखर विरोधक का झाला हे भारतीय आणि इंग्लिश लोकांपुढं स्पष्ट करणं मी माझं कर्तव्य समजतो." गांधी वाचू लागले. "कायद्यानं स्थापन झालेल्या सरकारविरुद्ध असंतोष फैलावण्याचा आरोप मी मान्य का केला हेही मला कोर्टापुढं सांगायचं आहे."

"१८९३ मध्ये दक्षिण आफ्रिकेत माझ्या सार्वजनिक जीवनाची सुरुवात झाली. त्या देशात ब्रिटिश अधिकाऱ्यांशी झालेली माझी पहिली भेट काही सुखावह नव्हती. माणूस म्हणून, भारतीय म्हणून आपल्याला काहीही हक्क नाहीत हे माझ्या तिथे लक्षात आलं. अधिकच खरं बोलायचं तर मी भारतीय असल्यामुळं मला माणसाला मिळणारे हक्क नव्हते!"

'पण त्या वेळी ब्रिटिश राजवटीबद्दल माझं मत चांगलं होतं. असा एखादा अपवाद असायचाच असा विचार मी केला. वेळप्रसंगी मी सरकारवर टीकाही करायचो; पण सरकार उलथून पाडायचा विचार कधी माझ्या मनाला शिवला नाही! १८९९ मध्ये काय किंवा १९०६ मध्ये काय, जेव्हा जेव्हा ब्रिटिश साम्राज्याला आव्हान निर्माण झालं तेव्हा तेव्हा मी सरकारला मदत केली. त्यासाठी लॉर्ड हार्डिजने मला कैसर–ई–हिंद सुवर्णपदकही दिलं. १९१४ मध्ये पहिल्या महायुद्धाच्या वेळी मी लंडनमध्ये विद्यार्थ्यांचं एक वैद्यकीय पथक तयार केलं होतं. १९१८ मध्ये दिल्लीच्या युद्धपरिषदेत लॉर्ड चेम्सफोर्डनं सैन्यभरतीचं आवाहन केलं तेव्हा माझी प्रकृती बरी नसतानाही मी खेडा जिल्ह्यातून एक पलटण तयार केली. अशा सेवेमुळं भारतीयांना ब्रिटिश साम्राज्यात समान दर्जा मिळेल असा त्या वेळी मला विश्वास वाटत होता.'

'या विश्वासाला पहिला तडा गेला रोलेट ॲक्टनं. त्यापाठोपाठ पंजाबमधले अत्याचार आणि जालियनवाला बागेचं हत्याकांड घडलं. सर्वात कडी झाली 'रांगण्या'च्या हुकुमानं... तरीसुद्धा मी वाट पाहिली. १९१९ मध्ये अमृतसरला झालेल्या काँग्रेस अधिवेशनात अनेक मित्रांनी दिलेल्या इशाऱ्याकडे दुर्लक्ष करून मी सहकार्याचा हात पुढे केला. मॉंटेग्यू–चेम्सफोर्डनी सुचवलेल्या सुधारणा जुजबी आणि असमाधानकारक असल्या तरी त्यामुळं देशात एक नवं युग अवतरेल अशी आशा मला होती'

'पण ही–सगळी आशा फोल ठरली. पंजाबमधल्या अत्याचारासाठी दोषी असलेल्यांना शिक्षा तर झाली नाहीच, उलट बक्षिसं देण्यात आली (हा संदर्भ जनरल डायरसाठी होता.) मॉंटेग्यू-चेम्स फोर्ड सुधारणा हे काही ब्रिटिशाचं हृदयपरिवर्तन झाल्याचं चिन्ह नाही तर लुबाडणुकीचा आणखी एक मार्ग आहे, असं माझ्या मग लक्षात आलं.'

'ब्रिटिश सत्तेमुळं भारत राजकीय, आर्थिकदृष्ट्या अधिक दुर्बल बनला आहे असं माझं मत झालं, दारिद्र्य तर एवढं की, दुष्काळाचा प्रतिकार करायचीही शक्ती नाही. शेतीला जोडधंदा म्हणून देशात

चालू असलेले कुटीरोद्योग निर्दयपणे नष्ट करण्यात आले. खेड्यापाड्यातली ही अर्धपोटी माणसं हळूहळू कशी चैतन्यहीन बनताहेत याची कल्पना शहरी मंडळींना येणार नाही. त्यांचा चैनीपणा ब्रिटिशांच्या या पिळवणूकीला हातभारच लावत आहे '

' इथला कायदाही ब्रिटिशांचाच गुलाम बनला आहे. पंजाबमध्ये लागू केलेल्या मार्शल लॉची मी निःपक्षपातीपणे चौकशी केली त्यावेळी ब्रिटिशानी दोषी ठरवलेले पंचावण्ण टक्के लोक निर्दोष असल्याचं मला आढळून आलं. राजकीय खटल्याचाही प्रकार तोच. गोऱ्यांविरुद्धच्या नव्वद टक्के खटल्यात तर भारतीयांना कोर्टानं न्यायच नाकारला आहे. यात अजिबात अतिरेक नाही. प्रत्येक भारतीयाचा हा अनुभव आहे.'

' सगळ्यात दुर्दैवाची गोष्ट म्हणजे सरकार चालवणारे गोरे अधिकारी आणि त्यांच्या भारतीय सहकाऱ्यांना आपण करत असलेल्या या गुन्ह्याची जाणीवच नाही. हा देश आपली मालमत्ता असल्याच्या थाटात ते राज्य करताहेत. आपल्या आधिपत्याखाली ह्या देशाची सतत प्रगती होतेय असंही त्यांना प्रामाणिकपणे वाटतंय; पण एकीकडे सतत शक्तीचा वापर करायचा आणि दुसरीकडे लोकांचे प्रतिकाराचे सर्व मार्ग बंद करायचे यामुळे देशाच्या खच्चीकरणाशिवाय काहीही होत नाही हे त्यांच्या लक्षात येत नाही. अधिक छळ टाळण्यासाठी जनतेलाही मग सुखाचं सोंग घेण्याची सवय लागते. या सवयीमुळं राज्यकर्त्यांच्या अज्ञानात तर भर पडतेच; पण ते सहजगत्या फसवलेही जातात !'

' भारतीय दंड-विधानाच्या १२४–अ कलमानुसार माझ्यावर आरोप ठेवण्यात आले आहेत. नागरिकांचं स्वातंत्र्य दडपण्यासाठी बनवण्यात आलेल्या कलमांमध्ये हे कदाचित सर्वोच्च कलम असावं! पण प्रेम कायद्यानं निर्माण करता येत नाही. कुणाला एखाद्या व्यक्तीबद्दल किंवा व्यवस्थेबद्दल प्रेम वाटत नसेल तर, जोपर्यंत तो हिंसेचा वापर करत नाही तोपर्यंत त्याला त्या व्यक्ती किंवा व्यवस्थेबद्दल कोणत्याही मार्गानं नाराजी व्यक्त करण्याचा अधिकार असला पाहिजे; पण १२४–अ कलमानुसार अशी नाराजी व्यक्त करणं हाच गुन्हा आहे. या कलमाखाली लढवल्या गेलेल्या काही खटल्यांचा मी अभ्यास केला तेव्हा अनेक देशभक्तांना त्यानुसारच दोषी ठरवण्यात आल्याचं माझ्या लक्षात आलं म्हणून माझ्यावरही याच कलमाखाली आरोप ठेवण्यात आला हा मी बहुमान समजतो ब्रिटिशांबद्दल मला व्यक्तिगत रागलोभ नाही; पण भारताचं अपरिमित नुकसान करणारे राज्यकर्ते म्हणून मी तत्त्वतः त्यांच्यावर नाराज आहे किंबहुना अशा व्यवस्थेबद्दल प्रेम वाटणंच मी पाप समजतो. माझ्याविरुद्धचा पुरावा म्हणून जे लिखाण इथे मांडण्यात आलं आहे, तसं लिहिणं हा तर माझा अमूल्य अधिकार आहे !'

गांधींच्या शब्दांनी न्यायमूर्ती भारावल्यासारखे दिसले.

' मि. गांधी' त्यांनी सुरुवात केली. ' गुन्हा कबूल करून तुम्ही एक प्रकारे माझं काम सोपंच केलं आहे. फक्त शिक्षा नक्की करायचं काम उरलंय आणि तेच महाकठीण आहे. कायद्याच्या लेखी व्यक्ती महत्वाच्या नसतात; पण आजवरच्या माझ्यासमोरच्या आरोपीपेक्षा तुम्ही वेगळे आहात हेही विसरता यायचं नाही. तुमच्या लक्षावधी देशबांधवांच्या दृष्टीनं तुम्ही एक थोर देशभक्त आणि नेते आहात राजकारणात तुमच्याशी मतभेद असणारेही एक तत्त्वनिष्ठ, प्रामाणिक आणि संतप्रवृत्तीचा माणूस म्हणून तुमचा आदर करतात. अर्थात मला फक्त कायद्याच्याच दृष्टिकोनातून विचार केला पाहिजे तुम्ही गुन्हा कबूल केला आहे आणि या गुन्ह्यासाठी जी शिक्षा इतर सर्वसामान्यांना दिली जाते तीच तुम्हाला देणं भाग आहे. '

' तुम्ही सतत अहिंसेचा प्रचार केला आहे आणि अनेकदा हिंसा टाळण्यासाठी प्रयत्न केलेत हेही मला विसरता येणार नाही; पण तुम्ही ज्या राजकीय विचाराचा प्रचार करता आणि ज्याच्यापुढं करता त्याची वृत्ती लक्षात घेतली तर या प्रचाराची परिणती हिंसेशिवाय दुसरी कुठची असू शकते हे समजून घेणं माझ्या बुद्धिमत्तेच्या पलीकडचं आहे. '

' मला बारा वर्षांपूर्वी याच कलमाखाली बाळ गंगाधर टिळक यांच्यावर चालवण्यात आलेल्या खटल्याची आठवण या ठिकाणी करून द्यावीशी वाटते. त्यांना सहा वर्षांच्या साध्या कैदेची शिक्षा देण्यात आली होती. तुम्हालाही टिळकांसारखीच शिक्षा दिली तर ते अयोग्य होईल असं मला वाटत नाही. अर्थात देशातली परिस्थिती पाहून पुढं सरकारनं ही शिक्षा कमी केली आणि तुमची सुटका झाली तर माझ्याइतका आनंद कुणालाच होणार नाही!'

शिक्षा ऐकून गांधींच्या चेहऱ्यावर स्मितहास्य पसरलं. ते न्यायमूर्तींना म्हणाले, ' मला थोडंसं बोलायचं आहे. तुम्ही या खटल्याची तुलना टिळकांवरच्या खटल्याबरोबर केल्यानं मला आवर्जून सांगावंसं वाटतं की, हाही मला बहुमान वाटतो शिक्षेबाबत बोलायचं तर एवढी सौम्य शिक्षा मला दुसऱ्या कोणत्याही कोर्टानं दिली नसती. आपण दाखवलेलं सौजन्य खरोखरच मोठं आहे !'

एका स्थानिक भारतीय पत्रकारानं खटल्यानंतरच्या कोर्टातल्या दृश्याचं वर्णन केलं आहे. जणू काही ही दोन हजाराहून अधिक वर्षांपूर्वी अथेन्समध्ये चालवण्यात आलेल्या महान खटल्याची अखेर. तो म्हणतो–

' न्यायमूर्ती कोर्टातून गेल्यावर गांधींचे मित्र त्यांच्या भोवती जमा झाले. जवळजवळ त्यांच्या पायांशीच बसले. अनेकजण पुरुष आणि बायकाही, हुंदके देत होत्या; पण गांधी शांत होते. हसत हसत प्रत्येकाला धीर देत होते. सगळ्यानी यांचा निरोप घेतल्यावर त्यांना कोर्टाबाहेर नेण्यात आलं. तिथून त्यांना साबरमती तुरुंगात पाठवलं जाणार होत...'

¤

अहमदाबादमधल्या आमच्या वास्तव्यात गांधींनी अनेकदा दांडीयात्रेचा विषय काढला. दांडीयात्रेला वर्ष पूर्ण झालं होतं.

बरोबर बारा महिन्यापूर्वी, १२ मार्च १९३० ला, गांधी आपल्या अठ्ठ्याहत्तर अनुयायांसह इथल्या आश्रमातून निघाले होते. दोनशे मैलांची पदयात्रा करून समुद्रापर्यंत जायचं आणि तिथं मीठ बनवून सरकारी कायदा मोडावयाचा हा उद्देश. सरकारनं मिठाच्या उत्पादनाचे सगळे अधिकार तर स्वतःकडे घेतलेच होते, वर मिठावर विक्रीकरही बसवला होता. त्यामुळं भारतीयांनी मीठ बनवण्यावर निर्बंध आले होते.

ब्रिटिशांना आव्हान देण्याचं हे कृत्य प्रातिनिधिक होतं; पण सुरु-

वातीला ब्रिटिशांनीच नव्हे तर बहुसंख्य भारतीयांनीसुद्धा या कल्पनेची चेष्टा केली होती.

'साधं मीठ घेऊन आपण स्वातंत्र्यलढा चालवू शकणार नाही' असं नेहरूही म्हणाले होते.

ब्रिटिशांना तर हा विनोदच वाटला. गांधींना वस्तुस्थितीची जाणीव नाही, असल्या मूर्खपणाने ते संपतील अशा आशेत ते होते; पण गांधींचा अंदाज चुकला नाही. दांडीयात्रेची कल्पना विद्युतगतीनं लोकप्रिय झाली आणि देशाचा कानाकोपरा पेटला!

खरं तर, डिसेंबर १९२९ मध्येच कॉंग्रेसनं पूर्ण स्वराज्याचं ध्येय ठरवलं होतं. लाहोर अधिवेशनातल्या ठरावाप्रमाणे राष्ट्रीय विधिमंडळातले कॉंग्रेसचे सर्व सदस्य राजिनामे देणार होते. कायदेभंगाच्या चळवळीचा प्रचार करायचंही ठरवण्यात आलं. फक्त चळवळ कधी सुरू करायची आणि त्यासाठी कारणं काय द्यायची याचा निर्णय गांधींवर सोपविण्यात आला होता; पण लढ्याला तोंड फोडण्याच्या दृष्टीनं कोणताही प्रश्न समोर दिसत नव्हता. गांधींनी दोन महिने,यावर विचार केला. ( आपला 'आतला आवाज' काय उत्तर देतो हे ते तपासत होते, असं त्यांनी मला नंतर सांगितलं.) अखेर फेब्रुवारी महिन्याच्या शेवटी त्यांना उत्तर मिळालं.

दोन मार्चला त्यांनी व्हाइसरॉयला एक प्रदीर्घ पत्र लिहिलं–

'प्रिय मित्र,

कायदेभंगाची चळवळ सुरू करण्यापूर्वी यातून मार्ग शोधून काढण्याची मी तुम्हाला पुन्हा एकदा विनंती करतो...ब्रिटिश राजवट मला शापवत् वाटते... का ?...कारण या राजवटीनं देशातल्या लक्षावधी गरीब बिचाऱ्या लोकांची पिळवणूक करून त्यांना भिकेला लावलं आहे. ब्रिटिशांचं सैन्य आणि नोकरशाहीचा अफाट खर्च या देशाला कधीही परवडू शकणार नाही. त्यामुळं राजकीयदृष्ट्या तर आम्ही गुलाम झालो आहोतच; पण सांस्कृतिक-नैतिकदृष्ट्याही आम्हाला जबरदस्त धक्का पोचला आहे. नजीकच्या भविष्यकाळात या देशाची सूत्रं भारतीयांच्या हातात सोपवण्याचा ब्रिटिशांचा विचार नाही अशी भीती मला वाटते...'

ब्रिटिशांनी देशावर लादलेल्या अन्याय्य करांबद्दल गांधींनी या पत्रात परखडपणे लिहिलं. आपली नोकरशाही पोसण्यासाठीच ब्रिटिशांनी हे भरमसाट कर लादल्याचं त्यांनी लक्षात आणून दिलं यासाठी उदाहरण म्हणून थेट व्हॉइसरॉयच्या पगाराचा उल्लेख केला हे एका दृष्टीनं धाडसच होतं. यापूर्वी एकाही भारतीयाची अशी हिम्मत झाली नव्हती!

'तुमचा पगार महिन्याला २१ हजाराच्या वर जातो. शिवाय इतर अप्रत्यक्ष लाभ आहेतच. म्हणजेच दर दिवशी तुमचं उत्पन्न सातशेच्या वर आहे. भारताचं रोजचं सरासरी उत्पन्न दोन आण्यांपेक्षा कमी आहे, हे या पार्श्वभूमीवर लक्षात घेतलं पाहिजे. या सरासरी उत्पन्नाच्या पाच हजार पट पगार तुम्हाला मिळतो!'

'मला तुमच्या भावना दुखवायच्या नाहीत ... पण अशी विषमतापूर्ण व्यवस्था मोडीतच काढली पाहिजे ... संघटित अहिंसक चळवळच ब्रिटिशांच्या हिंसाचाराला उत्तर देऊ शकते असं मी मानतो ...'

नंतर गांधींनी आपल्या अहिंसक प्रतिकाराच्या योजना या पत्रात मांडल्या. समान पातळीवरून बोलणी करण्यासाठी त्यांनी व्हाइसरॉयला आमंत्रणही दिलं.

'पण हे पत्र तुमचं मतपरिवर्तन करायला असमर्थ ठरलं आणि काहीही मार्ग निघू शकला नाही तर मात्र या महिन्याच्या अकरतारखेला मी माझ्या आश्रमवासियांसोबत मिठाचा कायदा तोडण्यासाठी कूच करीन!'

कायदेभंगाची चळवळ पुढे ढकलायला आपण तयार आहोत असंही गांधींनी सुचवलं.

'तुम्ही जर चर्चेला तयार असाल तर ... हे पत्र निर्वाणीचं अजिबात नाही ...

कळावे.

आपला,
मो. क. गांधी

पत्र गांधींच्या एका गोऱ्या मित्रानं व्हाइसरिगल पॅलेसवर नेऊन दिलं. त्या वेळी व्हाइसरॉय मिरतला पोलोच्या सामन्यांसाठी गेला होता. तो खास विमानानं दिल्लीला परतला; पण पत्र वाचल्यावर त्यानं उत्तर न देण्याचं ठरवलं. त्याच्या सचिवानं फक्त पोच पाठवली. त्यात म्हटलं होतं, 'आपल्या चळवळीनं कायदा आणि सुव्यवस्थेला धोका पोचेल असं व्हाइसरॉयना वाटतं.'

ब्रिटिशांची समज ही अशी होती!

गांधींनी उत्तर पाठवलं. 'मी नम्रपणे भाकरी मागितली आणि माझ्या पदरात दगड पडले!'

व्हाइसरॉयनं अशा तऱ्हेनं गांधींना भेटायचं नाकारलं; पण त्यांना अटकही केली नाही. त्याच्या भोवतालचे अधिकारी तर हसण्याखिदळण्यात मग्न होते. आता गांधींचं भारतीय जनतेवरचं प्रभुत्व संपणार अशा उकळ्या त्यांना फुटत होत्या.

पण नेमकं उलटं घडलं. गांधींचा मार्ग अनोखा ठरला. सुरुवातीला फक्त दोघं-तिघं स्थानिक वार्ताहर त्यांच्यासोबत होते. हळूहळू तो डझनभरांचा जथा झाला. जगभरच्या वृत्तपत्रांचे प्रतिनिधीही तिथे येऊन पोचले. दांडीयात्रा हा सगळ्या प्रमुख वृत्तपत्रांच्या मथळ्याचा विषय झाला!

धूळभरले रस्ते तुडवत गांधी आणि त्यांचे अनुयायी गावं पार करत होते. दोनशे मैलांची ही दांडीपर्यंतची यात्रा पूर्ण व्हायला

'पण हे पत्र तुमचं मतपरिवर्तन करायला असमर्थ ठरलं आणि काहीही मार्ग निघू शकला नाही तर मात्र या महिन्याच्या अकरा तारखेला मी माझ्या आश्रमवासियांसोबत मिठाचा कायदा तोडण्यासाठी कूच करीन!'

चोवीस दिवस लागले! 'सामान नसताना दिवसाला दहाएक मैल म्हणजे काहीच नाही. शंबडं पोरसुद्धा चालेल!' गांधी म्हणायचे. ते एकसष्ट वर्षांचे होते आणि उन्हाळा मी म्हणत होता!

ती जणू विजययात्राच झाली होती गांधी आणि त्यांच्या अनुयायांचं स्वागत करायला जागोजागी गावकरी त्यांच्या गळ्यात हार घालत. धूळ उडू नये म्हणून रस्ते पाण्याने शिपडले जात आणि त्यावर फुलापानांचा सडा घालण्यात येई. प्रत्येक ठिकाणी शंभरेक लोक पदयात्रेत सामील होत. समुद्रावर पोचेपर्यंत तो हजारोंचा जमाव झाला होता.

'हे ईश्वराचं काम आहे' गांधी सांगत. रात्री ते ज्या गावी थांबत तिथे प्रार्थना होई आणि मग मिठाचा कायदा तोडण्यामागची कारणं गावकऱ्यांना सांगितली जात.

गांधीचे काही अनुयायी तर ख्रिस्ताच्या जेरुसलेमपर्यंतच्या प्रवासाशी या पदयात्रेची तुलना करू लागले होते. हे चित्र पूर्ण व्हावं म्हणूनच की काय कोणी तरी पदयात्रेत आपल्याबरोबर एक गाढवही घेतलं. ख्रिस्ताप्रमाणे गांधीही पदयात्रेच्या शेवटी मृत्यूबद्दल बोलले. पाच एप्रिलला संध्याकाळी समुद्रावरच्या प्रचंड सभेपुढे ते म्हणाले, 'मला जे काही मिळवायचंय ते घेऊनच मी आता परतेन किंवा माझं प्रेत तुम्हाला समुद्रावर तरंगताना दिसेल!'

समुद्रकिनाऱ्यावरची ती सगळी संध्याकाळ प्रार्थना म्हणूनच घालवण्यात आली.

दुसऱ्या दिवशी, सहा एप्रिलला, गांधी समुद्रात उतरले. हिंदू रीतिरिवाजाप्रमाणे शुचिर्भूत झाले आणि किनाऱ्यावरच चिमूटभर मीठ त्यांनी उचललं. (नंतर १६०० रुपयाला या मिठाचा लिलाव झाला!)

मिठाचा कायदा त्यांनी मोडला होता!

सोबतच्या असंख्य वार्ताहरांकरवी ही बातमी जगभर पोचली.

भारतात तर एकच चैतन्य पसरलं. हजारोंच्या संख्येनं लोक समुद्राकडे धाव घेऊ लागले. प्रत्येकाला मीठ तयार करून सरकारला आव्हान द्यायचं होतं. शहरात प्रचंड निदर्शनं झाली. तिथे या मिठाची विक्री झाली.

लवकरच लोकांमधल्या या असंतोषाला कॉंग्रेसनं दुसरी वाट दाखवली. ब्रिटिश वस्तूंवर बहिष्कार हाच मग मूलमंत्र झाला. या वस्तू विकणाऱ्या दुकानांसमोर निदर्शकांनी ठाण मांडलं. ब्रिटिश पोलीस त्यांना मारहाण करत, तुरुंगात टाकत; पण तासाभरातच त्या जागी नवे निदर्शक बसलेले दिसत.

**'भारतात तर एकच चैतन्य पसरलं. हजारोंच्या संख्येनं लोक समुद्राकडे धाव घेऊ लागले. प्रत्येकाला मीठ तयार करून सरकारला आव्हान द्यायचं होतं.'**

हे सगळं पाहून ब्रिटिश अधिकारी तर गोंधळातच पडले. काय घडतंय हेच त्यांना समजेना. कॉंग्रेसच्या नेत्यांचीही परिस्थिती वेगळी नव्हती. मिठाचा स्वातंत्र्याशी काय संबंध असं विचारणाऱ्या नेहरूंना हेच नवं कोडं वाटू लागलं. 'मला शरमल्यासारखं झालं आहे. गांधीच्या देश पेटवण्याच्या शक्तीचा मला अचंबाच वाटतोय' ते म्हणाले.

दिल्लीत ब्रिटिश अधिकाऱ्यांनी महिनाभर वाट पाहिली. हे वादळ हळूहळू शांत होईल असं त्यांना वाटलं; पण शांत व्हायचं तर सोडाच ते अधिक पसरतंय हे पाहून ते बिथरले. लाठीहल्ले, अटका करूनही निदर्शक हटत नव्हते. देशातले सर्व तुरुंग तुडुंब भरले. आता मात्र सरकारनं कडक पावलं उचलायचं ठरवलं.

चार मेला मध्यरात्रीनंतर गांधींना अटक करण्यात आली. त्या वेळी ते दांडीजवळच्या कराडी गावात एका विशाल आम्रवृक्षाखाली झोपले होते.

या वेळी व्हाइसरॉयनं खटल्याचा धोका न पत्करण्याचा निर्णय घेतला. कोर्टात गांधींना आणखी एक भाषण करू देणं म्हणजे लोकांना अधिक पेटवणं हे तो ओळखून होता. शिवाय या भाषणानं जनमानसातली गांधीची प्रतिमा आणखी उंचावली असती ते वेगळंच. त्याने सरळ गांधींना गजाआड बंद केले.

इंग्लंडमध्ये असं करणं सरकारला कधीही शक्य झालं नसतं; पण भारतात ते काहीही करू शकत होते.

खरं तर अशा तऱ्हेनं गांधींना तुरुंगात टाकून ब्रिटिश त्यांच्याच हातातलं खेळणं बनले होते. यामुळं गांधी पुन्हा एकदा हुतात्मा तर झालेच; पण भाषण न करताही त्यांची प्रतिमा उंचावली. भारतीयांच्या मनातला परकीय सत्तेविरुद्धचा रागही या कृत्यामुळं तीव्र झाला. आपली अटक गांधींनी गृहीतच धरली होती. त्यांच्या रणनीतीचा तो एक भाग होता. या वेळी कितीही दडपशाही झाली तरी आपले अनुयायी अहिंसेचा मार्ग सोडणार नाहीत याचीही त्यांना खात्री होती.

माझे एक मित्र आणि सहकारी वेब मिलर त्या वेळी भारतात युनायटेड प्रेसचं काम करत होते. आज चाळीस वर्षांनंतरही त्यांच्या त्या वेळच्या वृत्तांतांचा उल्लेख गांधीविषयीच्या पुस्तकांतून केला जातो. मिलर हे नावाजलेले परदेश-वार्ताहर होते. ते भावनाशील असले तरी बातमीपत्र लिहिताना त्यापासून आपल्या भावना दूर ठेवत. आमच्यापैकी अनेकांना हे जमत नसे; पण दांडीयात्रेच्या नंतर ब्रिटिशांनी केलेले खुनशी अत्याचार आणि त्याला भारतीयांनी दिलेलं अहिंसक उत्तर पाहून मिलरही हेलावले. ते स्वत:ला रोखू शकले नाहीत!

गांधीच्या अटकेनंतर तीन आठवड्यांनी २१ मेला, घडलेली ही घटना.

सरोजिनी नायडूंच्या नेतृत्वाखाली २५०० स्वयंसेवकांनी धारासणाच्या सरकारी मिठागरांकडे कूच केलं होतं. मुंबईच्या उत्तरेला दीडशे मैलांवर असलेली ही मिठागरं. सत्याग्रहींसोबत होते चारशे पोलीस आणि सहा गोरे अधिकारी!

धारसणाच्या या पदयात्रेसोबत मिलर गेले होते. तिथल्या सत्याग्रहाचं वर्णन करताना ते म्हणतात—

' गांधीचे अनुयायी अतिशय शांतपणे पुढे गेले आणि मिठागराच्या कुंपणापासून शंभर याडांवर थांबले. ठरल्याप्रमाणे त्या जमावातले काहीजण खड्डे तुडवत काटेरी कुंपणाच्या दिशेने निघाले...इतक्यात पोलिसी आदेश घुमला आणि पोलीस लाठया सरसावून त्या सत्याग्रहींवर तुटून पडले. एकाही सत्याग्रहीनं लाठीचे तडाखे रोखायला हात वर केला नाही ! या हाणामारीपासून मी दूर होतो; पण तडाख्यांचे आवाज मला स्पष्टपणे ऐकू येत होते. लाब थाबलेले इतर सत्याग्रही श्वास रोखून हे सगळं पहात होते. बघता बघता काहीजण बेशुद्ध पडले, भुईसपाट झाले ! मोडलेल्या बरगडया, उखडलेली खाद्याची हाडं आणि विव्हळणं एवढंच उरलं...मग पुढची तुकडी निघाली. भुईसपाट होईपर्यंत तीही ' लढत ' होती—अतिशय शांतपणे, शिस्तबद्धपणे !'

' खाली पडल्यावरसुद्धा पोलिसांनी मारायचं थांबवलं नाही.' मिलर पुढे लिहितात, ' खाली बसलेल्यांच्या पोटातही क्रूरपणे लाथा घालण्यात आल्या. काहींच्या गुप्त भागावर तडाखे बसले. काहींना फरफटत नेऊन खड्डयात टाकण्यात आलं !'

' मी उभा होतो तिथून जवळच एका खड्डयात एक सत्याग्रही येऊन पडला. तो इतक्या जोरानं आपटला की खड्डयातल्या चिखलानं मलाही आंघोळ झाली...पुढं कित्येक तास त्या रक्तबंबाळ सत्याग्रहींना स्ट्रेचरवरून नेण्याचं काम चाललं होतं...सकाळी अकराच्या सुमाराला गरमी ११६° सेन्टिग्रेडपर्यंत पोचल्यावरच हा पोलिसी अत्याचार थंडावला !'

कॉंग्रेसनं उभारलेल्या एका वैद्यकीय छावणीत मिलर गेले. तीनशेवीस जखमी त्यांनी मोजले. अनेकजण शुद्धीवर आलेच नव्हते. काहीजण वेदनांनी विव्हळत होते. दोघे मृत्युमुखी पडले होते. सरोजिनी नायडूंना अटक झाली होती।

धारासणाची मिठागरं वाचवण्यात सरकारला यश आलं खरं; पण पोलिसांच्या खुनशीपणाची ही कथा जगभर पोचली. मिलर बातमीपत्र अक्षरशः हजारो वृत्तपत्रांनी प्रसिद्ध केलं. खुद्द इंग्लंडमध्येसुद्धा या अत्याचाराबद्दल संताप व्यक्त झाला.

भारतात काही ठिकाणी चळवळीचा जोर वाढला, काही ठिकाणी कमी झाला; पण सर्व भारतीयांच्या मनात एक अभिमानाची भावना होती. गांधींच्या अहिंसेच्या हत्यारानं आपली किंमत सिद्ध केली होती.

अहमदाबादमधल्या त्या आठवड्यात गांधींनी मला ब्रिटिश आधिपत्याखालच्या अमेरिकेची आठवण दिली. जगप्रसिद्ध ' बोस्टन टी पार्टी ' चं मिठाच्या सत्याग्रहाशी असलेलं साधर्म्य त्यांनी मला समजावून सांगितलं. नुकतंच दिल्लीमध्ये व्हाइसरॉयलाही त्यांनी हेच सांगितलं होतं.

एकदा व्हाइसरिगल पॅलेसमध्ये चहा घेताना त्यांनी आपला जुनापुराणा बटवा उघडला आणि त्यातून चिमूटभर मीठ काढून चहाच्या कपात टाकलं.

' जगप्रसिद्ध बोस्टन टी पार्टी तुम्हाला आठवतेय ?' त्यांनी लॉर्ड आर्यावनला विचारलं होतं.

मला मात्र ती पार्टी फारशी आठवत नव्हती. त्यासाठी मी मुंबईला परतलो तेव्हा युनिव्हर्सिटी लायब्ररीत जाऊन अमेरिकन इतिहासाची पुस्तकं चाळली. भारतामध्ये घडणाऱ्या घटनांशी समांतर जाणारे त्यातले काही प्रसंग पाहून मी चकितच झालो. अमेरिकनांनी ब्रिटिशांची चहाची मक्तेदारी मोडायचा प्रयत्न केला होता, तर भारतीयांनी मिठाची. दोन्हीतून एक बंड जन्मलं होतं.

१७७३ मध्ये इंग्लंडमधल्या इस्ट इंडिया कंपनीच्या गुदामात १·७ कोटी पौंड अतिरिक्त चहा पडून होता. त्यावर उपाय म्हणून हाउस ऑफ कॉमन्सनं कंपनीला चहाच्या व्यापाराची मक्तेदारी दिली. त्याचा परिणाम अमेरिकन वसाहतीवर झाला. ते आपला चहा लंडन, ॲमस्टरडॅममध्ये विकत असत. त्यामुळं अमेरिकन व्यापारी वैतागले. बोस्टन बंदरात चहाच्या ३४२ पेट्याच बुडवून टाकल्या. ॲनापोलिसमध्ये तर चहा घेऊन येणारं जहाजही पेटवण्यात आलं.

बोस्टन टी पार्टीनंतर जॉन ॲडम्सनं तो युगारंभ असल्याचं म्हटलं होतं. गांधींच्या दांडीयात्रेनंही तेच सिद्ध केलं होतं.

गांधींच्या आयुष्यातला हा एक तेजस्वी क्षण होता !

नंतर अनेक वर्षांनी या दिवसांच्या आठवणी लिहिताना नेहरूंनी म्हटलंय—

' दांडीयात्रेच्या वेळची गांधींची प्रतिमा आजही माझ्या डोळ्यांसमोर आहे. सत्याचा शोधात चाललेला तो यात्रेकरू निडर होता. काहीही घडलं असतं तरी त्यानं तो शोध, ती यात्रा तेवढयाच ठामपणे, शांतपणे चालू ठेवली असती ! ...'

(क्रमशः)

---

" आम्ही मागितलं त्याहून अधिक गांधींनी आम्हाला दिलं." मौलाना शौकत अली म्हणाले. ते आनंदात दिसत होते.

गांधी मात्र नेहमीप्रमाणे शांत होते.

वर्षानुवर्षे चिघळलेला, हजारो जीव घेणारा हा तंटा आता मिटेल या आशेनेच मी त्या दिवशीचं बातमीपत्र लिहिलं.

' हिंदू—मुस्लिम नेते शांततेला तयार. करारावर सह्या होणार !' हा ' शिकागो ट्रिब्यून 'च्या बातमीचा मथळा होता.

पण या करारावर कधी सह्या झाल्याच नाहीत.....

## महात्मा आणि माणूस । भाग पाचवा

# हिंदू—मुस्लिम तणाव

## पुढील अंकात

---

## फिनिक्स निवड

# Maria Callas

A biography
By Arianna Stassinopoulos
(Hamlyn Paperbacks,
Pages 429, £. 1.75)

मारिया कलास ही पाश्चात्य देशांतील लताबाई. मी एकदा असे वाचले होते की, सर्वच आवाज नेहमीसाठी अवकाशात गोठले जातात ! बोलणंसुद्धा. मग लताबाईंची २५००० गाणी नियतींनी टेप करून ठेवली तर ? ज्यांचा आवाज गोड असेल त्यांना हे वाचून बरं वाटेल; पण ज्यांचा कर्कश व घोगरा आवाज असेल त्यांना हे सर्व थोतांड वाटेल ! एखादं छानसं सुंदर गाणं रेडिओ-वर लागलं की, आपल्या मनात आल्हाद निर्माण होतोच; परंतु संगीताने गाई जास्त दूध द्यायला लागतात. (म्हशींवर संगीताचा असर होतो का ते माहीत नाही ! ) संगीताने वनस्तींचीही वाढ छान होते. समर्थ गायक पूर्वी संगीताने पाऊस पाडत असत ! छान छान गाणी रेडियोवर येतात तेव्हा आपला मूडच पालटून जातो.

आणि आता तर असं ऐकतो की, फिलिप्सने ' मूड इंजिनिअरिंग 'साठी खंड न पडता १२ ते २४ तास चालतील अशा टेप्स काढल्या आहेत. निदान अशा जाहिराती तरी पूर्वी येत असत; पण चांगल्या गोष्टी पुढे नेहमीच कशा काय बारगळतात ते कळत नाही. आता पेपरमध्ये एखाद दिवस अशी जाहिरात येईल की, माझे जीवन थोडे अधिक सुसह्य होईल. या आशेने अनेक लोक पेपर चाळत असतात; पण गोदोच तो. साला येतच नाही!

संगीताने शरीराच्या केमिकलसमध्ये बदल घडून येतो. औषधापेक्षा त्यात किती तरी पटींनी जास्त गुण असतो. (लताबाईंना किती पुण्य मिळाले असेल ! )

रॅटरेस अगदी जोरात चालू आहे. बाहेर चहूकडे डॉग-इट-डॉग चाललेलं आहे. जीवनशैली ही एक सेवनशैली झाली आहे. अशा परिस्थितीत काही लोकांना वाटते या उंदराच्या शर्यतीतून अंग काढून घ्यावे. हातात एखादी सतार घेऊन किंवा सरोद किंवा बिन किंवा व्हायोलिन, फ्लचूट अगदीच काही नाही तर एखादं पुस्तक ! एखादं गाणं गुणगुणत भिंतीला टेकून (up against the wall) रॅटरेसकडे पाठ फिरवून यातलं काही तरी करत बसावं असं वाटतं आणि छान संगीत चालू असेपर्यंत आपण रॅटरेसमधून बाहेर रहातो सुद्धा; पण माणसाच्या शरीराची किंवा मनाची रचनाच अशी असते की, अतिआनंदाने किंवा अविष्करणाचे किंवा रिव्हिलिशनचे क्षण (apex experience) फार वेळ टिकू शकत नाही, असे अब्राहम मास्लो म्हणाले होते. सुंदर संगीत ऐकताना अब्राहम मास्लो या अमेरिकन सायकॉलॉजिस्टची आठवण येते.

' We fear our highest possibilities (as well as our lowest ones). We are generally afraid to become that which we can glimpse in our most perfect moments, under the most perfect conditions, under condition of greatest courage. We enjoy and even thrill to the godlike possibilities we see in ourselves in such peak moments. And yet we simultaneously shiver with weakness, awe and fear before these very same possibilities. ' असले क्षण मानवजातीला फार काळ पेलवत नाहीत आणि हा अनुभव आपल्याला संगीत आणि नृत्याच्या बाबतीत येतो तेवढा इतर ठिकाणी येत नाही. जे असे apex experience दीर्घकाळ पेलू शकतात ते कलाकार किंवा इतर महान व्यक्ती होतात. मास्लोचे आमच्याकडे 'फार्दर रीचेस ऑफ द ह्युमन माइंड ' हे पुस्तक आहे.

अब्राहम मास्लो या अमेरिकन मानसशास्त्रज्ञाने मानवाच्या कनिष्ठ निकडींपासून ते वरिष्ठ निकडींपर्यंत एक हायरार्की ( hierarchy ) शोधली. या निकडीच्या अधिकारपरंपरेत सर्वांत खाली भूक. त्यानंतर सुरक्षिततेची भावना, नंतर sense of belongingness व प्रेमाची भावना, नंतर परत self–esteem आणि सरतेशेवटी व महत्त्वाची आत्मपरिपूर्तीची निकड. इथेच संगीत, नृत्य, सौंदर्यशास्त्र वगैरे असतात.

आधी खालच्या प्रयोजकांची कमी–अधिक पूर्ती झाली तरच माणूस अगदी वरच्या आत्मपरिपूर्तीच्या प्रयोजकापर्यंत जाऊ शकतो असे मास्लो यांचे म्हणणे आहे. खालपासून क्रमाक्रमाने या प्रयोजकांची परिपूर्ती झाली नाही तर वरच्या सौंदर्यशास्त्रीव स्तराची परिपूर्ती तर होत नाहीच; पण माणसाच्या तळाच्या निकडीच त्याच्या व्यक्तिमत्त्वावर वर्चस्व गाजवू लागतात व व्यक्तिमत्त्वात अनेक प्रकारचे (डायकॉटमिज्) विभाजन होते.

पण काही काही कलाकार असे असतात की, या अधिकारी परंपरेला झुगारून देतात. मारिया कलास यातलीच एक. याचे कारण असे की, तिचा आईशी झालेला संघर्ष व इतर अनेक कारणे पाहिली की, या बाईचे अधिकारपरंपरेतील सर्व खालचे स्तर व्यवस्थित पार पाडले गेले असतील असे वाटत नाही.

पण कलाकार हे शापित असतात का ? त्यांचे विभाजन झालेले असते का ? माणूस आणि कलाकार यांची सांगड कधी होते का ? का एखादी प्रचंड शक्ती एखाद्याला निवडते व त्यातून कलेचे आविष्कार निघत रहातात ? ही निवड अॅट रँडम असते का ? कारण कधी कधी सामान्यांच्या पोटी प्रचंड कलाकार जन्माला आलेले असतात, असे आपण किती तरी वेळा वाचतो. मारिया यातलीच एक.

लताबाईंचं प्रेमसंगीत ऐकून कसा नॉस्टॅलजिआ निर्माण होतो? कसली हुरहूर लागते ? ऐकणाऱ्याला असं होत असेल तर गाणऱ्याला काय होत असेल ? कदाचित गाणऱ्याला काहीच होत नसेल. पिकतं तिथं विकत नाही हा नियम इतका निर्दय, कठोर व inexorable असेल हे मला ग्रंथालय उघडून फार उशीरा कळलं. मग सांगीतवालेसुद्धा संगीताच्या टेक्निकॅलिटीज् व सटल न्युअन्सॅजमध्ये इतके दंग होऊन जात असतील की, आपल्यासारखी त्यांना हुरहूर लागत नसेल. संगीतसर्जन केल्याचा आनंद किंवा धुंदी त्यांना निश्चित मिळत असेल; पण

ज्यांना टेक्निकॅलिटीज माहीत नाही त्यांना जसं हुरहुरून येतं तसं त्याना निश्चितच होत नसेल. दर्दभरे प्रेमगीत गायल्यामुळे माणूस प्रेम करू शकत नाही का व्हाइस व्हर्सा? (Vice Versa).

मारिआ कलासचे लांबलचक ग्रीक नाव म्हणजे मारिआ अॅना सॉफिया सॅसिलिया कॉलॉजरॉपुलॉस. (Kologeropoulous). ग्रीक नावाच्या शेवटी पुलावासारखं काही तरी असतं! रशियामध्ये कसे झॉव, स्टॉव्ह, लॉव्ह वगैरे असते तसे. या पुस्तकाच्या लेखिकेचं पण नाव तसंच आहे.

कलास १९२३ मध्ये न्यूयॉर्क शहरात जन्मली व १६ सप्टेंबर १९७७ म्हणजे इमर्जन्सीच्या काळात दिवंगत झाली. तिला पहिले यशसुद्धा आपल्या स्वातंत्र्याच्या वर्षात म्हणजे १९४७ मध्ये मिळाले त्या वेळी तिने ला गायोकोंडामध्ये टायटल रोलमध्ये गाणी म्हटली होती. तसा तिचा डेबू (debut) किंवा पहिला कार्यक्रम अथेन्स ऑपेरामध्ये १९४५ मध्ये झाला होता

तिला ला गायोकोंडामध्ये यश मिळाल्यानंतर मीलन येथे ला स्काला हे ऑपेरा हाउस तिने गाजवलं. मुंबईच्या ऑपेरा हाउससारखे हे ऑपेरा हाउस नाही हे खराखुरे ऑपेराहाउस Teatro Alla Scala (Theatre at the Stairway) या नावाने सुद्धा ओळखले जाते. ते हे १७७६ साली तिथे बांधले गेले. पहिलं थिएटर जळालं तिथेच परत बांधण्यात आलं. दुसऱ्या विश्वयुद्धात ला स्कालावर बॉंबफेक झाली होती. १८७२ मध्ये हे ऑपेरा हाउस आर्टुरॉ टॉस्कानिनी यांच्यामुळे एवढं प्रख्यात झालं. पहिल्या विश्वयुद्धातसुद्धा ला स्काला बंद होतं. आर्टुरा टॉस्कनिनीनी अनेक वेळा पैसे गोळा करून ला स्काला ऑपेरा हाउस परत सुरू केलं. त्यांनी या ऑपेरा हाउसला स्वायत्ता मिळवून दिली. ऑटुंश टास्कानिनी ज्या काळात ला स्कालाचे आर्ट डायरेक्टर होते त्या काळात या ऑपेरा हाउसला ऊर्जितावस्था लाभली. कलाकाराला जेवढं महत्त्व असतं तेवढंच महत्त्व व व्यक्तिमत्त्व कलागृहांना, नाटघमंदिरांना व सास्कृतिक भवनांना असतं.

या पुस्तकात मारीया कलासला बहिणीविषयी वाटणारा मत्सर, तिला मोटारीत झालेला अपघात, तिचा संगीताचा मास्तर द हिदालगो याच्याशी तिचे संबंध, तिचे आजार, तिचं वाढत जाणारं वजन (शरीराचं), तिच्या मनातील संघर्ष, तिला आयुष्यामधली वाटणारी पोकळी, तिच्या आईनं केलेला आत्महत्येचा प्रयत्न, जॅकी केनेडीशी झालेला संघर्ष, तिचा गर्भपात झाल्यानंतर ती कशी बदलली, तिचे आवाजाविषयी सारखे येणारे प्रॉब्लेम्स वगैरे अनेक विषय आहेत. ओनॅसिसपासून तिला दिवस गेले होते. ओनॅसिसला हे मूल नको होते. त्यांनी तिला गर्भपात करून घेण्यास सांगितले.

ती जेव्हा ३४ वर्षांची होती तेव्हा मेनेघीनीनीही (तिचा पहिला नवरा) तिला गर्भपात करण्यास सांगितले होते. कारण प्रेग्नन्सीमुळे वर्षभर तिचे करिअर बिघडणार होते. कोणत्याही स्त्रीचा मुलाला जन्म देणे हा परमोच्च क्षण असतो. ज्या स्त्रीला मूल नसते ती दुसरीचं मूल पळवते. एकदा मुलाला जन्म दिला की, ती नवऱ्यालाही बाजूला टाकते. या सतत टाळचा घेणाऱ्या बाईला मूल हवे होते. ओनॅसिसने ते जर होऊ दिले असते तर पुढच्या आयुष्यात मारीआ जशी गटांगळचा खात गेली तशी गेली नसती.

कधीकधी यशाची किंमत इतकी भयानक असते की, ते मिळवण्यापेक्षा मोकळया मनाने हसणाऱ्या मजुराचं जीवन सफल झाल्यासारखे वाटते!

मारिआ कलासच्या अस्तित्वाची crowning irony म्हणजे तिने कमवलेल्या अफाट संपत्तीपैकी १२ दशलक्ष डॉलर कलासच्या मृत्यूनतर तिच्या आईलाच गेले!

३६ चा आकडा मृत्यूनंतर ६३ झाला की काय?


—जे. एन्. पोंडा


तिचं सौंदर्य हाच तिचा शाप ठरला!....
स्त्रीबुवाबाजीवर झोत टाकणारी
'माणूस'मधून क्रमशः प्रसिद्ध
झालेली कादंबरी आता पुस्तकरूपात
प्रकाशित झाली.

सबला
माधव शिरवळकर

राजहंस प्रकाशन
१०२५ सदाशिव, पुणे ३०
मूल्य रुपये बारा

# ....नाहीतर हा प्रतिभावंत खेळाडू औटघटकेचा राजा ठरेल



**या आठवड्यात यू. एस. ओपन स्पर्धा सुरू झाली. सतत पाच वर्षे विम्बल्डन गाजवणाऱ्या बोर्गला यू. एस. ओपन मात्र कधीही जिंकता आली नाही. मॅकेन्रो मात्र हा मौल्यवान अलंकार आज सांभाळून आहे. तो यावर्षी इतर कोणी हिसकावून घेतला तर मात्र मॅकेन्रो कफल्लक होणार....**

## द्वारकानाथ संझगिरी

गेल्या वर्षी. ह्या सुमारास, टेनिसच्या अवाढव्य साम्राज्याची सत्ता जॉन पॅट्रीक मॅकेन्रोच्या हातात एकवटली होती आणि किमान पुढची दोन-तीन वर्ष तरी टेनिसचा शहेनशहा म्हणून मॅकेन्रो गाजणार अशी चिन्हं दिसत होती.

त्याला कारणंही तशीच होती.

खुद्द विम्बलडनमध्ये टेनिसच्या राजधानीत पाच वर्ष निरंकुशपणे सत्ता गाजवणाऱ्या बियॉन बोर्गला त्यानं सिंहासनावरून खाली खेचलं होतं. हा साधासुधा पराक्रम नव्हता. बोर्गला टेनिसचा 'आयातोल्ला' म्हणत. पण आयातोल्ला खोमेनीने त्याच्या विरोधकांच्या छातीत भरवली नसेल एव्हढी धडकी बोर्गनं त्याच्या प्रतिस्पर्ध्यांच्या छातीत भरवली होती. अत्यंत शांतपणे, चेहऱ्यावरची एकही रेष न हलवता. टेनिसच्या कोर्टावर तो अगदी सहजगत्या, टेनिसमधल्या बिनीच्या शिलेदारांच शिरकाण करायचा. विम्बलडन, फ्रेंच ओपनसारख्या स्पर्धांवर तर त्याने जवळजवळ मालकीहक्क गाजवला होताच, पण एक यु. एस. ओपनचा अपवाद वगळता ज्या स्पर्धांमध्ये तो उतरायचा, तिथे त्याचीच हुकमत चालायची.

बोर्गभोवती अजिक्यत्वाच जाडजूड कवच निर्माण झालं होतं. असं कवच एक रॉड लेव्हरचा अपवाद वगळता टेनिसच्या अख्ख्या इतिहासात कुणाभोवती निर्माण झालं नसेल. इलि नास्तासेसारखा प्रतिभावंत खेळाडूही म्हणायला लागला, ' ह्या बोर्गला कुठल्या तरी दुसऱ्या ग्रहावर पाठवून द्या. आम्ही टेनिस खेळतो हा भलतंच काही तरी खेळतो. बहुतेक सर्व खेळाडूंनी बोर्गचं मांडलीकत्व स्विकारून आपल्या महत्त्वाकांक्षा बासनात गुंडाळून ठेवल्या होत्या. अपवाद फक्त एकच मॅकेन्रो ! त्याने बंडखोरी केली. पहिल्यांदा अपयशी ठरला, पण गेल्या वर्षी फत्ते झाली. मॅकेन्रो ' जायंट-किलर ' बनला !

बोर्गला नमवण्याची कुवत मॅकेन्रोमध्ये आहे, असं दोन-तीन वर्षापूर्वीच टेनीसमधली जाणकार मंडळी आत्मविश्वासाने सांगत होती. गेल्या वर्षी मॅकेन्रोनं त्यांना द्रष्टा ठरवल्यावर तर, मोठमोठ्यांच्या लेखण्या मॅकेन्रोच्या कौतुकासाठी झिजायला लागल्या. मॅकेन्रोची तुलना करण्यासाठी त्यांना वर्तमान

काळातला एकही खेळाडू पसंत नव्हता. त्यामुळं ती मंडळी थेट टेनिसच्या इतिहासात शिरली अगदी खोलवर ! काही रॉड लेव्हर पाशी येऊन थबकले. पण काहींची तिथेही थांबण्याची तयारी नव्हती. त्यांनी मॉर्डन टेनिस तंत्राच्या जन्मदात्या जॅक क्रेमरला गाठला आणि मग त्यांना मॅकेन्रोच्या तोडीचा कुणी तरी खेळाडू सापडला ह्याचं समाधान झालं ! विम्बलडनला, बोर्गला हरवल्यावर पुन्हा आठ आठवड्यांच्या आत त्याने यु. एस. ओपन जिंकण्याची बोर्गची एकमेव महत्वाकांक्षा चार सेट्च्या घनघोर लढाई-नंतर संपुष्टात आणली !

१९८१ साल मॅकेन्रोने भलतचं गाजवलं ! त्या वर्षी १९ महत्वाच्या स्पर्धांमध्ये तो उतरला आणि त्यापैकी १० त्याने जिंकल्या ! त्या वर्षी आघाडीच्या एकाही टेनिसपट्टूला एव्हढ्या स्पर्धा जिंकता आल्या नव्हत्या ! ह्या १९ स्पर्धांमधल्या ७२ सामन्यात यशाचा वरदहस्त लाभला. त्याच्या यशाची टक्केवारी होती. ८६.७ ! अर्थातच सर्वाधिक, त्याला टेनीसमधलं पहिल्या क्रमांकाचं स्थान मिळवून देणारी ! पण ही झाली मॅकेन्रोने जमवलेली स्पर्धात्मक ' माया ' त्याची गुणात्मक ' पूंजी'ही प्रचंड होती. जॉन बॅलनटाईन सारख्या बुजुर्ग टेनिससमीक्षकानं त्याला जगातला सर्वात प्रतिभावान टेनिसपटू कधीच ठरवून टाकलं होतं. त्या काळात एखादी स्पर्धा काय पण एखादा टेनिसचा सामनाही तो दुसऱ्याला जिंकू देईल असं वाटत नव्हतं !

पण १९८२ सालाच्या उगवत्या सूर्याबरोबर मॅकेन्रोच्या पराक्रमाचा सूर्य मावळायला लागला. बिल स्कॅलन ह्या जगातल्या ३४व्या क्रमांकाच्या खेळाडूनं सॅनफ्रॅन्सिस्कोला त्याचा कचरा केला ! वाटलं, चमत्कार असावा. घडतात असे चमत्कार मधूनमधून ! पण पुन्हा टोकिओत २६ व्या क्रमांकाच्या विन्स वॅन पॅटननं त्याला लोळवलं, आणि त्यानंतर अचानक मॅकेन्रोच टेनिसचं वैभव ओसरण्याची चिन्हं दिसायला लागली. तो स्पर्धात्मकदृष्ट्या कफल्लक व्हायला लागला ! एखाद्या वैभवशाली घराचे वासे फिरल्यावर घराच्या लक्ष्मीचेही दागिने गहाण पडतात तसं काही तरी मॅकेन्रोच्या बाबतीत व्हायला लागलं ! प्रत्येक जिंकलेली स्पर्धा ही टेनिसपटूला 'अलंकारा'सारखी वाटत असते. मॅकेन्रोने काही महिन्यांपूर्वी जमवलेले हे अलंकार इतरांकडे गहाण पडायला लागले. एखादा 'विलास'कडे गहाण पडला, काही इव्हान लेंडलकडे गहाण पडले आणि सर्वात मौल्यवान असा विम्बलडनचा अलंकार, जो बोर्गकडून हिरावून घेण्यासाठी मॅकेन्रोने केव्हढा आटापिटा केला होता, तो जिमी कॉनर्सच्या खजिन्यात विसावतोय ! गेली तीन वर्षं टिकवून ठेवलेला यु.एस. ओपनचा अलंकार आजही त्याच्याकडे आहे. तो त्याच्याकडे रहाणार की पुन्हा दुसऱ्याकडे गहाण पडणार ह्याचा फैसला आता ह्या सप्टेंबरात होईल.

आज ए. टी. पी. (A.T.P.) गुणक्रमांकाप्रमाणे तो जरी पहिल्या क्रमांकावरच असला, तरी तो तिथे पाय घट्ट रोवून उभा नाही. तो चक्क लोंबकळतोय ! त्याचं आसन डळमळित झालंय अगदी आपल्या बाबासाहेब भोसल्यांसारखं ! यु.एस. ओपननं दगा दिला तर पदच्युती अटळ आहे !

पण असं घडलं तरी कसं !

त्याचं बिनसलंय तरी काय !


चॅंपियन झाल्यापासून तो अपयशाच्या वणव्यात कां होरपळला जातोय !

मॅकेन्रोचा खेळ आपल्याला वर्षातून फक्त एकदाच पहायला मिळतो आणि फक्त तेव्हढ्याच भांडवलावर मॅकेन्रोच्या अपयशाचं मूल्यमापन करणं काही योग्य नाही; पण तरीही जी टेनिसमधली जाणकार मंडळी वर्षभर मॅकेन्रोचा खेळ पहात असतात, त्यांना मॅकेन्रोच्या खेळात जाणवलेला बदल, तसंच त्याचा स्वभाव, त्याची वृत्ती, त्यानं आत्मकथनात सांगितलेल्या गोष्टी ह्यांच्या आधारे काही आडाखे मात्र निश्चित बांधता येतात.

तर, ह्या गोष्टींचा अभ्यास केल्यावर मला जे काही जाणवलंय, त्याच्या आधारे मॅकेन्रोच्या अपयशाचा शोध घेण्याचा माझा प्रयत्न आहे ...

मॅकेन्रोच्या अपयशाला काही एखाद्‌दुसरं कारण आहे असं वाटत नाही; पण कारणं अनेक असली, तरी ती एकमेकांत गुंतलेली आहेत असं मात्र आढळतं !

त्याच्या अपयशाचं पहिलं आणि सर्वांत महत्त्वाचं कारण,म्हणजे त्याच्या खेळाचं तंत्र, खेळाचा ढंग असा विचित्र आहे की थोडसं कुठं तरी बिनसलं तर रंगाचा बेरंग होऊन जातो.



बोर्गला नमवणारा ' जायंट-किलर '—



**जिमी कॉनर्स !—मॅकेन्रोचा खेळ बघून भले भले गोंधळले !**

इथं मात्र तुम्ही मला मोठा आ वासला असणार ! एका ठिकाणी त्याला गुणात्मक-दृष्टचा सर्वश्रेष्ठ खेळाडू म्हणायचं, अगदी बोर्गपेक्षाही श्रेष्ठ वगैरे, आणि पुन्हा त्याच्या अपयशाचं खापर त्याच्या तंत्रावरच फोडायचं, हे काय गौडबंगाल आहे ? असा प्रश्न एव्हाना तुमच्या जिभेवर आलाच असणार, खरं ना !

पण काळजी करू नका ! त्याचं उत्तर मी देतोय ! खरं म्हणजे 'मी देतोय' म्हणण्या पेक्षा विक ब्रॅडननं जे रहस्य शोधून काढलंय, ते फक्त मी सांगतोय ! पण त्यासाठी प्रथम विक ब्रॅडनची ओळख करून देतो. विक ब्रॅडन हा जानामाना टेनिस प्रशिक्षक ! गेली काही वर्षं तो अमेरिकेत स्वतःच टेनिस स्कूल चालवतो. मध्यंतरी, ह्याच 'शाळेत' जाऊन आपल्या विजय अमृतराजनं त्याच्या खेळात थोडीफार सुधारणा करून घेतली. जगातल्या गाजलेल्या बहुतेक सर्व टेनिसपटूंच्या तंत्रांचा त्याने अत्यंत बारकाईने अभ्यास केलाय.

त्याने मॅकेन्रोच्या खेळातलं कुठलं गुपित शोधलंय ?

तो म्हणतो, 'मॅकेन्रो कितीही महान असला तरी त्याच्या खेळाचं तंत्र आणि टॅपरामेंट असं विचित्र आहे की, त्याचा पराभव होणे ही मुळीच आश्चर्याची गोष्ट नाही आणि त्यामुळेच माझ्या शिबिरात येणाऱ्या टेनिसपटूंना, मॅकेन्रोचा आदर्श समोर ठेवा अस मी चुकूनही सांगत नाही.]

ही मंडळी मला म्हणतात, मॅकेन्रो जगातला सर्वश्रेष्ठ टेनिसपटू आहे ना, मग त्याचा आदर्श डोळ्यासमोर का ठेवायचा नाही ?'

मी त्यांना सांगतो, 'अगदी सोपं आहे. तो जिनियस आहे, तुम्ही नाही.'

कृपया गैरसमज करून घेऊ नका ! मॅकेन्रोच्या खेळाच्या काही बाजू निश्चितच अनुकरणीय आहेत. विशेषतः त्याची 'व्हॉली', आणि हो, सर्व्हिससुद्धा ! त्याची सर्व्हिस थोड्याफार प्रमाणात पुस्तकाशी बंडखोरी करणारी असेल; पण तरीही ते त्याच्या भात्यातलं अत्यंत प्रभावी अस्त्र आहे.

मात्र त्याचे ग्राउंडस्ट्रोक्स ? तिथेच खरी मेख आहे. ह्या ग्राउंडस्ट्रोक्समध्ये चुका होण्याची शक्यता फार मोठी असते. मॅकेन्रोसारखा ग्राउंडस्ट्रोक मारायचा म्हणजे त्यासाठी उत्कृष्ट टायमिंग लागते. जरा चूक झाली, रॅकेटचा कोन फक्त दोन अंशांने जरी बदलला, तरी त्याचा पॉइंट गेलेला असतो आणि त्याचा प्रतिस्पर्धी हसत असतो. जेव्हा मॅकेन्रोची मानसिक आणि शारीरिक स्थिती चांगली असते, तेव्हा त्याचे हे ग्राउंडस्ट्रोक्स प्रतिस्पर्ध्याच्या तोंडचं पाणी पळवतात; पण जरा जरी मानसिक तोल ढळला, तरी त्याचे हे भन्नाट ग्राउंडस्ट्रोक्स त्याच्यावरच बूमरॅंग सारखे उलटतात.

थोडक्यात म्हणजे मॅकेन्रोच्या खेळात 'फॅक्टर ऑफ सेफ्टी' बराच कमी आहे.

बोर्गच्या बाबतीत बरोबर उलटा प्रकार आहे. त्याचा खेळ मॅकेन्रोएव्हढा परिपूर्ण नसेल; पण चुकांची शक्यता, त्याने इतकी कमी करून टाकली आहे की, तो बऱ्याच वेळा पराभवाच्या दरवाजावरूनही परत फिरू शकतो आणि जिंकतोय असा वाटणारा मॅकेन्रो जरा जरी सूर बिघडला तर पराभूत होऊ शकतो.

दुसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे, पूर्वी मॅकेन्रोची सर्व्हिस आणि त्याचे ग्राउंडस्ट्रोक्स बरेच फसवे वाटत असत. त्याचा पूर्ण अंदाज प्रतिस्पर्ध्याला येत नसे. त्याची सर्व्हिस आजही त्यांना संभ्रमात टाकणारी आहे. मात्र त्याच्या ग्राउंडस्ट्रोक्सचा अंदाज इतरांना यायला लागलाय ! त्यामुळे इतर खेळाडूंनी त्याच्या ग्राउंडस्ट्रोकवर हल्ला चढवला तर त्याच्यावर भरपूर दबाव येऊ शकतो आणि दबावाखाली छोटा फॅक्टर ऑफ सेफ्टी असलेल्या त्याच्या खेळाचा बेरंग व्हायला वेळ लागत नाही !'

व्हिक ब्रॅडनने मॅकेन्रोच्या खेळाचं एवढं स्पष्ट चित्र उभं केल्यावर, त्याच्या अपयशाचं विश्लेषण करण्याचं काम बरंच सोपं होऊन जातं. ह्या त्याच्या विश्लेषणाला एक छोटासा मुद्दा मात्र मला जोडावासा वाटतो. मॅकेन्रो हा 'सर्व्ह अँड व्हॉली' तंत्र राबवणारा एक आक्रमक खेळाडू आहे. सर्व्हिस केल्यानंतर त्याचे पाय बेसलाइनवर खिळून रहात नाहीत. बेसलाईनवरून 'रॅली' च करून समोरच्या खेळाडूची चूक होण्याची वाट पहाणं किंवा अजिबात धोका नसतानाच आक्रमक फटका मारणं वगैरे त्याच्या रक्तात नाही. पहिली छोटीशी संधीही त्याला नेट-जवळ धाव घेण्यासाठी पुरेशी असते. तिथे जाऊन व्हॉलीच्या सहाय्याने लवकरात लवकर गुण मिळवण्याची तो धडपड करत असतो. त्या धडपडीत जसं भरघोस यश मिळू शकतं तसंच चुकाही होऊ शकतात. आक्रमकतेला बिलगून येणारी ही असुरक्षितता मॅकेन्रोचा मानसिक तोल ढळला, तर त्याला फार महाग पडते.

म्हणजे थोडक्यात, मॅकेन्रोच्या खेळात 'मार्जिन ऑफ एरर' कमी असल्यामुळे मानसिक दबावाखाली खेळताना त्याचा खेळ पार छिन्न-विच्छिन्न होऊ शकतो, हा त्याच्या खेळातला अॅनॅलिसिसमधला सर्वात महत्त्वाचा भाग झाला.

आता पुढचा प्रश्न असा निर्माण होतो की, टेनिसचं सम्राटपद हस्तगत केल्यावर त्याला खरोखर काही मानसिक दबाव वगैरे जाणवायला लागला का ?

मॅकेन्रोच्या काही मुलाखती, त्याच्या चरित्रातला काही भाग आणि गेल्या काही महिन्यांतलं त्याचं कोर्टावरचं वागणं, ह्याचा नीट अभ्यास केला, तर ह्या प्रश्नाचं उत्तर चटकन मिळतं.

मॅकेन्रोने चॅंपियन होण्यासाठी लागणारी खेळातली कलात्मक उंची जरी गाठलेली असली, तर ते पद टिकवून धरण्यासाठी आवश्यक असणारी मानसिक प्रगल्भता (Mental Maturity) त्याच्याकडे नाही

आणि त्याला त्याची जाणीवसुद्धा आहे. एक–दीड वर्षापूर्वीच आर्थर ॲशकडे मन उघड करताना तो स्पष्ट म्हणाला होता — 'मला इतक्या लवकर 'पहिल्या क्रमांकाचा' टेनिसपटू म्हणून मिरवण्याची इच्छा नाही. त्यामुळे माझ्या मनावर फार मोठा दबाव पडू शकेल.' पण मॅकेन्रोने चॅंपियन होणं हे काही त्याच्या हातात राहिलं नव्हतं. टेनिसच्या दुनियेतल्या महत्त्वाच्या स्पर्धा त्याने जिंकल्या आणि तो त्या पदावर विराजमान झाला.

, आणि मग चॅंपियन होण्यातल्या सुखाबरोबर त्यातली दुःखही त्याला उमगायला लागली ...

'रेंज फॉर परफेक्शन' ह्या मॅकेन्रोच्या चरित्रात रिचर्ड इव्हान्स म्हणतो, ते सत्य !

'एखादा खेळाडू चॅंपियन झाल्यावर, नेहमीच सर्व डोळे त्याच्याकडे अपेक्षेने रोखले जातात. त्याने सदासर्वकाळ जिंकायचं हीच अपेक्षा; नो कॉम्प्रमाईज् ! एखादा सामना जरी तो हरला, तरी सर्व प्रेसवाले एका सुरात विचारतात, 'काय झालं, काय चुकलं ?' आज माझ्यापेक्षा, 'तो' चांगला खेळला ह्या उत्तरानं त्यांचं समाधान होत नाही. त्यांचा युक्तिवाद तयार असतो, 'तुम्ही नंबर एक आहात. कारण इतरांपेक्षा चांगले आहात, बरोबर ? म्हणजे तुम्ही त्याला नेहमीच हरवलं पाहिजे, बरोबर ? पण आज उलटंच झालं. आता बोला, कुठे माशी शिंकली ? '

. सहाजिकच प्रत्येक मॅच खेळताना, मग तो साधा महोत्सवी सामना का असेना, आपण जिंकलाच पाहिजे हे प्रेशर डोक्यावर ठेवून खेळावं लागतं. अनेक खेळांतले अनेक चॅम्पियन त्यातून गेलेत; पण फक्त एखादा बोर्ग एखादा रडी–हर्टानो त्याला पुरून उरलाय. कारण तेव्हढं भक्कम टेंपरामेंट त्यांच्याकडे होतं. दुर्दैवानं मॅकेन्रोकडे ते आज नाही.

बरं, मॅकेन्रो फक्त काही मोजक्याच महत्त्वाच्या स्पर्धांमध्ये उतरतो असंही नाही. पायाला भिंगरी लावल्याप्रमाणे त्याची जगभर भ्रमंती सुरू असते. एकदा तो गंमतीत म्हणालाही होता, Sometimes, I don't know on what plant I am on !' ह्या स्पर्धांमध्ये सतत, सम्राटपदाचा मुकुट सांभाळत खेळायचं, म्हणजे शारीरिक आणि मानसिक ताण निश्चितच जाणवणार ! एव्हढा थंड डोक्याचा सर्व मोहावर विजय मिळवणारा बोर्ग; पण शेवटी त्यालाही ताण जाणवायला लागला. अगदी गेल्या वर्षीची गोष्ट मॅनोलो ओरॅंटिस विरुद्ध बोर्ग फ्रान्समध्ये खेळत होता. पहिल्या सेटमध्ये ५–१ असा आघाडीवर असताना मानसिक ताणामुळे असेल, त्याचा संयम सुटला आणि चक्क मातीच्या कोर्टावर (clay court), बोर्ग विम्बल्डनच्या गवतावर पहिल्या फेरीचा सामना खेळतोय अशा थाटात, 'व्हॉली' मारण्यासाठी नेटकडे धावायला लागला. तरीही तो सेट बोर्गला कसाबसा ६-४ असा गवसला; पण पुढच्या सेटमध्ये बोर्गने पुन्हा तोच प्रकार चालू ठेवल्यावर चक्क ६–० असा तो सेट गमवायची पाळी त्याच्यावर आली. पुढच्या सेटमध्ये डोकं शांत झाल्यावर तो सेट आणि सामना बोर्गने जिंकला खरा; पण त्यानंतर काही दिवसांतच बोर्गने जवळ जवळ पाच-सहा महिने, टेनिसला रामराम ठोकला ! डोक्यावर बर्फ ठेवून खेळणाऱ्या बोर्गला एव्हढा मानसिक ताण जाणवतो, तर सतत धगधगत्या ज्वालामुखीसारख्या मॅकेन्रोची काय हालत होत असेल ह्याची कल्पना करा !

टेनिसमध्ये अग्रगण्य स्थान मिळाल्यानंतर स्वतःचा तापट स्वभाव बदलण्याचा जो प्रयत्न मॅकेन्रो करतोय त्याचाही परिणाम त्याच्या खेळावर होत नसावा ना ! वरवर हे थोडंसं जरा विचित्र वाटेल; पण नीट खोलवर विचार केला की, थोडे-फार तथ्य आहे असं पटायला लागत

अगदी परवापरवापर्यंत मॅकेन्रोचा स्वभाव कसा होता ? अक्षरशः आपल्या दुर्वासऋषींचा अवतार ! फरक एव्हढाच ते उठसूठ शाप द्यायचे, हा शिव्या द्यायचा ! त्याच्या जिभेवर चांगल्या शब्दांना यायला बंदी घातली होती. बिल टिल्डन, पॅंको गोन्झालिस, नास्तासे, कॉनर्स वगैरे मंडळीची परंपरा तो पुढे चालवायचा ! एव्हढच नव्हे तर काही बाबतीत त्याने ह्या बुजुर्गांनाही मागे टाकलं होतं. जमायकाला एका सामन्यात त्याने साक्षात नास्तासेला रॅकेट फेकून मारली होती. थोडक्यात त्याचं कपाळ चुकलं, नाही तर कपाळमोक्ष निश्चित झाला असता. शेवटी इतरांना वैताग आणणारा नास्तासे स्वतःच वैतागून म्हणे म्हणाला, 'He is worse that Conners and me put together.'

गेल्या वर्षी तर विम्बलडन त्याने डोक्यावर घेतलं होतं. एकही पंच त्याच्या जिभेतून सुटला नाही. ॲबसोल्यूट पिग्ज काय, ' इन कॉंपिटंट फूल काय, ' त्याची जीभ टाळघाला लागली की नवीन शिवी जन्माला यायची. त्यामुळे विम्बल्डन जिंकूनही; पत्रकार, पंच, अधिकारी वगैरे मंडळीकडून त्याचं कौतुक झालं नाही, उलट त्याचा निषेध केला गेला.


**NEW TITLES RECEIVED**

1. **The Apartment Book–** (Useful book for building, and flat owners).–By the editors of Apartment Life
2. **Natural Wonders of The World–** (Reader's Digest. Book–Illustrated- A book that will Satisfy the curiosities of young and old.)
3. **The Diamond-**(All aspects of the diamond from robbery to mining)–George G. Blakey
4. **Tibet-**(112 Vermeer–like crystal clear photos plus history, art and culture of Tibet)– David Bonavia & Magnus Barleff
5. **Cactus & Roses-**(Autobiography of the industrialist) –S. L. Kirloskar
6. **The Fourth Round-** (Indo-Pak War 1984 / Future History – ( The Next Indo-Pak War 1984 )—Ravi Ravi Rikhye.

**The Phoenix Library**

**727, opp. Sadashiv Post, Pune–30.**

परंपरा डावलून ऑल इंग्लंड टेनिस क्लबचं आजीव सदस्यत्वही त्याला दिलं नाही!'

पण नंतर आपण कुठे तरी चुकतोय, आपल्याला बदलायला हवं, असं त्याला जाणवलं असावं. कारण त्यानंतर एका मुलाखतीत त्यानं म्हटलं होतं, 'टेनिसमधला एक महान चॅंपियन म्हणून मला रसिकांच्या हृदयात स्थान हवंय. एक वाईट वर्तणुक असलेला टेनिसपटू म्हणून नव्हे.'

आणि त्यानंतर त्याचा तापट स्वभाव थोडाफार बदलण्याची चिन्हंही दिसू लागली. मध्यतरी ह्या संदर्भात वाचलेला एक किस्साच सांगतो...

कुठल्याशा एका स्पर्धेत मॅकेन्रोचा एक तुफानी फोरहॅन्ड शॉट, बरोबर सीमारेषेवर पडला. सीमारक्षकाने लगेच शॉट 'इन' होता अशी खूण केली; पण उंच खुर्चीवर बसणाऱ्या पंचाने मात्र त्याला 'बाद' ठरवलं. मॅकेन्रोचा विश्वासच बसेना. त्याने रॅकेट खाली टाकली आणि शांतपणे पंचाच्या खुर्चीकडे जाऊन म्हणाला, 'त्या सीमारक्ष-

# टेनिसच्या विश्वात उत्पात घडवणाऱ्या मॅकेन्रोची

कुरळ्या केसांचा, निळ्या डोळ्यांचा, बालिश चेहऱ्याचा एक अठरा वर्षांचा मुलगा ट्रॅकसूट घालून, हातात रॅकेट्स घेऊन, विम्बलडनच्या खेळाडूंच्या ड्रेसिंगरूममध्ये शिरत होता, इतक्यात त्याला दरवाजावर पहारेकऱ्याने अडवलं.

'कुठे चाललास, इथे फक्त खेळाडूच आत जाऊ शकतात!' त्या पहारेकऱ्याने त्याला दरडावलं.

'पण, मी ... मी. खेळाडू आहे' त्याने त्या पहारेकऱ्याला समजावायचा प्रयत्न केला ... पण तो पहारेकरी त्याला मानायलाच तयार होईना ... वर आसपास त्याला ओळखणारंही कुणी नाही... शेवटी त्याला खिशातल्या पासाची आठवण झाली. तो पास दाखवल्यावर कुठे त्याला प्रवेश मिळाला ...

पण पुढच्या आठ दिवसात त्याने एव्हढा नावलौकिक मिळवला की, विम्बलडनमधल्या उच्च अधिकाऱ्यापासून ते अगदी चपराशापर्यंत 'तू कोण आहेस?' 'तुझं नाव काय?' वगैरे प्रश्न विचारायची गरजच पडली नाही. जगात, जिथे जिथे टेनिस खेळलं जातं आणि टेनिसबद्दल वाचलं जातं, तिथे तिथे त्याचं नाव मशहूर झालं!

होय, तो जॉन पॅट्रिक मॅकेन्रो होता!

१९७७ च्या विम्बलडनची ही गोष्ट! टेनिसवेड्या अमेरिकेत, दरवर्षी शेकड्याने निर्माण होणाऱ्या टेनिसपटूंपैकी हा एक! नशीब अजमावायला विम्बलडनला आला, ... पण, पटकन मान्यवरांच्या कंपूत त्याला कोण सोडणार? म्हणून तो पात्रता फेऱ्यात खेळला आणि जिंकलासुद्धा! पण तरीही फारशी दखल कुणी घेतली नाही... घ्यायचं कारणही नव्हतं. नेहमीच काही खेळाडू पात्रताफेरीत, 'मोठ्यांच्या' सहवासात येत असतात ...

पण नंतर, पहिल्या फेरीत इजिप्तच्या इस्माइल शफीला तीन सेटमध्ये गारद केल्यावर काही भुवया उंचावल्या ... पण तरीही फारशी दखल नाही.

दुसऱ्या फेरीत, त्याच्यासमोर ऱ्होडेशियाचा कॉलीन डॉडस्वेड नतमस्तक झाला ... पण तरीही थोडीशी हालचाल, फार नाही!

तिसऱ्या फेरीत जर्मनीचा कार्ल मिलर आणि चवथ्या फेरीत अमेरिकेचाच अलेक्स मेयर त्याच्यासमोर कोलमडले आणि मग मात्र ऐन वसंतऋतूत विम्बलडनला वादळाने घेरलंय, याची जाणीव सर्वांना व्हायला लागली.

उपांत्यफेरीत तेरावा सिडेड ऑस्ट्रेलियाचा फिल डेन्टचा फडशा पडला आणि मग 'वरच्या' मंडळींसाठी धोक्याच्या घंटा वाजायला लागल्या.

उपांत्य फेरीत जिमी कॉनर्सने हे वादळ शमवलं खरं; पण तोपर्यंत त्याच्या तोंडाला फेस आला होता ... एका अभूतपूर्व विक्रमाची नोंद झाली. तोपर्यंत एकाही टेनिसपटूने, पात्रता फेरीतून, थेट उपांत्य फेरीपर्यंत मजल मारली नव्हती ...

कोण होता हा जॉन पॅट्रिक मॅकेन्रो? जॉन मॅकेन्रो सिनियर आणि केनी मॅकेन्रोचा हा सुपुत्र! त्याला खेळाची तशी आवड लहानपणापासूनच; पण कल जास्त बेसबॉल, सॉकर आणि बास्केटबॉलकडेच! पण नंतर न्यूयॉर्कमधल्या काही मुलाना रॅकेटने नेटवरून चेंडू मारताना पाहिलं आणि टेनिसपटू बनायचा ध्यास घेतला. आईवडलानीही त्याला चांगलं प्रोत्साहन दिलं. कारण खेळात रस घेतला, तरी 'अभ्यास कर' वगैरे सांगायची पाळी त्यानं आणली नाही. शाळेतही तो स्कॉलर वगैरे समजला जायचा.

त्याची टेनिसची आवड बघून एके दिवशी त्याच्या आईने त्याला टोनी पॅलाफॉक्सच्या प्रशिक्षण-शिबिरात आणून सोडलं ...त्याच्याशी बोलल्यावर आणि त्याचा थोडा-फार खेळ पाहिल्यावर पॅलाफॉक्सने त्याला आपला शिष्य बनवून टाकला आणि त्याने मॅकेन्रोच्या खेळावर संस्कार केल्यावर, त्याचा खेळ बहरायला लागला...

सुरुवातीला अभ्यास हे त्याचं पहिलं ध्येय होतं आणि टेनिस एक छंद! पण पुढे व्यावसायिक टेनिसमधल्या 'लक्ष्मी'ने डोळा मारल्यावर शाळेतला स्कॉलर मॅकेन्रो 'पदवी' मिळवण्याच्याही भानगडीत पडला नाही! स्टॅन्डफोर्ड युनिव्हर्सिटीत एक वर्ष काढून, तो सरळ व्यावसायिक टेनिसपटू बनला!

सुरुवातीच्या काळात, विशेषत: ज्युनियर स्पर्धेतही त्याला फार मोठं यश मिळालं नव्हतं. १९७७ साली विम्बलडनमध्ये जगाला थक्क करणारी मुसंडी मारेपर्यंत यु.एस्. ओपनच्या ज्युनियर स्पर्धेत अंतिम सामन्यात हार आणि फोरेस्ट हिल ज्युनियर स्पर्धेत उपांत्य फेरीत मजल एव्हढीच त्याची मिळकत! किंबहुना १९७६ साली ज्युनियर टेनिसमध्येही अमेरिकेत त्याचा ६ वा क्रमांक होता ... पण सर्वांत गमतीची गोष्ट अशी की, पहिले 'पाच' अजून जगाला अज्ञात आहेत आणि मॅकेन्रोने कळस गाठलाय!

आज मॅकेन्रो उतरणीला लागल्यासारखा वाटत असेल; पण १९७७ ते १९८१ पर्यंत मॅकेन्रोने टेनिसच्या विश्वात जे उत्पात घडवले, ते त्याचं टेनिस भक्कम तांत्रिक पायावर उभं आहे म्हणून!

बरं, बोर्गप्रमाणे एकलव्याच्या निष्ठेने तो सराव करत नाही. किंबहुना सरावाचा त्याला भयंकर कंटाळा आहे. अगदी लहानपणापासून! त्याचा कोच पॅलाफॉक्स म्हणतो, 'हॅरी हॉपमन

कांचा कॉल नीट ऐकला का ?'

'होय; पण मी स्वत.च्या डोळ्यांनी चेंडू बाहेर पडताना पाहिलाय !' त्या उंच खुर्चीवर बसलेल्या प्रमुख पंचाने मॅकेन्रोला जवाब दिला.

लगेच प्रेक्षकात कुजबुज सुरू झाली ... त्यांना खात्री होती की, आता स्फोट होणार, मॅकेन्रोची जीभ सैरावैरा सुटणार; पण स्फोट झालाच नाही, मॅकेन्रोने राग चक्क गिळला आणि तो बेसलाइनकडे परतला.'

खरोखरच मॅकेन्रोने स्वतःचा राग आवरायचा प्रयत्न चालवलाय, तो स्वतःच ते कबूल करतो. ह्या वर्षी विम्बल्डनला कुठे त्याच्या 'त्या' प्रतिभेच्या वेगवेगळ्या छटा दिसल्या !

पण ह्या अचानकपणे हाती घेतलेल्या बदलामुळे त्याच्या खेळातला 'स्पार्क' तर नष्ट झाला नाही ना ? मानसशास्त्रीयदृष्टघा तसा संशय व्यक्त करायला निश्चित जागा आहे. कारण पूर्वी मानसशास्त्रज्ञांनी जेव्हा मॅकेन्रोच्या स्वभावाचं विश्लेषण करण्याचा

# सर्व्हिस तुफानी आहे, जबरदस्त फसवी आहे म्हणूनच....

जेव्हा माझ्या ॲकॅडमीत कोचिंग घ्यायला यायचा, तेव्हा टेनिसबरोबर इतर शारीरिक व्यायामावरही त्याचा कटाक्ष असायचा ...प्रत्येक टेनिसपटूला तो राबवून घ्यायचा ! पण त्याला येताना पाहिलं की जॉन लपून बसायचा, लहानपणापासूनच त्याला सरावाचा तिटकारा होता.' पण तरीही मॅकेन्रोने शिखर गाठलं. कारण त्याला लाभलेलं प्रतिभेचं लेणंच अनन्यसाधारण आहे. ह्या बाबतीत क्रिकेटची मैदानं गाजवणाऱ्या सर गॅरी सोबर्स आणि मॅकेन्रोची जातकुळी एकच म्हणावी लागेल.

मॅकेन्रो हा अत्यंत परिपूर्ण टेनिसपटू आहे. सर्व्ह आणि व्हॉलीचं तंत्र तर तो कोळून प्यालाय; पण गरज पडली तर बेसलाइनवरही तीत 'रॅलीग' करू शकतो...पण अर्थात सर्व्ह ॲन्ड व्हॉली, तंत्रावर त्याची जरा जास्तच भिस्त असते. हे तंत्र यशस्वीपणे राबविण्यासाठी सर्व्हिस फार चांगली असावी लागते आणि मॅकेन्रोची सर्व्हिस हा टेनिसच्या दुनियेत एक कौतुकाचा विषय बनलाय ! ती तुफानी आहेच ! वृक्ष उन्माळून टाकणाऱ्या तुफानासारखी ती प्रतिस्पर्ध्याला उन्मळून टाकते; पण टॅनरप्रमाणे नुसती 'तुफानी' एवढंच तिच वैशिष्टघ नाही. ती जबरदस्त फसवी आहे. सर्व्हिस करताना दोन्ही पाय बेसलाइनशी समातर ठेवतो आणि मग शरीराला सुंभासारखा पीळ देऊन जास्तीत जास्त उंचीवरून चेंडूवर आघात करतो. सर्व्हिस करताना सुरुवातीचा बराच काळ त्याची पाठ त्याच्या प्रतिस्पर्ध्याकडे असते. त्यामुळे चेंडू कुठल्या दिशेला जाणार त्याबाबत समोरचा खेळाडू कायम 'सस्पेन्स 'मध्ये असतो. बरं प्रत्येक वेळी तो चेंडूची दिशा बदलतो आणि स्पिनही बदलतो. कधी टॉपस्पिन, कधी स्लाइस तर कधी साइड स्पिन ! एकंदरीत धुक्यात वाट शोधणाऱ्या माणसासारखी समोरच्याची अवस्था होऊन जाते.

इंग्रजीत एक म्हण आहे, 'First stroke is half the battle.' मॅकेन्रोच्या सर्व्हिसने अर्धी लढाई जिंकलेली असते. उरलेली तो इतर फटक्यानी जिंकतो. टेनिसला ज्ञात असलेला प्रत्येक फटका त्याच्यासाठी चाकरासारखा राबतो. फोर हॅन्ड–बॅक हॅन्ड, क्रॉस कोर्ट शॉटस्–कधी जागेवरून तर कधी धावत, पासिंग शॉटस्, लॉब्ज, स्मॅश, व्हॉली. अगदी झाडून सर्व फटके त्याच्या दिमतीला हजर असतात. त्यात पुन्हा स्पिनचे सर्व प्रकार आलेच ! त्याचा 'ड्रॉप व्हॉली' तर कट्टर आहे. रिक क्रॅली ह्या निवृत्त झालेल्या ऑस्ट्रेलियन खेळाडूने त्याचा एकदा हा ड्रॉप शॉट पाहिला आणि तो नखशिकांत थरथरून म्हणाला, 'माय गॉड, आज काल असे जर फटके मारत असतील, तर मी निवृत्त झालो हेच योग्य झालं !'

पायाचा वेग आणि 'मनगटाची ताकद' ह्या दोन गोष्टी आज काल कुठल्याही टेनिसपटूला लागतातच. त्या मॅकेन्रोकडे आहेतच; पण कलात्मकता आणि नजाकत, ह्या ज्या टेनिसमध्ये दुर्मिळ झालेल्या गोष्टी आहेत, त्याही मॅकेन्रोकडे भरपूर प्रमाणात आहेत. आर्थर ॲशने ते फार सुंदर रीतीने मांडलंय !

तो म्हणतो, 'Against Connors and Borg you feel like you are being hit by a sledge hammer. But this guy is a stille to. He has great balance and hands and he just slices people up. He has got a ton of shots. It's a slice, here, a niche there, a cut over here. Pretty soon you have got blood all over you even though the wounds are'nt deep. Soon after that you bleed to death.'

मॅकेन्रोचं त्याच्या प्रत्येक फटक्यावर भलतंच प्रेम असावं ! त्याच्या फटक्यातली चूक किंवा कुरूपता त्याला उद्विग्न करते आणि मग तो चुकीचा निर्णय घेणाऱ्या सीमारक्षकाप्रमाणेच स्वत.वर जीभ चालवतो. रिचर्डस् इव्हान्स लिहितो, 'टेलरबरोबर खेळताच टेलरच्या एका फोरहॅन्ड फटक्याच्या जवळ पोहोचू शकल्यावर 'You are a fat hippopotamus' असं स्वत.ला म्हणायलाही त्यानं कमी केलं नाही.

एकंदरीत खेळात परिपूर्णता आणण्यासाठी सतत त्याची धडपड चालू असते.

ही धडपड आणि त्याला छप्पर फाडके लाभलेली नैसर्गिक गुणवत्ता त्यामुळे मॅकेन्रोला थोर होण्यावाचून गत्यंतर नाही.

टेनिसमध्ये महानता दोन प्रकारे मोजता येते. एक ॲबसोल्यूट पातळीवर. एखादा खेळाडू टेनिसच्या कलेवर कसं प्रभुत्व मिळवतो त्यावर ती अवलंबून असते, तर दुसरा प्रकार म्हणजे स्पर्धात्मक दृष्टघा ! एका विशिष्ट कालखंडात समकालीन खेळाडूंच्या स्पर्धेत तो कसा कसोटीस उतरतो त्यावर ती अवलंबून असते. म्हणजे पूर्णतः सब्जेक्टिव्हच म्हणायला हवं !

ह्यात मॅकेन्रो कुठे बसतो ? पहिला निकष लावला तर निश्चितपणे मॅकेन्रो महान वाटतो. त्याबाबतीत बोर्ग–कॉनर्सलाही त्याने मागे टाकलंय; पण दुसऱ्या बाबतीत मात्र बोर्ग एवढी उंची त्याला गाठता आलेली नाही. *

प्रयत्न केला, तेव्हा 'डेली मेल' चे मेडिकल कॉरस्पॉन्डन्ट जॉन स्टिव्हन्सननं म्हटलं होतं, 'Mcenroe is a classical example of hysterical extrovert, who has no ward off boredom by manufacturing anger. Insults, rudness and outrageous behavior are used to produce extra adrenaline. Every top competitor needs to get adrenaline going, in order to get performance to peak.'

म्हणजे थोडक्यात मॅकेन्रो तसा पेचातच सापडलाय ! स्वभाव बदलला तर खेळावर परिणाम होऊ शकतो आणि बदलला नाही, तर पत्रकार आणि इतर मंडळी बेइज्जती करायला टपलेले असतात !


खरंच मॅकेन्रोने करावं तरी काय ?

एक गोष्ट मात्र निश्चित की, इतरांकडे गहाण पडलेले स्पर्धात्मक अलंकार 'सोडवायचे' असतील, तर काही बदल होणं आवश्यकच आहे. किमान मानसिकदृष्टचा तरी ! खेळाचं तंत्र बदलण्याची त्याला बिलकूल गरज नाही. कारण मानसिकदृष्टचा फिट असताना, मॅकेन्रोचं तंत्र बोर्ग, कॉनर्स, लेंडलसारख्या अतिरथी-महारथींना पुरून उरायला समर्थ आहे. मॅकेन्रोच्या खेळातली विविधता इतर कुठल्याही टेनिसपटूकडे नाही.

थोडीफार विश्रांती, फक्त निवडक महत्त्वाच्या स्पर्धेत सहभाग वगैरे गोष्टी केल्या तर थोडाफार मानसिक ताण कमी होऊ शकतो. तसेच एखाद्या मानसोपचारतज्ञ किंवा हिप्नॉटिस्टकडून घेतलेली मानसशास्त्रीय ट्रीटमेंट, ऐन मोक्याच्या प्रसंगी त्याचं मानसिक स्थैर्य राखण्यासाठी निश्चित उपयोगी पडू शकेल ! आजकाल जगातले कित्येक खेळाडू ही ट्रीटमेंट घेत असतात. अमेरिकेसारख्या ठिकाणी गल्लोगल्ली अशी क्लिनिक्स सापडतात...लौकिकाच्या ओझ्याखाली दबल्या जाणाऱ्या मॅकेन्रोला त्याचा चांगला उपयोग होऊ शकतो ..

त्याचप्रमाणे, लहानपणी कोर्टवर त्रागा करणारा बोर्ग पुढे बदलू शकला, हिमालयासारखा थंड झाला. अॅड्रेनॅलिन निर्माण करण्यासाठी, सर्वोच्च परफॉर्मं देण्यासाठी त्याला कोर्टवर तांडवनृत्य करायची गरज भासली नाही.

'मॅकेन्रो'ही त्याच्याप्रमाणे मानसिक दुर्बलतेवर का मात करू शकणार नाही ? नव्हे त्याला तो केलीच पाहिजे. नाही तर हा एव्हढा प्रतिमावंत टेनिसपटू, टेनिसच्या दुनियेचा फक्त औट घटकेचा राजा ठरेल ! □



**बियॉन बोर्ग**
**खेळताना मॅकेन्रोच्या डोक्यात ज्वालामुखी धगधगतो तर बोर्गच्या डोक्यावर बर्फाचा गोळा असतो.**

## थयथयाट....पण बोर्गपुढे नाही !

मॅकेन्रोच्या तापट स्वभावाचा उगम नेहमी, त्याच्या धमन्यातून वाहणाऱ्या आयरिश रक्तात शोधला जातो. मॅकेन्रोची आजोबा, आजी वगैरे कंपनी आयरीश होती.

पण धमाल अशी की लहानपणी तो हौशी खेळाडू असताना हे रक्त कधी फारसं उसळलं नाही. पण नंतर त्याने व्यावसायिकतेच्या कुंपणात उडी टाकली. आणि मग त्याचा कोर्टवरचा थयथयाट सुरू झाला.

असं नेहमी म्हटलं जातं की मॅकेन्रो हा प्रामाणिक खेळाडू आहे. एक 'गेम्समनशिपचा' (Gamesmanship) भाग म्हणून...समोरच्या खेळाडूची एकाग्रता विचलीत करण्यासाठी तो ह्या थयथयाटाचा उपयोग करत नाही.

फक्त 'अन्याय' झाल्यावरच ह्या त्याचा स्वभाव अगदी नैसर्गिकरित्या उफाळून येतो. काही वेळा त्याच्या बाजूने जरी 'कौल' दिला आणि तो दुसऱ्याच्या दृष्टीने अन्यायकारक असला तरी तो उखडतो. लहानपणी म्हणे, त्याच्या वडलांनी त्याला उपदेश केला होता की 'कधीही अन्यन्य सहन करू नकोस, अन्याय दिसला तर त्याच्याविरुद्ध झगड.' जॉन न्यूकॉंब ह्या माजी विम्बलडन विजेत्याला मात्र मॅकेन्रो अजिबात प्रामाणिक वगैरे वाटत नाही. तो म्हणतो, 'कोण सांगतं मॅकेन्रो बदलू शकत नाही आणि त्याचा राग नैसर्गिकरित्या उफाळून येतो ?' बोर्गविरुद्ध खेळताना कधी त्याला थयथयाट करताना पाहिलय कुणी ?' न्यूकॉंबने एक चांगला पॉईंट मांडलाय ! बोर्गविरुद्ध चिडून अॅड्रेनॅलिन वगैरे निर्माण न करताही तो सर्वोच्च परफॉर्मन्स देऊ शकतो. तर मग इतर वेळी तो कित्ता का गिरवता येऊ नये ? बोर्गबद्दल वाटणाऱ्या आदरयुक्त भीतीमुळे तो तसा वागत असेल असं जर गृहीत धरलं, तरी त्यातून मॅकेन्रो बदलू शकत नाही, हे सिद्ध होत नाही.

लहानपणी त्रागा करणारा बोर्ग बदलला, जिमी कॉनर्सही पुढे तेव्हढा शीघ्रकोपी राहिला नाही. मग मॅकेन्रोही बदलायला हरकत नाही. नव्हे त्याने बदलायलाच हवे, नाही तर एव्हढा सोन्यासारखा त्याचा खेळ मानसिक तोल बिघडून मातीमोल होऊ शकतो.

*

सर्चलाइट

अमृत पुरंदरे

# अणुबाँब– हवाच !

दुसऱ्या महायुद्धाच्या काळात अमेरिका, ब्रिटन, रशिया, जर्मनी व अमेरिका हे सर्वच देश अणु ऊर्जा Atomic energy संशोधनाच्या मागे लागले होते. याचे कारण म्हणजे या ऊर्जेचे प्रचंड फायदे (त्यातल्या-त्यात युद्धातले) सर्वांच्याच लक्षात आले होते. या संशोधनात अमेरिकेनं आघाडी मारली व १९४५ साली जपानवर दोन अणुबाँब टाकून युद्ध संपुष्टात आणले. याच्यानंतर चार वर्षे म्हणजे १९४९ पर्यंत या सर्वात मारक अस्त्रांची 'मोनोपोली' अमेरिकेकडे होती; परंतु १९४९ मध्ये रशियाने प्रथम अणुबाँबची चाचणी यशस्वी केली व एका नवीन दुष्टचक्राला सुरुवात झाली.

खरं म्हणजे अणुबाँबचे दुष्परिणाम काय आहेत आणि त्याची मारकशक्ती किती प्रचंड आहे हे जपानवर झालेल्या परिणामातून सर्वांनाच उमजून चुकले होते. देशोदेशीचे बुद्धिवंत या अस्त्राला विरोध करू लागले होते. अमेरिकेत सुद्धा बरेच मोठे वादळ उठले होते व त्याचाच परिणाम म्हणून अमेरिकेने १९४६ साली जगापुढे 'बरुचा प्लॅन' (Barucha Plan) ठेवला तो असा.अमेरिका एक इंटरनॅशनल एजन्सी स्थापन करेल, ही एजन्सी अणुविघटनातून निर्माण होणाऱ्या ऊर्जेला परवानगी देईल. तिच्यातर्फे 'लायसेन्स' काढले जाईल व हे लायसेन्स फक्त अणुऊर्जेच्या शांततापूर्ण उपयोगासाठीच दिले जाईल. कोणताही देश अणुअस्त्र बाळगणार नाही व अणुअस्त्राला लागणारे साहित्य बाळगणार नाही.' यामध्ये अजून एक महत्त्वाचा मुद्दा होता, ज्यामुळे ही योजना सफल झाली नाही. तो म्हणजे– 'वरील एजन्सी सर्व कारखान्यांवर (अणुशक्तीच्या) नियंत्रण किंवा लक्ष ठेवेल आणि जर कोणी नियम मोडले तर त्याला शासन केले जाईल.'

रशियाने (अर्थातच) याला कडाडून विरोध केला व एक नवीन योजना मांडली. त्याद्वारे 'निमंत्रण' आणि 'शिक्षा' ही दोन्ही कलमे काढून टाकली, तसेच बरेच नियम शिथिल केले.

हा वाद मिटलाच नाही; पण हायड्रोजन बाँबच्या शोधामुळे व तंत्रज्ञानातील प्रगतीमुळे तो कायमचा बंद पडला.

### प्रचंड चढाओढ

१९४५ नंतर अमेरिकेकडे जरी अणुबाँबची मोनोपोली होती तरी पुरेशी अस्त्रे नव्हती. तसेच अतिशय प्राथमिक अवस्थेत असलेल्या अणुबाँबच्या वापरावर अनेक अडचणी येत होत्या. रशियाकडे जो 'जुन्या'. युद्धसाहित्याचा साठा होता तो प्रचंड होता. त्यामुळे अणुबाँबचा उपयोग भीती दाखवण्यासाठी करता येत नव्हता.

१९४९ साली रशियाचा बाँब तयार झाला आणि रशिया व अमेरिका या दोन महासत्तांमध्ये एक प्रचंड चढाओढ चालू झाली.

१९५० साली चर्चिलने या चढाओढीला 'Balance of terror' असा शब्दप्रयोग वापरला व तो आजतागायत वापरात आहे. १९५७ पर्यंत अमेरिकेला, रशिया समुद्रातून हल्ला करेल असे भय होते; परंतु ४ ऑक्टोबर १९५७ ला रशियाने पहिले स्फुटनिक उडवले आणि अतिशय असमतोल परिस्थिती निर्माण झाली. चढाओढीचा वेग प्रचंड ... प्रचंड वाढला. त्याचबरोबर अमेरिकेचे रशियापासून समुद्रातून हल्ला होण्याचे भय संपुष्टात आले आणि रॉकेटच्या संशोधनामुळे दोन्ही देशांची पहिल्याच हल्ल्यामध्ये जास्तीत जास्त नुकसान करण्याची क्षमता (First strike capability) वाढली. (जेव्हा एक देश दुसऱ्या देशाच्या सर्व केंद्रांवर एकाच वेळेला हल्ला करून ती नष्ट करू शकतो तेव्हा त्या देशाला firit strike capability आहे असे म्हणतात )

१९६० पासूनच दोन्ही देश पहिला हल्ला झाल्यानंतर करण्यात येणाऱ्या दुसऱ्या हल्ल्याची Second strike capability क्षमता वाढवण्याच्या मागे लागले ! ... चढाओढ, प्रचंड चढाओढ.

अर्थात या चढाओढीमध्ये फक्त अमेरिका आणि रशियाच आहेत असे नाही. फ्रान्स, ब्रिटन आणि जर्मनी हे सुद्धा आपल्यापरीने त्यात भाग घेत आहेत; परंतु रशिया आणि अमेरिका यांचे उदाहरण घ्यायचे कारण एवढेच की, त्यांची ताकद बाकी देशांपेक्षा बरीच मोठी आहे. (या दोघांकडे असलेली अणुअस्त्रे संपूर्ण पृथ्वी १७ वेळेला नष्ट करू शकतील ! )

---

### अणुशक्ती

अणुमध्ये शक्ती आहे, शक्ती आहे असे नेहमी म्हटले जाते; पण त्याचा उलगडा अनेकदा होत नाही. ही शक्ती अणुविभंजनातून (फुटण्यातून) निर्माण होते. एक किलो युरेनियमच्या विभंजनातून दोन कोटी किलो पेट्रोल जळल्यामुळे जेवढी ऊर्जा मिळते तेवढी ऊर्जा मिळते ! तुम्ही म्हणाल, 'एवढी ऊर्जा देणारा अणु असतो तरी किती 'मोठा ?'

तर त्याचे उत्तर म्हणजे खूप, खूप छोटा, इतका की, जगातल्या कोणत्याही सूक्ष्मदर्शकात तो दिसू शकणार नाही.

एक किलो युरेनियमपासून एवढी ऊर्जा मिळते, मग त्या युरेनियमचे काय होते ?

त्या युरेनियमचे रूपांतर बेरियम आणि क्रिप्टॉन या दोन घटकांत होते आणि या दोन शिल्लक घटकांचे वजन एक किलोपेक्षा कमी असते ! मग हे वजन जाते कुठे ?

या वजनाचे संपूर्णपणे ऊर्जेमध्ये रूपांतर होते. ही ऊर्जा भयंकर असते. एका युरेनियम २३५ अणुच्या विभंजनातून २०० MeV (मिलियन इलेक्ट्रॉन व्होल्टस्) एवढी ऊर्जा आणि बेरियम आणि क्रिप्टॉनचे एक एक अणु एवढ्या गोष्टी मिळतात !

ज्याप्रमाणे अणुविभंजनातून ऊर्जा मिळते त्याचप्रमाणे अणु जोडले जाण्यातूनसुद्धा ऊर्जा मिळते. ही ऊर्जा विभंजनातील ऊर्जेपेक्षा बरीच जास्त असते.

सगळेच अणु फुटू शकतात का ?—— नाही. जे अणु मुळातच 'अनस्टेबल' असतात असेच अणु फुटू शकतात. बाकीचे अणु विभंजन करण्यासाठी इतकी प्रचंड ऊर्जा लागते की, ती पृथ्वीवर तयार करणे अजून शक्य झालेले नाही.

*

MANOOS (Marathi Weekly) Two Rupees Regd. No. PNC-W 28
( Licensed to post without prepayment of postage-No. 11)

अणुबॉंबच्या निर्मितीमुळे अनेक बदल झाले; परंतु सर्वांत जास्त बदल जर कशात झाला असेल तर तो युद्धतंत्रामध्ये. युद्धतंत्र समूळ बदलून गेले. याचे कारण सगळयांच्या लक्षात एक गोष्ट आली, ती म्हणजे अणुबॉंबला प्रतिकाराचे काहीही साधन नाही. तसेच संरक्षण म्हणून सुद्धा काही उपाय नाही I. C. B. M. मुळे काही मिनिटांत अणुबॉंब एका खंडातून दुसऱ्या खंडात जाऊ शकतो, तर पृथ्वीभोवती फिरणाऱ्या उपग्रहातून त्याहीपेक्षा वेगाने कोणत्याही लक्षावर बॉंब टाकता येतो. मग प्रश्न असा निर्माण होतो की, मग याला पर्याय काय?

पर्याय एकच उरतो, आपण स्वतः तेवढीच ताकद मिळवणे व दुसऱ्याला शह देणे. मात करण्याची (किंवा होण्याची) वेळच येऊ न देणे. दुसऱ्याला नुसती भीती दाखवणे. याचमुळे योग्य संरक्षण होऊ शकेल हे आता उघड झाले आहे अमेरिका, रशिया यांच्याकडे १९६० पासून दुसऱ्या हल्ल्यामध्ये एकमेकांना समूळ नष्ट करण्याची क्षमता आहे; पण ती केवळ एकमेकांना भीती दाखवण्यासाठी वापरली जाते याच तंत्रामुळे शांततेच्या काळात युद्धसाहित्यावर करण्यात येणाऱ्या खर्चात प्रचंड वाढ झाली आहे सर्व जगभर दरवर्षी, शांततेच्या काळातसुद्धा, अब्जावधी डॉलर्स केवळ नवीन अस्त्रे, बोटी, पाणबुडया, विमाने या साठी खर्च होतो. इलेक्ट्रॉनिक्समुळे व अत्याधुनिकीकरणामुळे या गोष्टी भयंकर महाग बनल्या आहेत. त्यांच्यासाठी किती मोठया प्रमाणावर पैसा ओतला जातो याची कल्पना यावी, म्हणून मी काहींच्या किंमती खाली देतो.

**किंमत**

१) पाणबुडी (अणुशक्तीवर चालणारी)- दहा कोटी डॉलर्स (म्हणजे साधारण नव्वद कोटी रुपये).

२) एक अत्याधुनिक विमान –एक कोटी वीस लाख डॉलर्स.

३) एक अणुबॉंब (निर्मितीमूल्य) –एक अब्ज डॉलर्स !!

आज अणुयुद्धाबद्दल अनेक समज, गैरसमज पसरले आहेत. खरी गोष्ट अशी आहे की, अणुयुद्ध जर झाले तर नेमके काय होईल हे सांगणे कोणालाही शक्य नाही. कारण त्याबाबतचा 'अनुभव' कोणालाही नाही. जे काही सांगितले जाते ते कल्पनेने मांडलेले असते. त्यामुळे अनेक समज, गैरसमज पसरले आहेत असाच एक गैरसमज म्हणजे– 'अमेरिकेनं नुसते एक बटण दाबले की संपूर्ण रशिया उध्वस्त होईल व रशियाने नुसते बटण दाबले की अमेरिका बेचिराख होईल त्यामुळे जर का कोणी हिटलरसारखा माथेफिरू राज्यावर आला तर संपूर्ण जगाला तो एका क्षणात नष्ट करेल !'

अणुयुद्ध इतक्या अविचारीपणाने होणार नाही याची काळजी प्रत्येक देशाने घेतली आहे. कमीत कमी दहा माणसे एकाच वेळेला हा निर्णय घेण्यासाठी लागतील अशी योजना केली गेली आहे. हा निर्णय जरी अतिशय वेगाने घ्यावयाचा निर्णय असला तरी तो, त्या थोडया वेळातसुद्धा जास्तीत जास्त वेळा पडताळून पाहण्यात येईल.

अणुबॉंबचा वापर हा फक्त भीती दाखवण्यासाठीच केला जाईल अशी खात्री देता येईल का? किंवा तो नक्की वापरलाच जाणार नाही याची खात्री देणार का? असा प्रश्न विचारणारा मूर्ख आहे असेच मी म्हणेन. 'आम्ही अणुबॉंब बाळगतो; पण तो आम्ही वापरणार नाही' असे जर कोणी म्हणाला तर त्याचा अर्थ त्या अणुबॉंबला दिवाळीतल्या टिकलीएवढेसुद्धा कोणी घाबरणार नाही. अणुबॉंबमुळे अशांतता निर्माण झाली आहे ही गोष्ट खरी आहे.

'ही अशांतता कधीपर्यंत टिकेल ?'

माझ्या मताप्रमाणे जोपर्यंत ही शस्त्रस्पर्धा चालू आहे तोपर्यंत !

'ही शस्त्रस्पर्धा कधी संपेल ?'

ज्या वेळी तिसरे महायुद्ध होईल त्या वेळेला, किंवा अणुअस्त्राला जेव्हा पर्याय सापडेल तेव्हा. तोपर्यंत ही 'अशांतता म्हणजेच शांतता' हे गृहीत धरले पाहिजे किंवा दुसऱ्या शब्दात सांगायचे तर अणुबॉंब वापरला जाण्याची शक्यता म्हणजेच शांतता हे लक्षात घेतले पाहिजे.

अर्थात काही अपघात घडू शकतात. उदा. एकदा अमेरिकेत एका नवीन बसवलेल्या रडार यंत्राने अचानक रशियाकडून अणुहल्ला होत असल्याची सूचना दिली. हे जेव्हा पडताळून पाहिले गेले तेव्हा असे लक्षात आले की, या रडारने उगवणाऱ्या चंद्राला 'चुकून' I. C. B. M. समजले. या अशा अपघाताने संपूर्ण पृथ्वी नष्ट होऊ शकेल हे मान्य आहे; परंतु अमेरिका व रशियाला तुम्ही अण्वस्त्रनिर्मिती थांबवा व असलेले साठे नष्ट करा हे सांगणे म्हणजे कर्णाला कवचकुंडले काढून ठेव किंवा नागाला तुझे दात टाकून दे, असे म्हणण्यासारखे आहे. या देशाना महामत्ता म्हणतात ते त्यांच्याकडे असणाऱ्या सामर्थ्यामुळेच. हे सामर्थ्य कोण बरं आपण होऊन सोडून देईल? तसेच या देशांनी आजपर्यंत या क्षेत्रात इतकी प्रगती केली आहे, इतकी वाटचाल केली आहे की, आता त्यांना मागे फिरणे शक्य नाही. प्रचंड पैसा खर्च करून अनेक योजना केलेल्या आहेत, होत आहेत. त्या सगळया एकदम थांबवणे अशक्यच आहे जोपर्यंत या सर्वांवर एखादा 'चांगला' पर्याय सापडत नाही तोपर्यंत हे चक्र असेच चालू रहाणार.

भारताचा या संदर्भात विचार करायचा; तर भारताला त्वरित या अस्त्राची गरज नसली तरी आज ना उद्या ते बनवायलाच लागणार. जेव्हा भारताची शेजारी राष्ट्रे अणुबॉंब बनवतील तेव्हा शांतता, शांतता म्हणत बसणे म्हणजे इतिहासाची पुनरावृत्ती करणेच ठरेल. पूर्वी भारतात ऐश्वर्य होते; परंतु पुरेसे तयार सैन्य नव्हते. उत्तरेकडून आलेल्या हल्ल्यामध्ये हे सर्व ऐश्वर्य घुऊन निघाले. स्वसंरक्षणात कमी न पडता आपण बाकीची प्रगती करणे हेच शहाणपणाचे ठरेल. बाकी राष्ट्रे हेच करत आली आहेत.

यावर दुसरा एक महत्त्वाचा मुद्दा उपस्थित होऊ शकतो. तो म्हणजे एवढा मोठा खर्च केवळ अस्त्रांवर करणे भारताला किंवा इतर गरीब देशांना परवडेल का? याचे उत्तर नाही असेच आहे; परंतु त्याला जोपर्यंत योग्य पर्याय नाही तोपर्यंत आपले स्वातंत्र्य टिकवण्यासाठी का होईना; पण हा न परवडणारा खर्च आपण करणे भाग आहे किंवा कोणत्या तरी बडया शक्तीचे मिंधे होऊन रहायचे, जे ब्रिटिशांच्या राजवटीमध्ये चालू होते.

इतर गरीब देशांबाबत मात्र खरोखरीच कठीण प्रसंग आहे. कोणत्या तरी बडया शक्तीच्या छत्राखाली आसरा घेणे हा एकच पर्याय त्यांना असू शकेल.

थोडक्यात काय तर कोणीही कितीही आरडाओरडा केला तरी ही शस्त्रस्पर्धा थांबणार नाही. तसेच सध्या अणुबॉंबला पर्याय नाही. □